स्नेहदीप

2012

स्नेहदीप संपादक समिती

ऑस्टिन मराठी मंडळ

ऑस्टिन मराठी मंडळ

स्नेहदीप
२०१२
वर्ष १२वे
कार्तिक
शके १९३४

	अनुक्रमणिका		
	संपादकीय	संपादक मंडळ	३
	अध्यक्षांचे मनोगत	निलेश खरे	५
	Treasurer's Insight	अश्विनी बळकुंदी	७
	Statement of Accounts	अश्विनी बळकुंदी	१०१
	Member Directory	अश्विनी बळकुंदी	१०६
	२०१२ एक झलक	सुचित्रा धर, निलेश खरे	१०४
मुख्य संपादक योगेश कुळकर्णी **संपादकीय मंडळ** सायली मोकाटे-जोग, अदिती देशपांडे, मेधा कुळकर्णी, अश्विनी बळकुंदी, ऋषिकेश महाजन, अस्मिता काशीकर, अनुराधा बोस	**मराठी लेख व कथा**		
	BMM २०१३ दिवाळीच्या निमित्ताने	श्रीनिवास साने	९
	गप्पागोष्टी आशिष चौघुलेंशी	सायली मोकाटे-जोग	१२
	ज्ञानप्रबोधिनीच्या हराळी केंद्रातील शिबीर	सायली मोकाटे-जोग	१५
	दीप उजळती नक्षत्रांचे आली दिवाळी अंगणी	मधुरिका गडकरी	१८
	दीपावली संस्कृत लेख	सुहास जोग	२०
	टाळ्यांचा गजर	दिलीप घाटे	२१
	चैतन्य	स्वाती खेडकर	२६
	चिमण्यांची शाळा	विद्या हर्डीकर-सप्रे	२८
	माझ्या श्वानप्रेमाची शोकांतिका	सायली मोकाटे-जोग	३०
	परीची शाळा...कुणासाठी? मोठ्यांसाठी.	अनुराधा गानू	३४
	आपले खरेदिमय जीवन !	मेधा कुळकर्णी	४०
	अरे ओ नाना तू आठे कोठे उना ?	योगेश कुळकर्णी	४३
	वास्को द गामाने आणलेले मसाले गेले कुठे	वैशाली जोशी	४५
	राघू	योगेश कुळकर्णी	५६
	स्वप्नातलं एक गाव चिखलदरा त्याचं नाव	मधुरिका गडकरी	६१
	आयर्नमॅन ७०.३	प्रसाद पानवलकर	६२
	वेणापर्वत एक अपुरी इच्छा !	पद्माकर गंगातीरकर	६८
	कर्दळीवनातील दैवी अनुभूती	क्षितीज पाटुकले	७१
	रिओ (ब्राझील)	प्रसाद पानवलकर	७३
	शुभेच्छा	सुहास जोग	७९
	होममेड व्हेकेशन	निषाद कान्हेरे	८१
मुखपृष्ठ ऋषिकेश महाजन	**कविता**		
	देवाचा पत्ता	सिमरन तेंडूलकर	१७
	नंदादीप	प्रतिभा कुळकर्णी	१९
	झाडांची गोष्ट	सिमरन तेंडूलकर	२०
	एकदा तरी	पूजा घाटे	२७

	सोनू	विदुला बंकापुरे	३३
विशेष सहाय्य कार्यकारिणी व परिवार	आठवणीचं गाव	लीना मोरे	४२
	गार्बेजचा कचरा	सुरेश पित्रे	४४
	अर्थ	राजेंद्र कुळकर्णी	५९
	जिनी	विनता कुळकर्णी	६०
	तू तिथे मी	परेश केळवेकर	७२
	तर का?	विक्रांत फडके	७८
	हमारे गाँधी	सतीश मोरे	८०
	दोस्त	लीना मोरे	८०
	कलादालन		
	२०१२ छायाचित्रातून	ऋषिकेश महाजन	४७
	रेखाचित्रे	जुईली केळवेकर	४९
		ऋचा जोशी	५५
		राधा	५५
		श्वेता मोरे	४९
		रॅकेल रॅकुसीन	५०
	शब्दकोडे	अस्मिता काशीकर	२५
	पाककृती		
	बीटरूट सार, आंबा नारळ बर्फी	मीना बळकुंदी	५१
	शंकरपाळी, क्रॅनबेरी चटणी, टेस्टी टोफूचा पराठा	अश्विनी बळकुंदी	५२
	भरली कार्ल्याची भाजी, दही दुधाच्या वड्या	प्रतिभा कुळकर्णी	५३
	बास्केट चाट	शुभदा घाटे	५१
	रशियन सलाड	आरती दिघे	५४
प्रकाशक: ऑस्टिन मराठी मंडळ	**English**		
	Laughter	Meena Vaad	89
	It's Bug's Life	Paresh Kelvekar	89
	Real Friend	Chinmay Pingale	90
	Exercise	Chinmay Pingale	90
	Sri-Krishna	Mahendra Pingale	91
	Cartoon	Gargi Pingale	96
	Jindagi Jab Mile Dobara	Nilesh Khare	97

*अंकातील व्यक्तिगत विचार हे लेखकांचे आहेत. संपादक/प्रकाशक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

Copyright Austin Marathi Mandal (www.austinmarathimandal.org)

संपादकीय

नमस्कार मंडळी !

मराठी रसिक वाचकांना ऑस्टिन मराठी मंडळ व स्नेहदीप संपादकीय समितीतर्फे दिवाळी व नववर्षाच्या शुभेच्छा ! दर वर्षीप्रमाणे याही वेळेस स्नेहदीप २०१२ चा अंक आपल्या हाती देतांना विशेष आनंद होत आहे. स्नेहदीप यंदा प्रथमच प्रथेप्रमाणे दिवाळीत प्रकाशित होऊ शकला नाही त्याबद्दल समिती दिलगिरी व्यक्त करते व रसिक वाचक यामागची कारणे जाणून घेऊन खुल्या मनाने अंकाचे स्वागत करतील अशी आशा बाळगते.

स्नेहदीप संपादकीय समितीचा हा अंक प्रदर्शित होईपर्यंतचा रोमांचक व अविस्मरणीय प्रवास हा एका वेगळ्या लेखाचा विषय होऊ शकतो. यात विविध लेख, कथा, कविता आदी साहित्यप्रकाराच्या लेखकांकडून गोळा करण्यापासून ते संकलित व मुद्रित करण्यापर्यंतचा जसा तांत्रिक बाबींचा समावेश आहे तसाच ह्या साहित्यातून आपल्या भावना लोकांपर्यंत पोहोचाव्या असा प्रामाणिक प्रयास करणाऱ्या लेखक-कवींचा हळवा ओलावाही आहे. कित्येकांनी 'आज साहित्य पाठवण्याची शेवटची तारीख आहे पण दोन दिवस उशीर चालेल का? लेख तयार आहे पण तो सर्वोत्कृष्ट असावा म्हणून उशीर ' अशी तळमळही दाखवली. या वर्षी मंडळाचे कार्यक्रमही मोठे व नवीन परिमाणाची उंची गाठणारे होते त्यामुळे आमचे स्थानिक साहित्यिक हे दिवाळीपर्यंत अत्यंत व्यस्त होते.

अर्थात स्नेहदीप हा आता फक्त स्थानिक साहित्यापुरता मर्यादित न राहाता खऱ्या अर्थाने वैश्विक झाला आहे याची प्रचीती समितीला जेव्हा साहित्य फक्त ऑस्टिन किंवा अमेरिकेतूनच न मिळता मायदेशातूनही मिळाले तेव्हाच मिळाली. अंकाला लाभलेल्या साहित्याचा दर्जाही प्रत्येक वर्षी नवीन उंची गाठतो आहे ही मराठी साहित्याकरिता आनंदवार्ताच म्हणावी! या अंकात नेहमीप्रमाणे मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत यांचा तर समावेश आहेच पण आहिरणीसारख्या बोलीभाषेलाही प्रथमच स्थान मिळाले आहे. मागील अंकात नमूद केल्याप्रमाणे ऑस्टिन मराठी मंडळाचा प्रवास हा मराठी वाङ्मय मंडळ म्हणून सुरु झाला आणि आज स्नेहदीपमध्ये अनेक ललित प्रकार हाताळतो तेव्हा परत आपण कुठेतरी आपल्या मुळांना घट्ट धरून आहोत याचा सार्थ आभिमान वाटतो.

स्नेहदीप प्रकाशित करण्यात आम्हाला अनेकांची भरभरून मदत झाली त्यांचे मानावे तितके धन्यवाद कमीच आहेत. ही दिवाळी व नूतन वर्ष आपणास भरभराटीचे , आरोग्यदायी व सुखसमृद्धीचे जावो !

-संपादक

GRAND OPENING
GANDHI BAZAR
INDIAN SUPERMARKET

Fresh Produce
Organic
Gluten free
Vegetarian
Vegan

Keep Austin Healthy!

Grocery
Ayurvedic
Herbal
Appliances
Jewelry

Introducing Our freshly ground, gourmet spices and curry pastes / batters

www.facebook.com/gandhibazarstore

www.gandhibazar.com

Locally Owned Serving Austin Over 10 yrs.

3 CONVENIENT LOCATIONS TO SERVE YOU!

North Austin
2121 W. Parmer Ln. #113
Austin, TX 78727
(512) 837-9701
Open Daily 9am - 9pm (Ext. Hours)

Northwest Austin
12809 N FM 620 #3
Austin, TX 78750
(512) 249-7600
Open Daily 11am - 9pm

NEW
South Austin
3421 W. William Cannon Dr.
Ste. 133 Austin, TX 78745
512-899-1000
Open Daily: 10am - 9 pm

DINE IN
TAKE-OUT
CATERING

Curry In Hurry (North Austin)
2121 W Parmer Ln. #114A
Austin, TX 78727
(512) 821-0000
Open Daily 11am - 9pm
www.curryinhurryaustin.com

CURRY IN HURRY
INDIAN VEGETARIAN CUISINE

DINE IN
TAKE-OUT
CATERING



10% OFF DECEMBER with purchase of $25 or more at any of our locations. Exclude SALE items. One per family per day. Not redeemable for cash. Valid only on the specified month. No rain checks.

10% OFF JANUARY with purchase of $25 or more at any of our locations. Exclude SALE items. One per family per day. Not redeemable for cash. Valid only on the specified month. No rain checks.

10% OFF FEBRUARY with purchase of $25 or more at any of our locations. Exclude SALE items. One per family per day. Not redeemable for cash. Valid only on the specified month. No rain checks.

अध्यक्षांचे मनोगत

नमस्कार मंडळी,

अगदी बरोब्बर एक वर्षापूर्वी आम्ही मराठी मंडळाची कार्यकारिणी सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारली तेंव्हा आपल्या पुढ्यात काय आहे याची आम्हा सर्वाना अत्यंत उत्सुकता होती. आमची संपूर्ण कमिटी हि नवशिकी होती. आधीच्या वर्षी सहभाग तथा अनुभव नसताना हि मोठी जबाबदारी स्वीकारून आम्ही मागील वर्षी नोव्हेंबर मध्ये आमच्या कामाचा श्रीगणेशा केला.

नवीन कार्यकारिणी तसे नवीन रूप या नियमानुसार आम्ही शून्याधारित कार्यक्रमाची नियमावली करण्याचा संकल्प सोडला. मंडळ हे तुमचे आहे - आमचे आहे - आपल्या सर्वांचे आहे. ह्या मंडळाचे कार्यक्रम कोणते असावेत ही गोष्ट आम्ही स्वतःच न ठरवता आम्ही आपल्या सभासदांचे सर्वेक्षण करून त्यांची आवड निवड जाणून घेतली. गणेशोत्सव, दिवाळी तथा आविष्कार हे तीन कार्यक्रम निश्चित होते. त्या खालोखाल खाद्यमहोत्सव, मराठी चित्रपट आणि नौकाविहार, सहल, यांचा नंबर लागला. आमची वर्षाची कार्यक्रमांची रूपरेषा त्यावरून ठरवली गेली. मराठी चित्रपट "देउळ", सहल , आविष्कार, गणेशोत्सव,दिवाळी तसेच वर्षा अखेरीस अजून एक चित्रपट "भारतीय" असे आपल्या मंडळाने ह्या वर्षी एकूण सहा कार्यक्रमांचे आयोजन केले.

मला लिहिण्यास अत्यंत आनंद होतो आहे कि आपले हे सर्व कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाले. आपल्या सर्व कार्यक्रमांस रसिक श्रोते तथा सादर करणारे कलाकार या सर्वांनी भरभरून प्रतिसाद दिला. आविष्कार ला संगीत, नृत्य आणि नाट्य ह्यावर आधारित सादर करण्यात आलेला लयबद्ध "कृष्णायन" तसेच गणेशोत्सवात महाराष्ट्रातील कला-संस्कृतींची ओळख करून देणारा धडाकेबाज "गर्जा महाराष्ट्र माझा" ह्या दोन कार्यक्रमांचे तर कौतुक करावे तेवढे थोडे आहे. गेले काही वर्षे आपल्याच ऑस्टिन मध्ये संपूर्ण स्वतः संकल्पित अशा ह्या कार्यक्रमांची निर्मिती होत आहे. ह्या कार्यक्रमांस ४ ते ५ महिने कुठल्याही मानधनाची अपेक्षा न करता जीव ओतून असंख्य कलाकार काम करत असतात, त्यावर खर्च करत असतात. मंडळाने त्याना केवळ मानसिक नव्हे तर आर्थिक पाठींबा देखील द्यावा असा एक मत प्रवाह रुजू होता पण ह्या विषयावर कुठलाही निर्णय घेण्यात आला नव्हता. अर्थात हा निर्णय मोठा होता, आपल्या मंडळाची गेले २० वर्षे धुरा सांभाळणारी मंडळी त्यात सामावून घेणे इष्ट होते. त्यानुसार जून महिन्यात आपल्या मंडळाची founders आणिpioneers यांची एक बैठक बोलावून हा निर्णय घेण्यात आला. दर वर्षी आपल्या मंडळा कडून ८०० USD हे मोठे कार्यक्रम तथा कलाकारांना पाठींबा व २०० USD हे सामाजिक कार्य ह्यासाठी पुढील ४ वर्षांसाठी राखून ठेवण्यात आले.

"आपले शहर छोटे आहे. मोठ्ठे कार्यक्रम आयोजित करणे आणि मोठ्ठ्या भराऱ्या मारणे हि मक्तेदारी फक्त डलास किंवा ह्युस्टन या सारख्या मोठ्या शहरांकडेच असते" ... असा एक कल्पना प्रवाह ऑस्टिन सारख्या मध्यम आकाराच्या शहरांमध्ये रुजू असतो. सर्वेक्षणातून मिळालेला प्रतिसाद आणि गेल्या १० वर्षातील कार्यकारिणी सभासदांबरोबर केलेली चर्चा ह्यावरून आम्हाला असे संकेत मिळत होते कि आपले शहर ही भरारी मारण्यास सज्ज आहे. मार्च महिन्यात आम्ही जादुगार रघुवीर आणि BMM ह्यांच्याबरोबर दिवाळी कार्यक्रमाचा कंत्राट सही केला. मोठ्या बजेटचा हा कार्यक्रम सादर करणे हि एक आपल्या मराठी मंडळाची मोठी झेप होती. जादूच्या प्रयोगाबरोबरच मागील वर्षी रुजू झालेली ताक-धिना-धीन हि नृत्यस्पर्धा आम्ही परत ह्यावर्षी दिवाळी च्या निमित्ताने घेऊन आलो. हा दिवाळीचा कार्यक्रम मोठ्या धुमधडाक्यात साजरा करावा ह्यासाठी आम्ही ७ महिने दिवस रात्र प्रचंड मेहेनत केली आणि कुठल्याही स्थरावर ह्या कार्यक्रमाची प्रसिद्धी करण्याची संधी दवडली नाही. कार्यक्रम सादर करण्यात कुठल्याही प्रकारची तडजोड केली नाही. आपला हा दिवाळी चा कार्यक्रम ऑस्टिन मराठी मंडळाच्या इतिहासात एक नवे पर्व घेऊन यावा ह्या इच्छेने आम्ही सर्व यंत्रणा कामास लावली. ह्या पार्श्वभूमीवर आपल्या दिवाळी कार्यक्रमास न भूतो न भविष्यती असा प्रतिसाद मिळाला. साधारणपणे ५०० मंडळींनी आपल्या दिवाळी च्या कार्यक्रमास हजेरी लावली. ताक -धिना-धिन हा केवळ मराठी मंडळच नव्हे तर संपूर्ण ऑस्टिन च्या नृत्यप्रेमी देशी मंडळींचा चर्चेचा विषय झाला.

ह्यातून आपण काय शिकलो? मराठी मंडळाचा मूळ हेतू काय? साता समुद्रापलीकडे महाराष्ट्र राज्यात जन्म घेऊन आपण सारी मंडळी येथे टेक्सस मध्ये येऊन स्थायिक झालो. आपल्या मातृभूमीचा अभिमान राखून आपल्या रूढी आणि परंपरा जतन करण्यासाठी आपण सर्वजण वर्षात कैकवेळा एकत्र येतो. मग ते आपले सण साजरे करण्यास असो वा आपल्या आवडीचे निव्वळ मनोरंजन देणाऱ्या कार्यक्रमांचे सुख उपभोगण्यास असो - आपले एकमेकांशी अतूट नाते आहे - आपल्या मातृभूमीचे नाते आहे - आपल्या मायबोलीचे नाते आहे. ह्याच नात्यामधून आपल्या मंडळाचा जन्म झाला आणि ह्याच नात्यातून त्याची वृद्धी झाली. येत्या ३ वर्षात आपण मंडळांची पंचविशी गाठू. पुढील काही वर्षी आपण ह्या आपल्या ऋणानुबंधाच्या गाठी अधिक घट्ट करू आणि त्या रौप्यमहोत्सवी वर्षात सारे असेच एकत्र येऊन एक दिमाखदार दैदिप्यमान सोहळा साजरा करू याची मला खात्री आहे.

आपल्याकडून आम्हाला भरपूर शाबासकी, प्रेम, सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले. पुढील कमिटीला देखील ते असेच मिळो हि इच्छा.

जय महाराष्ट्र !

Go Austin !!

-अध्यक्ष

Treasurer's Insight…

The year 2012 has been a very successful year for AMM. For each event, AMM goal has been to break even. Such being the case, AMM still had $2845.13 more than the 2012 Opening Balance of $15562.19 as of January 1st 2012.

In the 2012 statement of account balance, this year's committee had to take into account the 2011 Diwali, Snehadeep and Miscellaneous Expenses that amounted to $3112.74. This expense is dated from October 19th 2011 till December 31st 2011 which is considered as 2011 Statement of Account Balance.
For the year 2012, as of November 30th, the Closing Total Balance is $18407.32, $2845.13 more than the 2012 Opening Balance of $15562.19. We have 5 Sponsors' with Gold Memberships that have contributed towards the profit, in addition to the family/individual memberships renewed for the year 2012-2013, as well as individual event profits. The statement of account balance for the month of December 2012 will be emailed to the AMM members in the first week of January 2013.

The committee decided to make a few changes in terms of AMM Membership, Payment Process and Handling Refunds:
- About 110 families renewed their memberships since the Ganeshotsav Event. These members will now be able to get membership rate discounts for all the future events through end of 2013.
- For each of the event, it was decided that, only event ticket payment would be considered as RSVP. Notifications through emails or referrals to any of the AMM committee member were not considered RSVP's. This change was implemented to ensure complete payment list of attendees at the event gate and hassle free settling of accounts at the end of every event.
- Another major thing that the committee members reached a consensus on was that of handling event ticket refunds. Full refund of event ticket payment was considered only ON or BEFORE RSVP date of that particular event. Massive effort goes in planning an event, especially when it comes to handling variable cost such as food. Food (catering/home prepared) is estimated based on the number of RSVP's received. Hence, it is very important to let the committee know beforehand about any cancellations.

There was a huge response in terms of participants performing at major events, be it Avishkar, Ganeshotsav or Diwali Tak Dhina Dhin. As it has been the norm, all the participants (members/non-members) paid member RSVP price. The Magician Raghuvir show gained huge popularity with kids and adults.

One major announcement that was made during the Ganeshotsav event was, about the monetary support for local talent groups. Past AMM presidents took this decision based on a number of requests made over the past years, as a result of which approximately $1000 was allocated for this benefit. Krishnayan team for Avishkar and Garja Maharashtra Majha team for Ganeshotsav, received financial support through the Local Talent Support Funds. The allocated amounts for each of these teams were done at the committee's discretion, with a larger share going towards Krishnayan team for Avishkar. Charitable donations of $100 were donated to Red Cross for Sandy Storm Relief Effort, while there are plans in December to donate $100 to the noble cause of Chinmaya Mission.

As a treasurer of AMM 2012, I would like to take this opportunity to extend a BIG VOTE OF THANKS to all the family members of the AMM team, with whose support the committee was able to put in long hours for each of the event planning and organization.

Best wishes to the future AMM committee members.

Wishing all of you a very bright and a prosperous New Year 2013!

-Treasurer

CAPITOL
WEALTH ★ STRATEGIES

At Capitol Wealth Strategies, we help Individuals and business owners create efficient ways of accumulating, protecting and distributing their wealth. You've worked hard to save for your family or in establishing a thriving business and we are here to help you make the most efficient choices as far as the growth and taxation of your assets. We can help you take the necessary steps to solve the financial issues you face and help create flexible solutions that are specific to you. The plans we implement seek **maximum efficiency, mitigate as much risk** as possible, and **minimize taxes**.

Talent acquisition and firm development is also a primary focus, making sure we have the right people in the right markets. Through diversifying our company culture, people in all communities can become financially secure.

We create solutions in the following areas:

- **Planning**
  - Overall Strategic Financial Planning
  - Retirement Planning
  - Education Planning
  - Business & Personal Tax Planning
  - Insurance Planning
- **Specific Areas**
  - Executive/Key Person Retirement Benefits
  - Supplemental Executive Retirement Plans (SERP)
  - 401k Plans
  - Life Insurance
  - Disability Insurance
  - IRA's Defined Benefit Plans
  - Buy-Sell Agreements
  - Key-Man Life Insurance
  - Group Benefits
  - Corporate Owned Life Insurance (COLI Plan)
  - IRC Section 162 Bonus Plans
  - 529 Education Plan
  - Assets under Management (Brokerage Accts.)

Contacts:

Prakash Mohandas (512-299-7766)

Shreya Apte (512-354-5993)

SOUTHWEST
PEDIATRIC
ASSOCIATES

Vaishalee Patil, M.D.

Seton Southwest Health Plaza
7900 FM 1826, Bldg 1, Ste 240
Austin, Texas 78737

Phone: (512) 288-9669
Fax: (512) 498-0321

BMM २०१३ दिवाळीच्या निमित्ताने -

तुम्हा सर्वांना बीएमएम २०१३ अधिवेशन समितीकडून २०१२ च्या दिवाळीनिमित्ताने हार्दिक शुभेच्छा! ही दिवाळी तुम्हा सर्वांना आणि तुमच्या कुटुंबियांस, तसेच मित्रपरिवारास सुखाची, समाधानाची जावो. येते नवीन वर्ष सुबत्ता, स्थैर्य आणि आरोग्य घेऊन येवो.

दिवाळीच्या सणानिमित्ताने शुभेच्छा देताना आम्हाला 'हरिकेन सँडी'ने ग्रस्त ईस्ट-कोस्ट भागातील मराठी कुटुंबांबद्दल तसेच त्यांच्या मित्रपरिवाराबद्दल काळजी वाटते आहे. तुम्हापैकी जे 'हरिकेन सँडी'मुळे काळजी किंवा आपत्तीग्रस्त असतील अशा सर्वांना या त्रासातून लवकरात लवकर बाहेर पडता यावे आणि दिवाळीचा आनंद नेहमीप्रमाणे काळजीमुक्त लुटता यावा या आमच्या मनापासून सदिच्छा.

गेले जवळजवळ वर्षभर आपल्यापैकी बीएमएम वृत्ताचे जे वाचक असतील त्यांना २०१३ मध्ये बीएमएमचे अधिवेशन होणार आहे याची कल्पना असेलच. तरीही अनेकजण असे असतील की ज्यांना या अधिवेशनासंबंधी माहिती नसेल, किंवा नुकतीच मिळाली असेल. म्हणून बीएमएमचे २०१३ चे अधिवेशनाबद्दल थोडेसे अधिक सांगते.

<u>बीएमएम २०१३ च्या अधिवेशनासंबंधी थोडेसे:</u>

दर दोन वर्षांनी होणारे बीएमएमचे अधिवेशन २०१३ साली बॉस्टनपासून फार दूर नसलेल्या ऱ्होड आयलंड येथे ऱ्होड आयलंड कन्वेन्शन सेंटर मध्ये २०१३ च्या जुलै महिन्यात अमेरिकन स्वातंत्र्यदिनाला लागून आलेल्या दिवसांत म्हणजे ५-७ तारखांच्या दरम्यान होणार आहे. बॉस्टनचे न्यू-इंग्लंड मराठी मंडळाचे अनेक सदस्य गेले वर्षभर या अधिवेशनाच्या तयारीत गुंतले आहेत. जगभरच्या सुमारे तीन ते चार हजार मराठी माणसांना एकत्र आणणारे आणि आपली संस्कृती महाराष्ट्राबाहेरही रुजते आहे, वाढते आहे याचा दिलासा देणारे असे हे अधिवेशन म्हणजे आयोजकांसाठी मराठी जनांमधील मतभेद विसरून एकत्र आणण्याची, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्याची एक उत्कृष्ट संधी असते आणि आव्हानही असते. पण बॉस्टनचे न्यू इंग्लंड मराठी मंडळ या आव्हानाला तसे नवे नाही. यापूर्वी म्हणजे १९९७ मध्ये बॉस्टनच्या न्यू इंग्लंड मराठी मंडळानेच 'जाणता राजा' सारखे आकर्षक आणि वैविध्यपूर्ण कार्यक्रम करून बीएमएमचे एक अतिशय यशस्वी आणि सुरेख अधिवेशन करून दाखवले आहे, जे आजही अनेक मराठी बंधुभगिनींच्या लक्षात असेल. मात्र १९९७ नंतर सोळा वर्षांनी परत बॉस्टनजवळच्या भागात होणाऱ्या या अधिवेशनाचा विचार केल्यास पूर्वीच्या तुलनेत काळही बदलला आहे, जगभरच्या मराठी बंधुभगिनींसमोरची आव्हाने बदलली आहेत, आणि त्याचबरोबर तंत्रज्ञानाचा आवाकाही बदलला आहे. आता अमेरिकेतील मराठी मंडळांची व्याप्ती वाढली आहे. न्यू-इंग्लंड भागात तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे अनेक तरुण मराठी तंत्रज्ञांची आणि त्यांच्या कुटुंबियांची भर पडली आहे. म्हणूनच जगभरच्या मराठी लोकांना एकत्र आणून त्यांना आपापसातील ऋणानुबंधांची नवी जाणीव करून देणारे, किंवा नवे ऋणानुबंध जुळण्यास मदत करणारे असे हे अधिवेशन असावे अशी आमची इच्छा आणि प्रयत्न आहेत.

अधिवेशनाच्या समितीमध्ये नवे-जुने अनेक चेहरे आहेत जे २०१३ मधील या अधिवेशनाची तयारी करण्यात गेले कित्येक महिने गुंतलेले आहेत. बीएमएमचे अध्यक्ष श्री. आशिष चौघुले, तसेच अधिवेशनाची मुख्य धुरा वाहणारे श्री.

बाळ महाले, श्री. अविनाश पाध्ये, सौ. अदिती टेलर आणि श्री. संजय सहस्त्रबुद्धे यांच्याबरोबरच न्यू-इंग्लंड भागातील अनेक मराठी कुटुंबे या अधिवेशनासाठी जोमाने कार्यरत आहेत.

<u>कार्यक्रमाची मुख्य आकर्षणे:</u>

भारत तसेच अमेरिकेतील गुणी कलावंतांनी सादर केलेले करमणुकीचे, हास्य-विनोदाचे कार्यक्रम हे तर या कार्यक्रमाचे आकर्षण आहेच, पण त्याचबरोबर बीएमएम सारेगम २०१३ ची स्पर्धा हे या अधिवेशनाचे एक मुख्य आकर्षण असणार आहे. अमेरिकेतील स्थानिक कलावंतांच्या कलेस प्राधान्य देणाऱ्या या स्पर्धेच्या प्राथमिक फेऱ्या सध्या तुमच्याजवळच्या अनेक शहरांमध्ये पार पडत आहेत. त्याचप्रमाणे आपल्यामधल्या खास मराठी खवय्यांसाठी खमंग, आणि चविष्ट मराठी जेवण हेही अधिवेशनाचे एक प्रमुख आकर्षण असेल! या अधिवेशनाचा जेवणाचा मेनू "शाही, गावरान आणि मुंबई स्टाईल स्नॅक्स" अशा विविध ढंगांनी ठरवला गेला आहे. तेव्हा या जेवणाचा आस्वाद आपल्या मित्रपरिवारासमवेत घेण्यासाठी अधिवेशनाला यावेच लागणार, होय का नाही?! त्याचप्रमाणे नुसते मराठी जेवण, खाणेपिणे आणि करमणूक एवढेच या कार्यक्रमाचे स्वरूप नाही. तर याचबरोबर सर्व वयातील आणि सर्व विचारांच्या मराठी व्यक्तींना उपयुक्त होतील असे अनेक कार्यक्रम आम्ही देण्याची तयारी केली आहे. उदाहरणार्थ, शाळाकॉलेजच्या मुलांसाठी कॉलेज ॲडमिशन्स, इंटर्नशिप्स यासंबंधाने मार्गदर्शन या अधिवेशनात होईल. तसेच भारत आणि अमेरिकेमधील यशस्वी उद्योजक, शास्त्रज्ञ, आणि विचारवंत भेटतील ते अधिवेशनाच्या बिझनेस तसेच एज्युकेशन या खास कार्यक्रमांमध्ये. देश-विदेशांतील या विविध क्षेत्रे गाजवलेल्या व्यक्तींशी भेटी आपल्या आणि आपल्या पुढच्या पिढीच्या विकासाला, उद्योजकतेला, आणि कार्यशक्तीला प्रेरक ठरतील याची आम्हाला खात्री आहे.

<u>तुम्ही अधिवेशनात कसे सहभागी होऊ शकाल?</u>

तुम्हाला या अधिवेशनात काय काय चालले आहे यासंबंधी उत्सुकता निर्माण झाली असेल तर तुम्ही २०१३ मधील अधिवेशनाबद्दल अधिक माहितीसाठी अधिवेशनाच्या संकेतस्थळास (वेबसाईट) जरूर भेट द्या अशी विनंती करत आहोत. हे संकेतस्थळ आहे - http://www.bmm2013.org/ त्याचप्रमाणे बीएमएमचे फेसबुक पानही दर आठवड्याला "बीएमएम फॅन ऑफ दी वीक" ही आगळीवेगळी कल्पना गेले काही महिने सातत्याने राबवत आहे. तुम्हाला यात सहभागी व्हायचे असल्यास फेसबुक पानावरून आमच्याशी संपर्क करू शकता. तसेच तुम्ही फेसबुक सदस्य असा किंवा नसा, तुम्हाला https://www.facebook.com/bmm2013 येथे जाऊन सध्या बॉस्टनमध्ये तसेच उत्तर अमेरिकेत अनेक शहरांमध्ये बीएमएम संबंधाने काय घडते आहे त्याची थोडीशी कल्पना येऊ शकेल.

अधिवेशनासाठी एक मुख्य काम असते ते म्हणजे स्मरणिकेचे. या वर्षी बीएमएम स्मरणिकेची मुख्य जबाबदारी ऱ्होड-आयलंड येथील मराठी कुटुंबांनी मोठ्या आनंदाने उचलली आहे. त्यांचे आवाहन आहे की तुम्ही त्यांच्याकडे स्मरणिकेसाठी वेगवेगळे लेख, लिखाण पाठवावे. या स्मरणिकेतील लिखाण कसे असावे यासंबंधी अधिक माहिती http://bmm2013.org/convention/bmm-smaranika.html येथे मिळेल. स्मरणिकेसाठी लेखन पाठवण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर २०१२ आहे. तरी आपण लेखन जरूर पाठवा असा आमचा आग्रह आणि विनंती आहे.

शेवटी तुम्हाला आमच्याकडून अधिवेशनासंबंधी आग्रहाचे आमंत्रण! जुलै महिना हा न्यू-इंग्लंड भागात फिरण्यासाठी अतिशय उत्तम असतो. आल्हाददायक, प्रसन्न वातावरण; उत्तमोत्तम कार्यक्रम; जुन्या-नव्या मित्रमैत्रिणींशी भेटीगाठी; त्याचबरोबर आजूबाजूची मुबलक पर्यटनस्थळे; शाळा-कॉलेजात प्रवेशास उत्सुक मुलांसाठी एमआयटी, हार्वड, ते बाऊन

युनिवर्सिटी, नॉर्थ-ईस्टर्न युनिवर्सिटी अशा विविध प्रसिद्ध शैक्षणिक संस्थांचा फेरफटका असे विविध अंगाने हे अधिवेशन तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबियांना उपयुक्त ठरावे. तेव्हा या अधिवेशनास येण्याचा नक्की विचार करा. कार्यक्रमाचे रजिस्ट्रेशन पुढील काही आठवड्यांत सुरू होईल. एवढ्या मोठ्या अधिवेशनात उत्तमोत्तम कार्यक्रम देण्यासाठी आर्थिक पाठबळाचीही गरज असते. गेल्या वर्षात आमच्या अनेक हितचिंतकांनी तिकीटे घेतानाच अधिवेशनास देणगी देऊन मुक्तहस्ताने मदत केली आहे. यामध्ये तुम्हाला काही फायदेही होऊ शकतील:. जसे मुख्य कार्यक्रमांमध्ये बसण्यासाठी खास राखीव जागा (प्रायॉरिटी सीटींग). तुम्हाला अशी इच्छा असल्यास अधिक माहिती खालील दुव्यावर घेऊ शकता. http://www.bmm2013.org/donate/individual-donor-packages.html . कार्यक्रमासाठी नाव नोंदणी करण्यासाठी http://www.bmm2013.org/registration/register-now.html येथे जाता येईल.

तर मंडळी, तुम्हाला सर्वांना पुन्हा एकदा आमच्याकडून दिवाळीच्या निमित्ताने मनापासून शुभेच्छा! बीएमएम २०१३ च्या अधिवेशनाला जरूर यावे असे आग्रहाचे आमंत्रण आम्हा न्यू-इंग्लंडकरांकडून.
धन्यवाद.

बीएमएम २०१३ समिती

नव्या बांधुया रेशिमगाठी, जपण्या अपुली मायमराठी

https://www.facebook.com/bmm2013

http://www.bmm2013.org

गप्पागोष्टी आशिष चौघुलेंशी

-- सायली मोकाटे-जोग

नेहमीप्रमाणे धूमधडाक्यात होणारा ऑस्टिन मंडळाचा दीपोत्सव हा कार्यक्रम यावर्षी ३ नोव्हेंबरला पार पडला. धमाल कार्यक्रम आणि फराळ याबरोबर आणखी एक विशेष म्हणजे बृहन महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री आशिष चौघुले यांची उपस्थिती. या निमित्ताने त्यांच्याशी केलेली बातचीत -

सायली: बृममंच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तुमचं पुन्हा अभिनंदन! उत्तर अमेरिकेतल्या वेगवेगळ्या मंडळांना तुम्ही भेटी देत आहात, ऑस्टिन मराठी मंडळातही येताय याचा आम्हाला फार आनंद आहे. तर अध्यक्ष झाल्यानंतरचा तुमचा कामासंबधीचा दृष्टीकोन याबद्दल काही थोडसं... ?

आशिष: हो, सांगतो. बृममंचं अध्यक्ष पद हे मानाचं आहेच. पण माझ्या मते, पद हे शेवटी कागदी घोडे. जनतेने निवडून दिलेला प्रतिनिधी म्हणून मला काम करायला अधिक आवडतं. त्यामुळे लोकांशी थेट संपर्क, त्यांच्यात मिसळता यावं म्हणून एका अर्थाने मी विविध मंडळांना भेट देतोय. केवळ आज मी अध्यक्ष आहे म्हणून लोकांनी मला ओळखावं यापेक्षा एक माणूस म्हणून, आशिष चौघुले व्यक्ती म्हणून माझी ओळख लोकांना झाली तर ते अधिक मोकळेपणाने संवाद साधू शकतील आणि अश्या व्यक्तिगत धाग्यांमधूनच बृममंचं काम करणंही सोपं होईल. एकूणच जी भारतीय/मराठी माणसं अमेरिकेत राहतात ती त्यांच्या गुणवत्तेच्या जोरावर. त्यामुळे मी एकटाच कोणी एकदम मोठा आहे असा भ्रम ठेवण्यात काही अर्थ नाही. एक महाराष्ट्रीयन किंवा मराठी म्हणून जेव्हा मी उत्तर अमेरिकेत काम करतो तेव्हा एक गोष्ट निश्चित आहे की माझ्याबरोबरच्या सगळ्यांचे उत्तम विचार घेऊन चांगलं काम उभं करणं हे माझं अध्यक्ष या नात्याने कर्तव्य आहे. "People Management" माझा आवडीचा विषय आणि कोणतेही प्रश्न "Win - Win" सिचुएशनमध्ये सोडवता आले पाहिजेत हा माझा कटाक्ष असतो. ऑस्टिनचं म्हणशील तर मला इथलं हवामान आवडतं. माझ्या पत्नीच्या नोकरी संदर्भात जुळून आलं असतं तर कदाचित मी ऑस्टिनवासीच झालो असतो. माझे बरेच जुने मित्र इथे आहेत. त्यामुळे दिवाळीला ऑस्टिन मराठी मंडळाला भेट द्यायचं ठरवलं.

सायली: बृममंच्या मासिक वृत्त (BMM Newsletters) मधले तुमचे अध्यक्षीय वाचते. वेगवेगळ्या विषयावर ओघवतं, साधं, सोपं असं तुमचं लिखाण वाचायला वाचक म्हणून आम्हाला निश्चितच आवडतं. लेखनाची आवड आहे की सध्या नेम म्हणून लिहिता?

आशिष: मुळातून मराठीवर प्रेम आहे. मी स्वतः कलाकार आहे. मराठी लोकसंगीत, निवेदन, लेखन, दिग्दर्शन केलेलं आहे. "मायमराठी"चे आम्ही अमेरिकेत ४० प्रयोग केलेत. भारतातही ८ प्रयोग झालेत. त्यामुळे लिखाण हे होत राहते आणि लेखनाच्या बाबतीत मी शिरीष कणेकर यांना गुरु मानतो. त्यांनी मला एकदा सांगितलं की कोणतही लिखाण सामान्य माणसाला जितकं भावेल तितकं ते यशस्वी असेल. त्यामुळे वृत्तामध्ये अध्यक्षीय लिहिताना एकूणच त्या महिन्यात चालेलं काम आणि त्याबरोबर काही अमेरिकन संदर्भ याचा मेळ घालून, अमेरिकेतला मराठी माणूस डोळ्यासमोर ठेवून जे सुचत तसं लिहीत जातो. लोकांना ते आवडतं याचा आनंद आहे.

सायली: बृममंच्या "मराठी शाळा" या उपक्रमाबद्दल माहिती द्याल? अमेरिकेत अनेक ठिकाणी मराठी शाळा चालते. ऑस्टीनमध्येही त्याच धरतीवर आम्हाला शाळा सुरु करायला आवडेल. बृममंकडून त्यासाठी कशी मदत मिळू शकेल?

आशिष: खूप चांगली कल्पना आहे. पहिल्यांदा जेव्हा हा विषय समोर आला तेव्हा आमच्या समितीने त्यावर सर्वांगाने चर्चा केली. "मराठी शाळा" हा उपक्रम जरी वैयक्तिक मंडळांमध्ये राबवला जाणार असला तरी त्यामध्ये समान सूत्र असणं आवश्यक आहे. कारण लोकांच्या नोकऱ्या बदलतात, आई-वडील बदली होऊन दुसऱ्या ठिकाणी गेले तर मराठी शिकणाऱ्या मुलांचं नुकसान होऊ नये अथवा शिक्षणात खंड पडू नये. त्यासाठी बृममंच्या छत्राखाली एक अभ्यासक्रम असायला हवा जो इतर सर्व मंडळामध्ये राबवला जाऊ शकतो म्हणजे अमेरिकेत कुठूनही मुलांना तोच मराठी अभ्यास पुढे चालू ठेवता येईल. अभ्यासक्रम निवडताना लक्षात आलं की यामध्ये केवळ मराठी शिकवून भागणार नाही. कारण भारतात वाढणारी मुलं आणि अमेरिकेत वाढणारी मुलं यांच्यात खूप फरक पडतो. मग तो भाषिक, सांस्कृतिक, भौगोलिक, स्थानिक बाबी या विविध स्वरुपात असतो. त्यामुळे मराठी साहित्यातले अनेक संदर्भ इथे अमेरिकेत मुलांना कळणं कठीण होऊन बसतं. यासाठी मराठीबरोबर इतिहास आणि भूगोल अशा एका समावेशक दृष्टीकोनातून आम्ही मराठी शाळेचा अभ्यासक्रम तयार केला. त्याला भारती विद्यापीठ, पुणे यांच्या सहयोगातून मान्यताही मिळवली. कुठल्याही मंडळात "मराठी शाळा" चालू करायची असेल तर बृममं स्वतः संपूर्ण अभ्यासक्रम, पुस्तकं आदी साहित्य पाठवतो. शिवाय शाळा घेणाऱ्या शिक्षकांशी कॉन्फरन्सच्या माध्यमातून महिन्याला २ बैठका असतात ज्यातून त्यांना मार्गदर्शनही करतो. सुरुवातीला ५-६ मंडळांमध्ये "मराठी शाळा" हा उपक्रम चालू झाला. आज उत्तर अमेरिकेत एकूण २७ अधिक मंडळे मराठी शाळा चालवतात. आनंदाची बाब म्हणजे मुलं उत्तम गुणांनी उत्तीर्ण होत आहेत. ऑस्टिनमध्ये असा उपक्रम जरूर सुरु करा, बृममंच्यावतीने सर्व सहकार्य आम्ही निश्चितच देऊ.

सायली: मुलांनी मराठी चांगलं शिकावं आणि बोलावं म्हणून मराठी मंडळात मराठीच बोललं पाहिजे हा नियम केला जावा का? अमेरिकेतल्या मराठी कुटुंबात वाढणाऱ्या मुलांमध्ये मराठी रुजावी म्हणून बृममंकडून काही उपक्रम असतात का?

आशिष: मुळात माझं वैयक्तिक मत आहे की कोणताही उपक्रम राबवताना काळाचा प्रवाह ओळखून गेलं पाहिजे. आजच्या इथल्या तरुण पिढीला रुचेल, आवडेल अशा माध्यमातून जर ते त्यांच्या समोर मांडलं तर त्यांना ते निश्चित आवडतं. आता मराठी मंडळात मराठी बोलायचं यानं मुलांना नक्की फायदा होईल. पण ते चांगल्या स्पिरीटमध्ये राबवलं गेलं पाहिजे. या मुलांची मानसिकता समजून घेतली पाहिजे. इथे घरात सोडलं तर मराठी त्याच्या कानावर पडत नाही. माझी मुलगी १६ वर्षाची आहे. ती उत्तम मराठी बोलते पण तिकडे भारतात गेलं की. कारण तिला वाटत की आजी-आजोबा, नातेवाईक यांना इंग्रजी येणार नाही. तेच इथे तिला माहिती आहे, आई-बाबांना इंग्रजी समजतं की मग मराठी बोलेलच असं नाही. ती फ्रेंच अकॅडेमीची स्कॉलर आहे. तिथे नियम असतो की वर्गात गेलं की बोलायचं ते फ्रेंचमध्येच. तो नियम शिक्षकांपासून सर्वजण कटाक्षाने पाळतात. त्याच धर्तीवर पालकांनी आणि मंडळांनी हे राबवलं तर मुलं मंडळात मराठी बोलतीलच. आता मराठी रुजावी म्हणून बृममं वेगवेगळे कार्यक्रम राबवत असतो. आपल्याकडे तरुणांसाठी "मैत्र"च व्यासपीठ आहे. पुढच्या वर्षी जानेवारीपासून वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा चालू होत आहेत. त्याची अंतिम फेरी आणि समारोप बृममंच्या अधिवेशनात होईल. यामध्ये विजयी होणाऱ्या मुलांना बक्षीस रुपात महाराष्ट्रात किल्ला सफारी किंवा तत्सम शिबिरांना पाठवावे असाही विचार चालू आहे. जेणेकरून त्यांची नाळ महाराष्ट्राशी जोडली जाईल. मराठी शाळेबद्दल मी बोललोच. या तरुण मुलांची "Teenager Community" करून त्यांना स्वयंसेवक म्हणूनही प्रोत्साहित केलं आणि मुलांनीही मराठी मंडळात जवाबदारीने कामे केली.

सायली: ऑनलाईन मराठी वाचनालय संकल्पनेवर तुमचे विचार जाणून घ्यायला आवडतील. बृममंकडून काही प्रयत्न आहेत?

आशिष: हो आहेत ना. आताच्या काळात म्हणशील तर ऑनलाईन मराठी वाचनालय हीच संकल्पना आणायचा विचार आहे. कारण अमेरिका देश मोठा त्यामुळे कागदी पुस्तकाचं वाचनालय तितकंसं उपयोगी नाही. डिजिटल व्हर्जन हवं. सध्या बुक गंगा आणि ढवळे प्रकाशन यांच्याबरोबर चर्चा चालू आहे. बालवाड़मय ऑनलाईन आणायचं ठरतं आहे. याचा लाभ सर्वांना घेता येईल. आता समग्र गडकरी किंवा अत्रेंचा पूर्ण लेखन संग्रह आणि तत्सम अनेक मोठे ग्रंथ प्रकार एकदम आणणे शक्य होणार नाही. त्यामुळे छोट्यापासून सुरुवात करतो आहोत. बृममंच्या मासिक वृत्ताचे उदाहरण घे. पूर्वी ते फ्री ऑनलाईन नव्हते. मागच्या दसऱ्यापासून आता आम्ही ते उपलब्ध केले आहे. त्याबरोबर आपण जाहिरातीही स्वीकारतो ज्यातून वृत्तासाठी वर्गणीसारखाच निधीही जमा होतो आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यातही फ्री पब्लिकेशनचा उपयोग होतो. लोकांचा प्रतिसादही उत्तम आहे. म्हणजे मराठी वृत्त वाचलं जातं याची ती पावतीच आहे.

सायली: पॉडकास्टच्या माध्यमातून मराठी लोकांच्या डिरेक्टरीबद्दल समजले. अमेरिकेतल्या अनेक मराठी स्त्रियाही नोकरी करतात. त्यांना मुलांना अमेरिकन baby seating पद्धतीत ठेवावे लागते. मराठी मंडळातल्या काही स्त्रिया गृहिणी असतात. त्यांच्या माध्यमातून मराठी मुलांसाठी पाळणाघर चालवता येईल का?

आशिष: हो, मराठी डिरेक्टरीचा उपयोग झाला होता. आता तरी IT मुळे बरीच भारतीय अमेरिकेत येतात. पूर्वी संपर्कासाठी म्हणून आम्ही डिरेक्टरी केली होती. डिरेक्टरी काय किंवा baby seating काय, यामध्ये मंडळचा सहभाग हा माहिती देणे इतकाच असू शकतो. प्रत्यक्ष मदत शोधणारा आणि काम करणारा वेगळेच असतात. तर त्या धर्तीवर मी म्हणेन की मराठी मंडळ माहिती उपलब्ध करून देण्याची महत्वाची भूमिका वठवू शकतं. मराठी लोकांची डिरेक्टरी, पाळणाघर चालवणाऱ्यांची डिरेक्टरी, भटजी / पूजा या बाबतीत मार्गदर्शन अशा स्वरुपात. गुजराती लोकांची शांतीनिकेतन आहे, त्याच धर्तीवर आम्ही "उत्तररंग" हा retirement community संदर्भातला उपक्रम राबवतो. मासिक वृत्तात तू त्याबद्दल वाचलं असेलच. ज्यात आम्ही लोकांना माहिती देतो, मार्गदर्शन करतो.

सायली: आशिष तुमच्याकडून खूप छान माहिती मिळाली. सगळ्या प्रश्नांना तुम्ही समर्पक आणि दिलखुलास उत्तरं दिलीत याबद्दल खूप धन्यवाद! या मुलाखतीचा ऑस्टिनकरांना लाभ होईलच.

आशिष: अवश्य. नवीन काही कल्पना असतील तर त्या जरूर राबवा, आम्हालाही सुचवा. बृममंच्या वतीने त्यावर विचार करू अथवा मार्गदर्शन देऊ. सध्या म्हणूनच आम्ही अमेरिकेतल्या सर्व मराठी मंडळांना बृममंच्या छत्राखाली एकत्रित आणू इच्छितो. ज्याच्यातून एक समान धागा विणता येईल. तुमच्या मंडळातले कार्यक्रमही आम्हाला पाहायला आवडतील. ज्याने इथल्या कलाकारांना अजून मोठा रंगमंच मिळेल. कदाचित यावर्षीचे "कृष्णायन" आणि "गर्जा महाराष्ट्र माझा" यांना अधिवेशनात सादरीकरणाची संधी असेल. तर पुढील वर्षी अधिवेशनाला जरूर या.

ऑस्टिन मराठी मंडळाला दिवाळीच्या खूप शुभेच्छा!

अनिवासी भारतीयांच्या मुलांसाठी ज्ञान प्रबोधिनीच्या हराळी केंद्रात आनंद शिबीर

दि. २८ जुलै ते ५ ऑगस्ट २०१२ या काळात ज्ञान प्रबोधिनीच्या हराळी येथील शिक्षण-शेती संकुलात अनिवासी भारतीयांच्या मुलांसाठी एक आनंद शिबीर झालं. मराठवाड्यातल्या अस्सल ग्रामीण जीवनाची चव अमेरिकेतल्या आणि मध्यपूर्वेतल्या मुलांनी चाखली. शिबीर होतं साठ एकरांच्या निसर्गरम्य हिरव्यागार परिसरात. तिथे सात हजार फळझाडे बहरलेली होती. त्यात काजू, आंबा, डोंगरी आवळा,

पेरू, बोरे, लिंबू, चिंच अश्या वेगवेगळ्या बागा होत्या. या बागांमधून मुलं मनसोक्त भटकली. बागांमध्ये त्यांना जंगली ससे, हरणं, पिसारे फुलवलेले मोर भेटले. तऱ्हेतऱ्हेची फुलपाखरे, पक्षी, त्यांचे प्रकार तरी किती सांगावेत? शिवाय सिंगापूर चेरींच्या शीतल सावलीत जोपासलेली फळा-फुलांची कितीतरी रोपं, डेरेदार आंबे, शेतांमधली तळी! मुलं खुश होती. हरळी गावातल्या मुलांसोबत त्यांची मैत्री झाली. शिवाय काही अन्यप्रांतीय मुलेही होती.

२८ जुलैला मुलं आली ती जरा साशंक मनाने. भारतातल्या एका छोट्या खेड्यात आपण कसं राहायचं? खायला काय असेल? साध्या साध्या सोयी तरी असतील की नाही? पाणी शुद्ध असेल की नाही? पालकांनाही जरा काळजी वाटत होती. अचानक त्रास झाला तर डॉक्टर भेटेल की नाही? मुलं रमतील की कंटाळतील? परंतु प्रबोधिनीच्या सोलापूर केंद्रात झालेलं प्रसन्न स्वागत, तिथल्या सुविधा, चवदार न्याहारी यामुळे बिचकलेपणा कमी झाला. सोलापूरपासून हराळी ७४ कि. मी. वर आहे. गाड्यांमधून दुपारपर्यंत मंडळी डेरेदाखल झाली. हराळीची प्रदूषणमुक्त निर्मल हवा, झुळझुळ वारा वासरांच्या कानात शिरला! आल्या आल्याच ती मोकळेपणाने बागडू लागली! राहण्याची व्यवस्था हवेशीर, प्रशस्त होती. पाणी निर्जंतुक शुद्ध होतं. काळजी घ्यायला डॉक्टरताई होत्या आणि उत्सुकतेने त्यांच्याकडे पाहणारी दक्षिण मराठवाड्यातील ग्रामीण भागातून आलेली हसरी मुलं मैत्रीचा हात पुढे करत होती!

पाहता पाहता दोस्ती जुळली! मग ते सगळे मिळून सकाळी शांतपणे डोळे मिटून प्रार्थना करू लागले. नंतर श्रुतिताई नावाची एक चपळ ताई त्यांना दोरावराचा मलखांब करायला शिकावी. ओमानहून आलेला जिष्णू अंगाने जरा आडवा. त्या दोराकडे

पाहून तो म्हणाला, "मी चढलो तर हा दोर नक्की तुटेल. मी आपला घोड्यावरच बसतो झालं!" जिष्णू धरमसी ऐटीत घोड्यावर स्वर झाला. दोन चपळ घोड्या मुलांना घेऊन दिवसभर लेकुरवाळ्या आयांसारख्या मिरवत असत! स्नेहसदन आणि भास्करनिवास या दोन इमारतींमध्ये एक दोर बांधला होता. त्या दोरावरून एका इमारतीच्या गच्चीतून दुसऱ्या इमारतीच्या गच्चीवर जाऊन उतरायचं हा रोमहर्षक अनुभव होता. मुलांना हे साहस आवडलं. प्रथम जरा अवघडलं. मग सरासर माकडांसारखी मुलं दोरावरून प्रवास करू लागली. शिवाय दोराच्याच मदतीने सफाईने इमारतीच्या भिंतींवरून उतरायलाही लागली! मुलींनी हे सारं केलंच पण त्या जास्त रमल्या त्या मोत्यांचे सुरेख-सुरेख दागिने तयार करण्यात. राधिकाताई कोरके त्यांना नवे नवे दागिने शिकवत होत्या. लक्ष्मीहार आणि कमरपट्यासारखे अवघड दागिनेही मुली सहज शिकल्या. कॅलिफोर्नियाच्या आश्लेषा साठेचा हा फोटो पहा! तिने स्वतः केलेले दागिने तिने घातले आहेत! राधिकाताईंनी मुलींना सुंदर सुंदर रांगोळ्या शिकवल्या. शेवटच्या दिवशी तर भव्य गालिचाच काढला मुलींनी!

प्रबोधिनीच्या लताताई (डॉ. स्वर्णलता भिशीकर) या मुलांशी मनमोकळा संवाद करायच्या. त्यांना छान-छान गोष्टी सांगायच्या. मस्कतची प्रियांका भट्ट लिहिते, "मला Color of love आणि Greek Dancer या गोष्टी खूप आवडल्या". कलर ऑफ लव्ह - प्रेमाचा रंग या राजस्थानी गोष्टीत कुठलीही गोष्ट कोरडेपणाने करायची म्हणून करू नये तर त्यात प्रेमाचा रंग भरावा असं सूत्र होतं. स्वतःला विसरून नृत्य करील तिलाच मी प्रसन्न होईन! असं सांगणारी ग्रीक देवता आपल्या कलेचा गर्व करू नये हे शिकवून गेली. शिवाय मुलांच्या कितीतरी रोजच्या जीवनातल्या प्रश्नांची उत्तरं त्यांनी लताताईंबरोबर शोधली. संरेखाताईंकडून त्यांनी रवींद्रनाथ टागोरांची गीतं ऐकली. प्रियांका आणि श्रेया या मस्कतहून आलेल्या बहिणींनी हराळीच्या मुलींची दोन सुंदर नृत्य बसवून घेतली. एका मुलाला तर सृष्टीचं सौंदर्य पाहून कविता सुचायला लागल्या! शिल्पाताईंनी मुलांना योग-प्राणायाम शिकवला तो ही मुलांनी आवडीने केला. समारोपाच्या दिवशी सर्वांनाच हुरहूर वाटत होती.

समारोपाला आलेले पालक म्हणाले, "या वेळी शिबिराची सूचना दोन महिनेच आधी मिळाली. पण तुम्ही पुढच्या शिबिराची सूचना आठ महिने तरी आधी द्या म्हणजे आम्हाला विमानाचं बुकिंग त्याप्रमाणे करता येईल. आमच्या मुलांना शिबीर खूप आवडलं आहे. अमेरिकेतल्या भारतीयांच्या मुलांना हे खात्रीने आवडेल! शिवाय पालकांना राहायचं असेल तर त्याचीही व्यवस्था करा!"

या सगळ्या सूचना लक्षात घेऊन पुढचं अनिवासी भारतीयांच्या मुलांचं शिबीर १५ जुलै २०१३ ते २४ जुलै २०१३ या काळात योजलं आहे. 'अडॉप्ट अ व्हीलेज' या लॉस एंजिल्सच्या संस्थेचे श्री. वामन आणि सौ. अनुराधा गानू यांनी पहिल्या शिबिराचा प्रसार

मनापासून केला. तसंच टेक्सास मधल्या सायली मोकाटे-जोग आणि टोरोंटोच्या सुनंदाताई टुमणे यांनीसुद्धा दुसऱ्या शिबिरासाठी संपर्क व्यक्ती म्हणून काम करायचं मान्य केलं आहे. त्यांच्याकडून शिबीराचं माहितीपत्रकही मिळू शकेल.

जुलै २०१३ मधल्या अनिवासी भारतीयांच्या मुलांच्या हराळीतल्या शिबिराचं शुल्क **प्रतिव्यक्ती** (मुलं आणि पालक) **५५० अमेरिकन डॉलर्स** आहे. **धनादेश 'Adopt a village Inc' या नावाने असावेत.** ते या संपर्क व्यक्तींकडे आपण पाठवून नावनोंदणी करू शकाल. या मित्र-मैत्रिणींचे ई-मेल आणि संपर्क पुढे दिले आहेत.

Vaman and Anuradha Ganu

Email:
Vaman.Ganu@coronapowersystems.com

Phone: 951-279-8870 951-279-8870

Sayali Mokate-Jog

Email: sayali.mokate@gmail.com

Phone: 818-620-7119 818-620-7119

Sunanda Madan Tumne

Email: s_tumne@yahoo.com

Phone: 905-828-2211 905-828-2211

अधिक माहिती फेसबुक संकेतस्थळावर पहा:
http://www.facebook.com/JnanaPrabodhiniHaraliSummerCamp

- ज्ञान प्रबोधिनी, हराळी

देवाचा पत्ता

-सिमरन शंतनू तेंडूलकर

देवाचा देता का पत्ता, मला भेटायचे आहे त्याला आत्ता.

का बनवलेस गरीब माझ्या देशाला?

दोन वेळचे जेवण नाही छोट्या मुलांना.

हे पाहून तुला येत नाही का रे दया?

हृदयात तुझ्या साचत नाही का रे माया?

घराचे छप्पर आणि पोटभर अन्न

मिळाले तरी हे चेहरे होतात प्रसन्न.

रोजची कमाई म्हणजे मूठभर नाणी

उन्हातान्हात फिरून क्षीण झालेली वाणी.

रोजचेच त्यांचे ते मळके कपड़े

जन्मभरासाठीचे ते घर त्यांचे उघडे.

अंगाने अधू काही, त्यांच्यावर तुझे लक्षच नाही

दिले नसलेस काही तरी दिले आहेस खुप काही,

जगण्याची आशा त्यांच्या नसानसातून वाही.

तुझे मानू किती -किती धन्यवाद

कारण माझे अवयव देतात मला साद.

सर्वांना कर माझ्याप्रमाने

हेच तुज्या चरणी गाऱ्हाणे.

दीप उजळती नक्षत्रांचे आली दिवाळी अंगणी

मधुरिका गडकरी

'दीप उजळती नक्षत्रांचे' अशा मंगल प्रकाशाची दिपावली हा समस्त उत्सव प्रेमिकांचा आनंदाचा सण! किंबहुना, देवी भवानीच्या प्रसन्न नवरात्रीच्या मंगल कृपाछायेत अतिव आनंद–उल्हासाच्या अक्षय सुवर्णीचा उधळण करणारा दसरा हा जर उत्सव राज असेल, तर दिपावली ही उत्सव सम्राज्ञी आहे! राज दर्शनात ऐश्वर्याची शान असते. तर, महाराणीच्या स्वरूपात सौभाग्य संपदा एकवटलेली असते.

आपण सारे विविध सणवार आपापल्या परंपरेनुसार साजरे करीत असतो. मात्र, दिपावली हा एकच सण केवळ राष्ट्रीय नव्हे तर, अंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होणारा, समस्त हिंदूसह विविध जाती–धर्मीत तेवढ्याच उत्साहात–खेळीमेळीच्या वातावरणात मनामनाला जोडणारा सण आहे.

दसरा येतो तोच मुळी दिपावलीच्या आगमनाचा शुभ संदेश घेऊन. त्या नंतर उगवणारी कोजागिरी पौर्णिमा देखील आकाश दिपदान, लक्ष्मी व सरस्वती देवतांचे पुजन, आटवलेल्या केशरी दुधाचा आस्वाद घेत–घेत केलेले रात्रीचे जागरण, अशांसह सस्मरणीय ठरते. देवी लक्ष्मीची कृपा व देवी शारदेचे आर्शिवाद असल्या शिवाय दिपावली साजरी कशी होणार ? जणू, हाच संकेत कोजागिरीच्या रूढीमागे असावा. या नंतर, मनामनाला वेध लागतात, ते दिपावलीच्या आगमनाचे.

मनामनातला अंधार दूर करणारी अशी ही दिपावली!

नुतन वर्षाच्या सुखसमृध्दीचा आलेख घराघरात पोहचविणारी अशी ही दिपावली!

सकल सुखदायिनी, सकल आनंददायिनी अशी ही दिपावली! पारंपारिक स्वरूपात तिचे स्वरूप असे आहे. अश्विन कृष्ण द्वादशीला गोवत्स द्वारशी, व वसुबारस असे म्हणतात. त्या दिवशी गाईची पुजा करावी. तिच्या पायावर ताम्रपत्राने अर्ध्य देऊन प्रार्थना करावी,

'क्षीरसागरात निर्माण झालेल्या आणि समस्त देवदैत्यांनी वंदन केलेल्या हे गोमाते तुला माझा नमस्कार असो.'

नंतर, उडीद वडा–गुळ यासह गोग्रास द्यावा. त्यावेळी ती साक्षात आपल्या सर्व इच्छा पूर्ण करणारी कामधेनु आहे. अशा भावनेने तिचे पुजन–वंदन करावे. याच गोवत्सद्वादशीपासून पाच दिवस निरांजनविधी करावा, असे आपल्या धर्मात नारदमुनींनी सांगितले आहे. घरातील लहान–थोरांना ओवाळण्याचा विधी इथुनच सुरू होतो. देव, ब्राम्हण, गाई, घोडे, ज्येष्ठ, श्रेष्ठ, कुटुंबातील पुरूष, मुले, स्त्रिया यांना ओवाळावे.

अश्विन कृष्ण त्रयोदशीला 'धनत्रयोदशी' असे म्हणतात. या दिवसाचे महत्व असे की, अपमृत्यु टाळण्यासाठी सायंकाळी घराबाहेर दिपदान करावे. या दिवशी आपल्या इच्छेप्रमाणे नवीन भांडे खरेदी करून, त्यात नवे धने–गुळ घालून मनोभावे पूजा प्रार्थना केल्यास मनोवांछित धनसंपदा प्राप्त होते. सगळयांनाच नकोसा असलेला तो नरक. मग, तो या लोकातील असो, वा परलोकातील, सारेच नरकाला भितात. या सर्वांसाठी 'नरक चतुर्दशी' हा दिवस आहे. अश्विन कृष्ण चतुर्दशीला येणाऱ्या या तिथीला तिळासह पहाटे अभ्यंगस्नान करावे. या दिवशी अभ्यंगस्नान केल्याशिवाय कोणीही राहु नये. सुवासिक तेलासह–सुगंधी द्रव्यासह सुस्नात व्हावे. या दिवशी अभ्यंग स्नान नकरणारा नरकात जातो. पहाटेला घरा–दारात दिपक लावावेत घरात देवपूजा करून मिष्ठान्नांचा नैवेद्य दाखवावा. नवीन वस्त्रालंकार लेवून मंदिरात देवदर्शनाला जावे. परस्परांचे शुभचिंतन करावे. सायंकाळी घरादारात देवालयात, मठात, बागेत, सगळीकडे सुंदर दिप लावावेत.

आकाशदिप लावावेत. भाद्रपद वद्यतील पंधरवाड्यात आवाहन केलेल्या पितरांना परत जाण्यासाठी मार्ग दिसावा, ही भावना या मागे आहे.

आपण दिवाळी दिवाळी म्हणतो ती हीच. अरूणोदयाच्या अभ्यंगस्ननापासून सुरू होणारी. अनिव आनंद–सुखाची! मिष्ठान्न भोजन, रूचकर फराळाचे पदार्थ, फटाक्यांची अतिषबाजी, नवनविन वस्त्रालंकार व ऐपतीनुसार सुवर्ण अलंकरांची खरेदी, अशी ही धुमधडाक्यात साजरी होणारी दिपावली!

अश्विन वद्य अमावस्या हा दिवाळीतील एक महत्वाचा दिवस असतो. या दिवशी प्रातःकाली अभ्यंगस्नान व सायंकाळी दिपदान हे विशेष महत्वाचे आहे. या दिवशी लक्ष्मीसह देवाचा कोषाध्यक्ष जो कुबेर त्याचीही मनोभावे पूजा अर्चना करावी. "धान्य, धन, पशु, सुख यासह उज्वल कीर्ती दे" अशी प्रार्थना करावी. व्यापारी वर्गासाठी हा अगामी वर्षारंभाचा दिवस खास महत्वाचा असतो. सायंकाळी मंगल धुप–दिप, सुगंधी पुष्पहार व पंचमिष्ठन्न

यासह श्रीलक्ष्मी देवतेची व पैसे–अलंकार–रूपे अशांची पूजा करून स्थिर लक्ष्मी निवासासाठी मनोभावे प्रार्थना करावी.

अश्विन मास संपताच कार्तिक महिन्याच्या पहिल्या दिवशी येणारी प्रतिपदा म्हणजे, भारतीयांच्या साडेतीन शुभ सुवर्ण मुहूर्ता पैकी अर्धा मुहर्त असलेली बलिप्रदिपदा अर्थात पाडवा होय. दिवाळीच्या शुभ प्रसंगी सुखक्षणांनी भारलेला हा दिवस सकल कुटुंबियांसाठी विशेषच प्रतिक्षा व अपेक्षेचा असतो.

या दिवसाला बलिप्रदिपदा म्हणतात.

या नंतरचा दिवस म्हणजे पाडण्याचा वास्तविक, विरोचनाचा पुत्र बली हा एक महाप्रतापी दैत्य, पण, महान भगवंतभक्तांमध्ये त्याची गणना होते. त्याची पूजा करून कुठलेही दान केले तरी, श्रीविष्णू कृपेचा लाभ होतो. बली हा भविष्यकाळातील इंद्रच आहे. त्या बलीची पूजा या प्रदिपदेला करायची असते, म्हणून ही बलिप्रदिपदा!

"बलिराज नमस्त्युभं

विरौचनसुत प्रभो

भविष्येंन्द्र सुराराते

पूजेयं प्रतिगुहस्य नाम"

बलीची पूजा करून या मंत्राने प्रार्थना करावी. या प्रतिपदेला दिवाळीचा पाडवा म्हणतात. या दिवशी कुठल्याही दुःखाचा, संकटाचा, काळजीचा पुसटसा विचारही मनात आणु नये. कारण, हा दिवस आपण जसा घालऊ, तसेच संपूर्ण वर्ष जाते. बलिपुजनानंतर द्युतक्रिडेचे विशेष महत्व आहे. या दिवशीची लक्ष्मी पूजा गो पूजा असते. गोमाता ही खरोखरच अपूर्व धनलक्ष्मी आहे. सायंकाळचे दिपदान हे वंशाचा दिवा कायम तेवत रहावा म्हणून महत्वाचे आहे. सायंकाळी प्रथम घरातील देवदेवतांना व नंतर, पत्नीने पतीला, मुलीने वडिलांना ओवाळावे. गोवर्धन पर्वताच्या प्रतिकृतीचे पूजन श्रीकृष्णासह करून महानैवेद्य अर्पण करावा. गाय, ब्राम्हण व गोवर्धनाला मनोभावे सुखसमृध्दीसाठी प्रार्थना करावी. पूर्व दिशेला दाराबाहेर लावलेल्या आकाशदिपालाही वंदन करून प्रकाशमय जीवनासाठी आवाहन करावे. रात्री संगीत–गायन, वादनाचा श्रवणानंद अनुभवावा.

पाडव्या नंतर येणारी यम द्वितीया सर्वत्र भाऊबीज म्हणून ओळखली जाते. दिवाळीचा हा शेवटचा दिवस म्हणजे, भावा–बहिणीच्या अपूर्व प्रेमाच्या परिणीतीचा असतो. या दिवशी यमुनेने आपल्या भावाला, यमाला ओवाळले, जेऊ घातले होते. म्हणून ही यम द्वितीया! या दिवशी भावाने बहिणीकडे जाऊन जेवावे. निरांजनाने ओवाळून घ्यावे व तिला यथाशक्ती वस्त्रालंकार द्यावेत. असे केल्याने धन धान्य व सुखप्राप्ती होते. या दिवशी चित्रगुप्त, यमदुत व यमाचे पूजन करून यमाला अर्ध्य द्यावे.

असे हे दिपावलीचे यथार्थ स्वरूप आहे. देश–धर्म–जातींच्या भींती ओलांडून घराघरात सुखसमृध्दीची उधळण करणारी ही दिवाळी सर्वांना सुखमय होवो हिच परमेश्वराला प्रार्थना!

नंदादीप

-श्रीमती प्रतिभा प्र कुलकर्णी

देहाची समई । रक्ताचे अमुप

त्यात तेल तुप ओसंड़ते

जिवाला पिंजोनी निवडीला स्वार्थ

वळल्या फुलवाति यथार्थ

तेज हो अखंड । शांत पवित्र्याचा

थोर चरित्र्याचा । नंदादीप

हा एकच नंदादीप

पण दीपमाळ करणार

हा आसाच तेवत जगती

निज प्रकाश तीस देणार ।।

दीपावली संस्कृत लेख

श्री धन्वन्तरये नमः

दीपावलिदिनेषु एकः दिवस: श्री धन त्रयोदशी इति वर्तते तस्मिन दिने श्री धन्वंतरिस्मरणं अवश्यम कर्तव्यम अद्य आरोग्यस्य अतीव आवश्यकता वर्तते अनेके अनेके जनाः अनेकैः रोगैः पीडिताः औषध - उपचारा: प्रचलंति एव किंतु श्री धन्वंतरि देवस्य कृपा आवश्यकी ते देवानाम वैद्याः तेषां मूर्तिः तेजस्विनी । ते महान्तः शस्त्रकर्मनिपुणाः । तेषाम एकः हस्तः रुग्णेभ्यः अभयं ददाति । एकस्मिन हस्ते अमृतघटः नाम आरोग्यस्य घटः वर्तते । एकस्मिन हस्ते जलौका नाम जळू विद्यते । सा अशुद्धम रक्ताम शोषयति । ते सर्वरोगनाशकाः पण्डिताः । तेषां कृपया आरोग्यं प्राप्तं भवतु इति प्रार्थना इ तेभ्यः नमो नमः ।

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।

सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद दुःखितो भवेत ॥

सर्वांसी सुख लाभावे तशी आरोग्यसंपदा ।

कल्याण व्हावे सर्वांचे कोणी दुःखी असू नये ॥

असो अगदी सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा पणती जपून ठेवा अंधार फार झाला ॥

प्रकाश उजळू दे प्रकाश उमलू दे ॥ चिरविजयाची साद द्याया आज ही आली दिवाळी ॥ घेऊन करी ही पणती , मागुती न जाणे पुढती , करू नंदनवन भारती ॥

चलो दीपमालिकापर्वपर जयके दीप जलाये , जयके दीप जलाये ॥

-सुहास हरी जोशी द्वारा मोरेश्वर आणि अर्चना वझे २० विंटरबेरी वे , बेदफर्द ma अच्छा सदिच्छा: ।

झाडांची गोष्ट

-सिमरन शंतनू तेंडूलकर

चला मुलांनो आज ऐकुया गोष्ट साऱ्या झाडांची

साऱ्यांमध्ये उंची सर्वात जास्त आहे माडांची

पहिला आला आंबा, तो म्हणाला थांबा

राजा मी फळांचा, आवडता मुलांचा

नीम आला दाखवत हात, मी धुतो सर्वांचे दात

वादळावर करतो मात, प्रदुषणाला मारतो लाथ

चला मुलांनो आज ऐकुया गोष्ट साऱ्या झाडांची

जरा करू परतफेड त्यांनी आपल्याला दिल्या लाडांची||

धावत आली केळी, सर्वांनी वाजवली टाळी

डोक्यावर घेऊन आली, सफरचंदाची मोळी

आलं हसत सफरचंद, म्हणालं माझी चालच मंद

लालचुटूक माझा रंग, आतून आहे पिवळसर अंग

चला मुलांनो आज ऐकुया गोष्ट साऱ्या झाडांची..

रसाळ कलिंगड आलं, त्याच धूड घेऊन लोळत

सर्वांसाठी गोड गोड फळ, घेऊन आलं धावत

चिंच आली मुरडत, जणू कॅटवॉक करत

म्हणते मी धावत आले, सर्वांची पिशवी भरंत

चला मुलांनो गोष्ट ऐकुया आपण साऱ्या झाडांची..

चिकू - पेरू भाऊ भाऊ, म्हणाले आम्ही आणलाय खाऊ

खाल्ल्यानंतर परत जाऊ, अधून मधून भेटत राहू

द्राक्ष आलं चालत, सर्व झाडांशी बोलत

म्हणलं मी गाणं ऐकत आलो, नाचत नाचत डोलंत

टाळ्यांचा गजर

दिलीप वसंत घाटे

चित्त स्थिर नसते म्हणतात ना तशीच स्थिती झाली होती केशवाची. सुचण्याची क्रियाही बंद पडली होती, घड्याळाची टक-टक बंद पडावी तशी.त्या लहानश्या खोलीत दिवा मात्र जळतच होता. रात्रभर केशवाच्या येरझा-या मात्र चालू होत्या. मुठी वळत होत्या.राग नावाची चीज त्याचे मन पोखरत होती. परंतु त्याच्या पायाला मिळालेली गती थांबली नव्हती. त्याची नजर भिरभिरत होती. समोरच्या टेबलावरील तसबीरीकडे पहात तो पुटपुटला, "एवढे मोठे काका!..... पण काय झाले त्यांना? असे का भ्रमिष्टासारखे वागतात? ..... का मुद्दाम करतात?....."पण समोर हाताची घडी करून उभे असलेले स्वामी विवेकानंद जास्त करारी मुद्रेने आपल्याकडे पाहात आहेत असे त्याला वाटले आणि तो हलला. खिडकीपाशी आला; आणि जोरात ओरडला, "काका!..... धर्म,नीति,.....तुमची नाही तरी लोकांची श्रद्धा! काहीच कसा विचार करत नाही तुम्ही?.....आपले देऊळ विकू नका काका.....तसे केलेत तर देव विकल्या सारखे होईल. काका" केशवाला काका असल्याचा भास झाला. तो मागे वळला आणि त्वेषाने म्हणाला, "नाही काका, मी आपले देऊळ तुम्हाला विकू देणार नाही!"

पहाटेचे पाच वाजले होते. केशवाची बोटे सतारीवरून सराईतपणे फिरू लागली.सतारीचे ते मधुर स्वर त्या खोलीत घुमत होते. पण केशवाचे मन त्यात लागत नव्हते.इतक्यात त्याला ऐकू आले आरतीचे स्वर... टाळ्यांचा गजर...सतार तशीच खाली ठेऊन तो खोलीबाहेर पळाला. देवळाच्या पाय-या चढून तो आत आला. देवाची आरती सुरु झाली होती. टाळ्यांच्या गजरात. तोही सामील झाला. अगदी एकरूप ...

देऊळ तस पडकंच होत. पण आतील देव जागृत होता. देऊळाच्या भोवती बाग फुललेली होती. देऊळाच्या भिंतींना एकदोन भोके पडलेली होती. मी बागेतच बसलो होतो. आजोबा सांगत होते. आरती संपली. सारेजण निघून गेले. आरती झाली, सगळे निघून गेले की मग साक्षात भगवान बाहेर पडतात असे मी ऐकले होते. मी भिंतीजवळ आलो आणि भोकातून पाहू लागलो. पण.....

आरती झाली तरी केशवाचे डोळे बंद होते. त्याचे ध्यान लागले होते. अश्रू ओघळत होते. दर्शन झाले होते. त्याने हात जोडले. एवढयात एका माणसाचा केशवाला धक्का लागला.त्याने डोळे उघडले.दर्शन झाले होते काकांचे. त्याला अंधेरी आली. त्याला सभोवती अंधार दिसू लागला...भुयारासारखा.....त्या अंधारात काका उभे होते. केशवाच्या मार्गातला एक अडथळा.... .

एका मोठ्या विकट हास्याने मी दचकलो.

"केशवा, तू इथे आजही आहेस तर.....!असा रोजच येतोस म्हणा! आणि असा रडतोस काय भागुबाई सारखा....!"

"नाही..."

"हे बघ..."

"नाही काका ... मी..."

"अरे पण इतके का वेड लावले आहे त्या आरतीने? श्रध्दा असावी. माझीही आहे. आत्तापर्यंत अनेक प्रसंगातून देव आहे याची प्रचीती मला आलेली आहे. मला ते मनोमन पटलेही आहे. अरे बाबा! तुझे वय

काय? ह्या किशोर वयात तुला ह्या देवाने, या आरतीने,या टाळयांच्या गजराने वेड लावावं .... आणि तुही असाच अनेक कला अवगत असूनसुद्धा, सारी हुशारी असूनही भरकटत रहावस....सारं विचित्र आहे बघ."

"थांबा! काका थांबा!! मलाही असे का आहे ते कळत नाही.मीही त्याच्याच शोधात आहे. पुष्कळ विचार करतो... रोज... पण खर सांगू काका? विचार करता करता असा काही विचार सुचतो की एक सुसंबध्द ,सुसूत्र अशी एक कथा जुळत जाते."

"कथा! कथा!! कथा!!! ह्या तुझ्या कथेचा मला काहीच अर्थबोध होत नाही. सारं गूढ आहे तुझे....!स्वत:ला तू समजतोस कोण? तत्वज्ञानी, साहित्यिक, कि संशोधक?"

"पण त्या कथांचा शेवट अनुत्तरीतच राहतो. त्या अनंत असतात."

"केशवा बस कर हे!"

"शेवटाचा आकार न घेता जुळतात, स्वत:भोवतीच फिरतात. सूर्य- मालेतल्या भव्य पृथ्वीसारख्या" केशवा शांतपणे बोलून गेला खरा पण त्यामुळे काका भडकले.

"अस? म्हणजे सर्वांपेक्षा तू काही वेगळाच दिसतोस! केशवा..आपण काहीतरी अचाट करावे आणि जगापुढे यावे ही लाडकी आशा प्रत्येक माणसाच्या डोक्यात घर करून राहिलेली असते. पण तुला असे काहीच वाटत नाही. माणस आपल्याला शक्य होईल तसे शिकतात, नाव कमावतात आणि गडगंज पैसा मिळवतात. तुझ्या कलेचा काहीच उपयोग नाही तसा....तुझी हुशारी वाया जातीय... केशवा तू इतका कसा वेगळा, साधा...केशवा, तुला माझ ऐकलच पाहिजे... हे देऊळ विकू. खूप पैसे मिळतील काही न करता ...दूर निघून जाऊ.....मजा करू....तू तुझ्या कला वाढव...आराम करू....केशवा ..."

"हे सारं पोकळ आहे काका. माझ मन, माझ अंत:करण भरीव आहे. त्यात सत्याचा अंश आहे. श्रद्धा, भावना,विचार,माया,प्रेम या सा-यांनी माझे अंत:करण काठोकाठ भरलं आहे. पण तस ते काठोकाठ भरूनसुद्धा सांडत मात्र नाही कि वाहूनही जात नाही. ते फक्त संचित करत जात. जे जे चांगले ते ते मी आत्मसात करीत जातो.....पैसा! पैसा!!पैसा!!!...काका तुम्ही म्हणता तसे सुख पैशाने मिळते, हे काही अंशी सत्यही आहे.पैशाने मजा करता येईल, आराम मिळेल, पण शाश्वत समाधान नाही मिळणार. समाधान मिळेल उपभोगाच! पण उपभोग संपल्यावर काय?"

"आता तू मला शिकवतोस?"

खिशात हात घातला तर पै हाताला लागली नाही. मला केशवाचा राग आला. मूर्ख होता तो. मला काकांचं म्हणणे पटत होत, पण दुस-या हातातली सुगंधी फुलं मला दुसरच काहीतरी सांगत होती. मला केशवाच म्हणण मनोमन पटल होत. मी दोघांच्याही बाजून होतो.

"नाही काका. निदान मला तरी तसं वाटते. लहान तोंडी मोठा घास घेतो आहे खरा मी. पण मला काय वाटत ते विनम्रतेने मी तुमच्यापुढे सादर करीत आहे.येथे मी सुख,समाधान मानतो म्हणूच मी एक एक कला आत्मसात करू शकलो. काका! मी इथेच राहीन हे मंदिर.. हा टाळ्यांचा गजर मला नाही सोडवत. माझ्यादृष्टीने यातच जीवन आहे ....आनंद आहे."

मी ऐकत होतो...चोरून,लपून...रस घेऊन ऐकत होतो.आजूबाजूला कुणीच नव्हते. सर्वत्र शांत होते. पण

इथं विचारांचा संघर्ष होता.युद्ध पेटले होते.पैसा आणि समाधान! मी आतला कानोसा घेऊ लागलो.

"संगीत,चित्रकला,गायन.... अशा अनेक कला आत्मसात करताना देवावरची माझी श्रद्धा मी कधी ढळू दिली नाही.आरतीचे स्वर, टाळ्यांचा गजर,घंटानाद ऐकू येताच मी धावत सुटतो.त्या देवाच्या दिशेने.... होय!काका इतके वेड लावले आहे या आरतीने, या देवाने!अनेक अनुभव अनुभवल्यानंतर तुम्हाला तो आहे हे पटले. पटले फक्त. पण ...पण....मला तो रोज दिसतो. भेटतो. बोलतो. हितगुज करतो. हे सारे वेड आहे काका. पण हे वेड असूनही रेखीव आहे. सुंदर आहे." बघा बघा वेड सुध्दा सुंदर रेखीव असू शकते.

"ठीक आहे केशवा! पण मला तुझी काळजी वाटते. पण तू असा बोलायला लागलास कि ती दूर होते. खरचं यावेळेस तरी असे वाटतेय कि तुझ्या शब्दात सुसंबध्द,सुसूत्र अशी कथा जुळत आहे. रेखीव आणि सुंदर वेड काठोकाठ भरत आहे. पण तू जेंव्हा गातोस,चित्र काढतोस, देऊळाकडे धाव घेतोस , तेंव्हा तुझी काळजी मला अस्वस्थ करते."

"काका, या कथांच्या छटा अनेक आहेत पण त्या एकाच रंगाच्या आहेत. तो रंग म्हणजे प्रकाश. मार्ग वेगवेगळे आहेत पण वेड एकच आहे. माझी श्रद्धा. नुसती देवावर नाही तर अनेक गोष्टीवरही आहे....."

"केशवा!" काकांच्या स्वरात कातर होता.

"होय काका, पण त्या अनेक गोष्टी मी जेंव्हा श्रद्धेने पाहतो तेव्हा मला वेड लागते. तेव्हा अनेक छटांचा प्रकाश मला स्पष्ट दिसतो. पैशाचे 'सुख' मिळते.'श्रद्धा' हा एकाच प्रसाद मला देवाने दिला आहे.त्या देवाला मी धन्य समजतो."

"पण या श्रद्धेने तुला जगातील मोठे कठीण प्रश्न सुटणार आहेत का?"

"काका, या श्रद्धेवर माझी श्रद्धा आहे. मला खात्री आहे कि नुसते प्रश्नच सुटतील असे नाही तर जगातील नानात-हेची कोडी ही श्रद्धा सोडवेल.पण घाण्याला जुंपलेल्या बैलाला कुठली आली श्रद्धा! त्यांना कोडी म्हणजे काळोख,कंटाळा,भूक आणि मानेवरचं जोखड! पण श्रद्धेने कोड्याकडे पाहायचे म्हणजे त्या कोड्यातली तरत-हेची मौज दिसून येते. प्रचंड मौज, तिला अंतच नाही. त्या बैलांच्या डोक्यावरून श्रद्धेचे जीवन वाहून चालले आहे ज्याला ते मिळते तो तृप्त होतो."

"अरे केशवा, पण हे वेड कुठवर? एखादा अपघातात्मक प्रसंग घडला किंवा काही कारणाने अचानक काही प्रसंग ओढवला तर? राहील तुझी श्रद्धा अभंग? संपेल तुझी श्रद्धा. मग?"

"मुळीच नाही काका. कदापी वाटत नाही आणि वाटणारही नाही.या श्रद्धेची मुळे माझ्या मनात खोलवर रुजली आहेत. वरील वृक्षाचा डोलारा एकवेळ उन्मळून पडेल पण काका! ही मुळे कोणीही थोपू शकणार नाही.ती शोध घेत फिरताहेत. दुस-याच्या काळजाचा ठाव घेत ती हिंडताहेत.ही जी मुळांची आकृती सारखी बदलत आहे, रोज नवे रूप धारण करीत आहे. ती पोकळ नाही. भरीव आहे."

"केशवा तू असे बोलायला लागलास की असं वाटत कि बोलतच रहावसं."

"मी जेंव्हा खूप विचार करतो तेंव्हा मला जाणवत की हे जे मी बोलतो,हा जो विचार करतो, तो मी स्वत: आचरणात आणतो. मी स्वत: अनुभवतो. मी जे अनुभवले आहे ते खुपच थोडं आहे. अजून खूप अनुभवायचं आहे. आणि श्रद्धेच्या सहाय्याने ते मी

अनुभविनच..... पण इतरांचे काय माझ्या मित्रमंडळीच काय? हे जाणण्यासाठी ,हे सांगण्यासाठी मी दुस-याच्या मनाचा, अंत:कारणाचा ठाव घेत फिरतोय.हा ही एक अनुभव मला घ्यायचा आहे.! तो घेतल्यावर मी माझा विचार, माझ प्रतिपादन मी जगाला ओरडून सांगेन."

"तुझी तळमळ, तुझ्या मनाची तडफड मी जाणू शकतो. तू प्रभावीपणे व्यक्त होतोस..... मी अस्वस्थ होतो. सुचत नाही. भरकटत राहतो....पण मला मनोमन वाटत आहे की तू भव्य आहेस, दिव्य आहेस."

"काका मी? मी नाही ही श्रद्धा भव्य आहे. दिव्य आहे. श्रद्धा म्हणजे एक क्षेत्र... एक तीर्थक्षेत्र . ...या तीर्थक्षेत्राला जाऊन जो तो पवित्र होतो. पावन होतो....त्याला गती मिळते."

"केशवा, तुझ हे वेड, सुंदर रेखीव वेड, तू मला पण लावलस. तुझ्या एका शब्दात एक अनंत दुसऱ्या शब्दात दुसरे, तिस-यात ....लावलस मला तू हे वेड लावलस. नाही विकायच देऊळ. इथेच राहू आपण दोघे. तुला मी धन्य समजतो."

"रोज मी तुमच्या मनाचा ठाव घेत होतो काका. ..मी कसोटीला उतरत आहे. ..आत्ता कसोटीतील पहिला विजय मिळाला...मला आनंद होतोय. दुस-याच्या अंत:कारणाचा ठाव घेण्याच्या कामातील माझ्या श्रद्धेचा हा पहिला प्रचंड विजय. माझी श्रद्धा..माझा देव...आरती...कथा....वेड...क्षेत्र....तीर्थक्षेत्र..."

" माझा तुला नमस्कार केशवा!"

"काका, हीही एक कथा आहे... अनंत. त्यात प्रकाशाची छटा आहे. तुमची पहिली छटा आहे. तुम्हाला माझा साष्टांग नमस्कार. हे सुंदर रेखीव वेड आहे."

काका भरकट होते. केशव भरकटत होता. जगाच्या एका कोप-यातील एका देऊळात चालेला हा संवाद. मी श्रोता चोरून ऐकणारा. भोकातून डोकावणारा. आत काय झाले? खरोखरच दोघेही एकमेकांच्या पाया पडले. दोघांच्या डोळ्यांत अश्रू. दोघांनी एकमेकांना मिठी मारली. माझेही डोळे अश्रुनी डबडबले. मी ही भरकटलो. केशवाचा दुसरा विजय होता. त्याने दुस-या मनाचा ठाव घेतला होता. टाळ्यांचा गजर कानी येत होता. मी धावत होतो देवाच्या दिशेने.

एक सुसंबद्ध,सुसूत्र कथा जुळत होती. मला वेड लागले होत.

इसविसन २०१२ची गोष्ट. तीन विद्वान एका टेबलाभोवती कोंडाळे करून बसलेले असतात. टेबलावर एका भाड्यात द्रव्य उकळत असते. गोडबोले गुरुजी द्रव्यात बोट बुडवून चाखतात. "अख्खे आयुष्य रस आणि रसायनशास्त्र शिकवण्यात गेलं पण हा प्रयोग काही कळत नाही बुवा. श्यामराव , काही कल्पना?"
श्यामराव: "शास्त्र सोडा, हा काहीतरी काढा असावा. काय वैद्य?"
वैद्य: "विंध्य पर्वतावर असृती मिळते. तिचा काढा असावा."
तेवढ्यात ऑस्टिन मराठी मंडळाचा कार्यकर्ता येतो व भांड्यात डोकावून बघतो.
"अरेच्या ! चहा संपला वाटतं. नवीन लावायला पाहिजे."

शब्दकोडे

						१		२	
३		४		५					
						६			
				७					
				८		९	१०		
		११	१२			१३			
					१४				
		१५							

उभे शब्द

१. ठाशीव व्यक्तिमत्व

२. खमंग, चमचमीत

३. _____ खलनिग्रहणाय: मुंबई पोलीस घोषवाक्य

४. एक 'वेगळे' जोडपे

५. डॉ. अभय बंग यांचे शोधग्राम

९. एकापेक्षा एक

१०. हया आकड्याच्या तिप्पट

१२. पृथ्वी

१४. भिजलेला

आडवे शब्द

१. वर्षभर

३. जीवन विषयी सखोल दृष्टीकोन असलेला एक पु.ल. वल्ली

६. पुरावे

७. सुट्टे पैसे

८. भास्कराचार्यांची कन्या

११. औषधी गोड स्त्राव

१३. फळ अथवा भाजीचा अर्क

१४. दुपट्टा

१५. मावळ्यांचे लढण्याचे मोक्याचे ठिकाण

चैतन्य

स्वाती सु. खेडकर

(माझी मुलगी सुचित्रा धर ही ऑस्टिन ची रहवासी आहे)

माझ्या दोन्ही मुलांची शाळेची वेळ दुपारची झाल्यावर १२ ते ६ हा वेळ कसा धालावायाचा असा प्रश्न पडला. योगायोगाने त्याच सुमारास मला "चैतन्य" शाळेबद्दल कळाले. मी शाळेत चौकशीसाठी गेले असता तेथील भगिनी शाळेत विनामुल्य काम करीत असल्याचे समजले. मी शाळेत काम करण्याची इच्छा प्रकट केली तेंव्हा तुम्ही आठ दिवस येऊन बघा असे सांगण्यात आले. मी शाळेत जाण्यास सुरवात केली आणि बघता बघता महिना कसा झाला हे कळलेच नाही आणि शाळेबद्दल जवळीक निर्माण झाली.

समाजात मुकबधीर, अंध, शारीरीक-अपंग असलेल्या मुलांसाठी बऱ्याच शाळा आहेत पण मतीमंद मुलांसाठी त्यामानाने कमी शाळा आहेत. त्यात सुद्धा अशा शाळा १५ वर्षापर्यंतच्या मुलांसाठी मर्यादित असतात. मग त्यापुढे काय हा मोठा प्रश्न पालकान समोर उभा राहतो. अश्या मुलांसाठी १९८६ साली काही गृहिणींनी एकत्र येऊन "चैतन्य" हि मतिमंद मुलांची उद्योग शाळा सुरु केली. त्याला प्रतिसादही चांगला मिळाला. आई वडिलांच्या मदतीशिवाय एकटी न रहाणारी मुले शाळेत पाच तास निर्धास्त पणे राहून रमून गेली. पालकांनाही थोडी विश्रांती देणे हा हेतू हि त्यात होता.

मुलांना स्वावलंबी करणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांच्यातील सुप्तगुणांचा विकास करणे हि उद्दिष्टे समोर ठेवण्यात आली आहेत. मुलांकडून विविध कामे करून घेणे हे जिकीरीचे काम असते. मुलांचा कल बघून तशी कामे त्याच्याकडून करून घ्यावी लागतात. शाळेत १ हस्तकला शिक्षिका, ३ पगारी मदतनीस असून आम्ही १५-१६ जणी विना वेतन काम करतो.

शाळेत डॉक्टरांना लागणारी औषधाची पाकिटे बनवणे, उदबत्या बनवणे, प्रेझेंट पाकिटे, नोट पॅड बनवणे, लोकरीचे रुमाल, पेंटिंग रुमाल बनवणे, वाल सोलून पोळी-भाजी केंद्रांना पुरवणे, साधी व उपासाची भाजणी तयार करणे, अनेक प्रकारच्या चटण्या तयार करणे इत्यादी कामे सतत चालू असतात. भाजण्यांसाठी मुले धान्य निवडून भाजण्याचेही काम करतात. शाळेत घर-घंटी वर धान्य दळले जाते. त्याचे वजन करून निरनिराळ्या वजनांची पाकिटे करण्याचे कामही मुलेच करतात. त्याशिवाय नैमीत्तिक कामेही आम्ही करतो जसे संक्रांतीसाठी हळदीकुंकू फुले,गणपती साठी मोदक पीठ,दसरा सण या साठी झेंडूची तोरणे, दिवाळीसाठी पणत्या, भेट-कार्ड रंगवणे,आकाश-कंदील करणे,रक्षा बंधन या साठी राख्या तयार करणे अशीही कामे चालू असतात. दिवाळीनंतर शिकेकाई तयार करण्याचे काम सुरु होते ते एप्रिल पर्यंत चालू असते. या सर्व कामांचा त्यांच्या कुवती प्रमाणे प्रत्येकाला अल्प मोबदला दिला जातो. तयार मालाला मागणीहि मोठया प्रमाणावर असते.

शाळेतर्फे दरवर्षी मुलांची सहल नेली जाते ज्याची मुले आतुरतेने वाट पाहत असतात. सहलीचा खर्च बऱ्याच वेळेस दानशूर व्यक्तींकडून उचलला जातो. तसेच ह्या विशेष मुलांसाठी होणाऱ्या निरनिराळ्या स्पर्धेत मुले भाग घेतात. विशेष करून आमचे विद्यार्थी चित्रकलेच्या स्पर्धेत खूप बक्षिसे मिळवतात. इनरव्हील,रोटरी
क्लबतर्फे ह्या स्पर्धा घेतल्या जातात.मुलांना बक्षिसे देऊन प्रोत्साहन दिले जाते. दरवर्षी संस्थेचे स्नेहसंमेलन होते .त्या साठी मुलांचे कार्यक्रम बसविले जातात.मुलांचे सादरीकरण बघून येणारे पाहुणेही खुष होतात व मुलांच्या पाठीवर कौतुकाची थाप देतात.

सेवाभावी संस्थेतर्फे भरविल्या जाणाऱ्या प्रदर्शनात आमच्या संस्थेला विनामुल्य बूथ मिळतो. तेथे मुलांनी केलेल्या मालाची विक्री कौतुकापोटी मोठ्या प्रमाणात होते. दरवर्षी स्नेहसमेलनामध्ये पालकांना त्यांचे

मनोगत व्यक्त करण्याची संधी दिली जाते. त्यामध्ये जेव्हा पालक आपली कृतज्ञता व्यक्त करतात तेंव्हा कष्टाचे चीज झाल्याचा आनंद मिळतो.

शाळेत येणारी मुले ही जास्त करून आर्थिक दृष्ट्या दुर्बल वर्गातील आहेत. त्यामुळे शाळेची १०० रुपये फी देणे सुद्धा त्यांना परवडत नाही. अश्यावेळी त्यांची वर्षाची फी देण्यासाठी अनेक पुरस्कर्ते पुढे येतात. लांब अंतरावरून येणाऱ्या मुलांना रिक्षाचा खर्च परवडण्या सारखा नसतो, तेव्हा शाळेकडून अर्धा खर्चाचा भार उचलला जातो. सामाजिक बांधिलकीची जाणीव असणाऱ्या समाजातील दानशूर व्यक्ती व सेवाभावी संस्था यांच्या कडून मिळणाऱ्या भरघोस आर्थिक मदतीमुळे संस्थेचे कार्य आज सुरळीतपणे चालू आहे. मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांनी स्वावलंबी बनावे हा शाळेचा मुख्य उद्देश आहे. त्याद्दष्टीने शाळेची वाटचाल चालू आहे.

सध्या संस्थेत २२ मुले आहेत. शाळेने गेल्याच वर्षी २५ वर्षे पूर्ण केली. सर्वांच्या सहकार्याने आमचे काम भविष्य काळातही असेच चालू राहील अशी आशा व्यक्त करते.

शाळेचा पत्ता :

"चैतन्य" मतीमंद मुलांची शाळा
(Public Charitable Trust Reg No: F-1434)
१, बालाजी सोसायटी,
बँक ऑफ महाराष्ट्र समोर,
गोखले रोड, ठाणे ४००६०२.
दूरध्वनी क्रमांक : ९१-२२-२५३८-५३६१

****

एकदा तरी...

-पूजा दिलीप घाटे

खूप काही बोलायचं असतं
खूप काही सांगायचं असतं
मन कुठेतरी मोकळं करायचं असतं
परत त्याच कट्ट्यावर जमायचं असतं
बावळट विचारात आणि निरर्थक गप्पात रमायचं असतं
मित्रांना भेटून पुन्हा जुनं आयुष्य जगायचं असतं
कोणाची टिंगल , कोणाची मस्करी , कोणाला चिडवायच असतं
काही राहिलेल्या , अर्धवट सोडलेल्या विषयांवर बोलायचा असतं
चहा आणि ब्रेड बटर बरोबर , जुन्या विषयांवर रेंगाळायचं असतं

कधी सहज ओळख झालेल्या लोकांशी, प्रोफेशनल लाइफ मधल्या परफेक्ट अशा "मी " ला सोडून , निवांत चाट करायचा असतं

महिन्यातल्या एकदा सगळं विसरून असही जगायचं असतं
ह्या ऑफिस च्या बिझी कॅलेंडर मधे , एक तरी दिवस मनमौजी व्हायचं असतं

आयुष्यातले चढ उतार , frustration, tentions...सगळं विसरून , न ठरवता बागडावं वाटतं

असं वाटतानाच ऑफिस चे विचार आणि मीटिंग्स च्या विचाराने विषयांतर व्हायचं असतं

त्याला कटवून , सरळ एका सहलीवर एकट्यानेच जायचं असतं
स्वतःला सोडून , निसर्गाच्या शरणी जायचं असतं

महिन्यातल्या एक तारखेला ऑफिस साठी आणि इतर दिवसातल्या निदान एका दिवशी असा स्वतःसाठी जगायचं असतं

माझ्यातल्या मी" " प्रकाराला सोडून
आयुष्याकडे बघायचं असतं
कधीतरी हरवलेल्या आयुष्य असा नक्कीच शोधायचा असतं

चिमण्यांची शाळा

विद्या हर्डीकर-सप्रे

सूर्य आपले सोनसळी पंख निळ्या आभाळात पसरतो आणि प्रकाशाची लकेर घेतो, तेव्हा पहाटेची झूल अंगावर पांघरलेली ती वास्तू सुखावते. समोरच्या चाफ्यावरचा काऊ शकुनसांगावा घेऊन केव्हाचा उभा असतो आणि किरणांच्या झरोक्यातून त्या चिवचिवत येतात. वास्तू चैतन्यलहरीत न्हाऊन निघते.

अगदी प्रथम त्या यायच्या त्या किती बावरून गेलेल्या! पागोळीच्या आवाजानसुद्धा दचकणाऱ्या. घंटेचा आवाजही केव्हढाला वाटायचा तेव्हा. प्रार्थनेचे किनरे स्वर जेमतेम मजल्यावर पोहोचायचे. मग एकदम "हाताची घडी तोंडावर बोट !". पहिल्या दिवशी होत्या जेमतेम वीसजणी. डोळ्यात उत्सुकता मावत नव्हती. तसं सगळं अपूर्वाईचं. इथे गणवेश नव्हता. पहिल्या दिवशी तर घंटा देणारा शिपाई मुळी यायलाच विसरला. बाईनीच घंटा वाजवली. वर पुन्हा पहिल्याच तासाला बाई म्हणाल्या, "चला आपण छान गाणं म्हणू.." आणि त्या गाण्यात म्हटलं होतं, "गड्यानो फेकुनी द्या दप्तरे!.."शिवाय या बाई अगदी बारीकशा. त्यांना काय घाबरायचं ? पण तरीही सगळ्या चुपचाप. कोणीसुद्धा हसत नव्हत. पण बघता बघता त्या धिटुकल्या झाल्या. वास्तुभर खुश्शाल तुरुतुरु धावायला लागल्या.मोठ्ठाले डोळे करून माना काय वेळावायच्या..गिरक्या काय घ्यायच्या. घंटा वाजली की मात्र भुर्रss.

तेव्हा वास्तूच्या भिंतीनीही वर्गाचं मुक्तांगण बनवलं. पुस्तकातल्या धड्यांच्या गोष्टी झाल्या. कवितांची गाणी झाली. आषाढातलं मेघमंडळ पाहिलं..चितळे मास्तरांची ओळख झाली. (इतिहासाच्या सरांना "चितळे मास्तर" असं चिडवून झालं आणि ते रागवू नयेत म्हणून वर त्यांना चिंचेचं बुटुकंही ऑफर करून झालं..)

इंग्रजीच्या मुक्ती बॅनर्जीनां मराठीच येत नव्हत. त्यांच्यावर "माय आईज हॅव कम " असे मिंग्लिशचे प्रयोग झाले. मुक्तीताई छान छान कविता शिकवत. अगदी साउंड ऑफ म्युझिकमधली गाणी सुद्धा! इरावती कर्व्यांचा धडा वाचला. हजारो वर्षांच्या जुनाट धुळीचे थर बाजुला करून हळुवार पणे कवटीवर हात फिरवून त्या विचारत होत्या, "तूच काग मी ? मीच काग तू ?" म्हणजे काय ते नक्की समजलं नाही तेव्हा पण आपणही असं संशोधन करणार म्हणून एका चिमखडीन ठरवून टाकलं. मेरी क्यूरीची गोष्ट ऐकली. मग काहींचे मेरी क्यूरी होण्याचे निश्चयही झाले. शास्त्राचे प्रयोग केले तसे, मिशा लावून 'वयं मोठं खोटंचे' प्रयोगही रंगवले. सिंहगडावर आणि शिवनेरीवर मनमुराद भटकून झालं. सगळ्यांनी मिळून 'सळसळणाऱ्या शेतामधुनी हसेल हिरवे सोने" असं एक आनंदी गाणं म्हटलं आणि दूरदर्शनवर जाऊन ते घराघरात पोहोचवलं. संध्याकाळी मैदानावर मजा असायची. तिथे खेळ शिकवायला ताई यायच्या त्या महाविद्यालयात जाणाऱ्या. गाणी शिकवायच्या आणि गोष्टीही सांगायच्या. तिथे लंगडी हुतुतू मारामाऱ्या कट्टी आणि गट्टी सर्वच चालत असे ! मैदानावर शाळेबाहेरच्या मुलीही असायच्या. आजूबाजूच्या वस्तीत रहाणाऱ्या. काहींना तर शाळा म्हणजे काय ते माहितीच नसे. पण लंगडीत मात्र अट्टल असत त्या. ताई सर्वांनाच मायेने वागवत. शाळेत न जाणाऱ्या मुलींना पुस्तक वाचायला शिकवत.

बघता बघता शाळेचं पहिलं वर्ष संपलं. पहिले दुसरे असे नंबरच नव्हते. सगळ्यांना 'ग्रेडस' !

पहिल्या वीस जणी सहावीत गेल्या आणि वास्तूच्या दारातून आणखी वीस चिमण्या नाचत आल्या. वास्तू आणखी सुखावली. वास्तूचं अंगण गजबजलं. पुन्हा पुन्हा गजबजत राहिलं.

कुणी सावळी सतेज, कुणी नाकेली तेज. अनेक परीच्या अनेक पऱ्या. अवजड पुस्तकी दप्तरं टाकून नव्या सळसळत्या वाटांनी धावू लागल्या.

कवितेमागची प्रक्रिया साक्षात गदिमांकडून समजावून घेतली. कविता जगणाऱ्या बाबा आमट्यांना समजावून घेण्यासाठी भामरागड आणि चंद्रपूरच्या शिबिरातच मुक्काम ठोकला. शिवबांच्या खेड शिवापुरापासून ते आंबेडकरांच्या महाडपर्यंत घराघरातून हिंडून त्यांनी इतिहास, भूगोल आणि वर्तमानाचे धडे गिरवले. ज्यांना खेडं म्हणजे काय माहितीच नव्हतं त्यांना ते अनुभव अपूर्व होते. पंढरपूरला जाणाऱ्या पालखीबरोबर थोडं चालत 'एक तरी ओवी अनुभवावी ' चा आनंद घेतला. रेशमाचा पुस्तकी किडा सोडून वास्तवातल्या रेशमी अळ्यांचं संगोपन केलं. फुलं कशी टिकवायची, केळी काळी का पडतात, कापड कसं रंगवतात, रक्तगट कसा काढायचा, ट्रांझिस्टर कसा चालतो, अशा अनेक प्रश्नांची उत्तरं शोधण्याचे प्रकल्प केले आणि त्यांची प्रदर्शनं भरवली. मैदानावर येणाऱ्या अडाणी मैत्रिणींना ती प्रदर्शनं दाखवली. प्रत्येक दिवसाच्या नव्या ताज्या अंकुराला सामोरं जाताना या चिमण्यांमधून एकेक प्रकाशवेडा अंकुर पालवत होता. वास्तू पुलकित होत होती. त्या अंकुरांना साज चढवला तो उपनयनाच्या समारंभानं. मुलींचं उपनयन! विद्याव्रत ! गार्गी मैत्रेयींनी घेतलेल्या त्या व्रताला मध्ययुगीन स्त्री वर्षानुवर्ष पारखी झाली होती. ते व्रत या चिमण्यांनी घेतलं. असं अंधतेने मात्र घेतलं नव्हतं. 'बुध्याची वाण धरिले करी ' असं ते तेजाचं व्रत होतं. मनातल्या अंकुरांना ब्रह्मवादिनी पर्यन्तचं आकाश मोकळ झालं होतं. वास्तूतल्या उबदार कुशीतून बाहेर पडल्या पहिल्या वीसजणी. आपल्या भाग्यवान उबेची पाखर अनेकींना घालण्यासाठी. मे महिन्यातली आईस्क्रीम खाण्याची मजा सोडून महाराष्ट्रातल्या वीस खेड्यात गेल्या शिबीर घेण्यासाठी. बरोबर लहानग्या गेल्या पाच पाचच्या गटानी. वय होतं चौदा ते वीस! घराघरातून हिंडून मुलींना जमवायचं, त्यांना गोष्टी सांगायच्या, गाणी शिकवायची, गणित शिकवायचं त्यांच्याबरोबर लेझीम चे हात मारायचे आणि बारा वाजता त्यांच्याबरोबर आपलीही शिदोरी सोडायची. भाकरीचा तुकडा फक्त तिखटाच्या चिमटीबरोबर कसा खायचा हे त्या खेड्यातल्या नव्या मैत्रिणींकडून शिकायचं.

तिथल्या घरातल्या आयाबाया तोंडाला पदर लावून यायच्या. कुतुहलानं ही 'साळा' बघायच्या. हळूहळू घरातल्या सर्वांबरोबरच या चिमण्यांचे स्नेहबंध जुळायचे. संध्याकाळी मग एखादी उभी रहायची कीर्तनाला! अगदी नऊवारी नेसून ! खड्या आवाजात 'रामकृष्ण हरी' म्हणून आख्यान लावायची..सटवाईचं मरी आईचं, स्वच्छतेचे आणि आरोग्याचे वळसे नकळत पडायचे आणि बाया बापे इचारात पडायचे.

चिमण्याची रहाण्याची सोय कुठल्यातरी अंधाऱ्या घरात. सतरंजीवर झोपायचं. एखाद्या खेड्यात तर संडासाचीही सोय नसे. मग भल्या पहाटे उठून दूरच्या शेताची वाट तुडवावी लागे. अनेक अडचणी. पण त्यांची परतायची भाषा नसे. या जिद्दीच्या मशाली कुणी पेटवल्या या चिमण्याच्या मनात? त्याच मशाली घेऊन पंचवीस जणी धैर्यानं खदखदणाऱ्या पंजाबात जाऊन पोहोचल्या. 'सतश्री अकाल ' म्हणत पंजाबवीच शब्दकीर्तनं करू लागल्या. नामदेवांच्या महाराष्ट्रातल्या तरुणींच्या या सदभाव यात्रेचं तिथं स्वागत झालं.

त्यातल्या दोघीजणी नंतर वर्षभर खंबीरपणे तिथेच राहिल्या.

शकुंतला लाटकरच्या खुनाची बातमी आली. विसाव्या शतकाच्या शेवटी, पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरात एका सुशिक्षित वस्तीतल्या घरात सासरच्या लोकांचा छळ या टोकापर्यंत पोहोचणे हो गोष्ट अस्वस्थ करणारी. तेव्हा या एकेकाळच्या चिमण्या धारदार झाल्या.

त्यांनी स्वयंस्फूर्तीनं मोर्चे काढले, सभा घेतल्या. जनजागृतीची मोहीम सुरु केली. विनोबांच्या धड्यात वाचलेला 'स्त्रीशक्ती जागरण ' हा शब्द समजावून घेण्याची आणि आत्मसात करण्याची ती एक प्रक्रिया होती. ज्या महाराष्ट्रात स्त्री कलेक्टर होते त्या महाराष्ट्रात तिची समकालीन शुभांगी जोशी जिवंत जाळली जाते..जिथे सौदामिनी देशमुख वैमानिक होते, तिथल्याच तरूण विधवेचं केशवपन होतं आणि ज्या देशात स्त्री पंतप्रधान होते, तिथे आठला वर्षाची रूपकुंवर सती म्हणून जाळली जाते ! लहानपणी इतिहासात वाचलेल्या गोष्टी सारख्या या घटना!

एकविसावं शतक तोंडावर आलेलं असण्याच्या काळात समोर घडत होत्या ! हे सर्व या चिमण्या समजावून घेत होत्या. मोर्चे आणि सभा घेऊन प्रश्न सुटत नाहीत हे समजल्यामुळे सांगलीला, नाशिकात, राजस्थानात जाऊन साकळल्या रुढींचे बंध फोडत होत्या. आपल्या स्त्री पणाच्या शहरी कचकडी कल्पना सोडून देऊन तळागाळाच्या स्त्रीच्या मनापर्यंत पोहोचत होत्या. तिला बोलतं करत, आपलसं करत, हळूवारपणानं तिच्या मनावरचे हजारो वर्षांच्या रुढींचे जुनाट थर बाजूला करून तिचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान जागृत करत होत्या, आणि सांगत होत्या, 'अगं तूच ती मी !' पुस्तकातल्या इरावती बाईंच्या लेखातलं न कळलेलं काही तरी समजत होतं.

माझ्या श्वानप्रेमाची शोकांतिका?

सायली मोकाटे-जोग

बालवयापासून थोडे मोठे व्हायला लागतो तसे आपले आजूबाजूच्या गोष्टींबद्दलचे कुतूहल वाढत असते. अशाच वयात आपली गट्टी जमते ती पक्षी-पाखरं आणि प्राण्यांशी. नकळत आपल्याला हा निसर्ग जवळचा वाटू लागतो. या निस्वार्थ सवंगड्यांबरोबर येणारी मजा औरच असते. माझ्या मनात लहानपणापासून या प्राणीविश्वाविषयी प्रेम निर्माण झाले. घरात एक कुत्रं पाळलेलं असल्यामुळे तर त्यात भरच पडली. त्याच्याशी रोज खेळण्यात मी दंग होई. ते गेल्यानंतर झालेलं दुःख माझ्या किशोरवयीन मनाला आभाळाएवढं वाटलं. पाठीमागच्या अंगणात नाचणाऱ्या खारुताईशी मैत्री, नित्यनेमाने पावसाळ्यात येणारा भारद्वाज, रस्त्यावरचे उचलून आणलेले छोटेसे मांजरीचे पिल्लू - त्याच्या उपद्व्यापामुळे मोठ्यांची खाल्लेली बोलणी आठवली की आताही गंमत वाटते. नंतरच्या काळात मारुती चितमपल्ली, सुमेधा कामत यांच्या जंगलसफरी, निसर्ग, प्राणीविषयक लेखांच्या वाचनामुळे विचार समृद्ध झालेले. प्राण्यांमध्ये कुत्रा हा माझा अधिक आवडीचा प्राणी. असे प्राणी पाळतानासुद्धा त्यांच्या कोड-कौतुकाचे स्तोम घरात कधीच माजले नाही. आमच्या घरी पाळलेलं कुत्रं अंगणात बांधलेलं असायचं. ते घरात वा गादीत कधीच आलं नाही. अगदी डोळेही न उघडलेलं पिलू - त्याला बाटलीने दूध पाजण्यापासून पुढे खाणे-पिणे, फिरणे, कधी अंघोळ आणि त्याची स्वत्छता, रुटीन इंजेक्शन्स हे सारे बिनबोभाट चालायचे. आम्ही त्याच्याबरोबर मनसोक्त खेळायचो, मस्ती करायचो पण घरात येताना हात-पाय स्वच्छ धुवूनच. त्या

प्राण्यावरचं आमचं प्रेमही कमी झालं नाही की त्याच्यामुळे कुठली कामं खोळंबून राहिली. 'कुत्रं हे शेवटी कुत्रं आहे, माणूस नाही' या सरळधोपट तर्कसुसंगत विचारावर चाललेली भूतदया. पण माझ्या या कल्पनेला धक्का बसला तो परगावी एका ओळखीच्या कुटुंबात चार दिवस राहायची वेळ आली तेव्हा!

तर झालं असं... त्या परिचित कुटुंबाच्या घरी आम्ही पोहोचलो. दारात पाऊल टाकताच भौं भौंss अशी दणक्यात सलामी मिळाली. फ्लॅटवजा घर असूनही घरात कुत्रा पाळलेला म्हटल्यावर मला मनातून खूप आनंद झालेला. चार दिवसात आता त्याच्याशी गट्टी जमवायची असा विचार. आम्ही आल्याची जोरदार खबर मिळालीच होती. घरच्या मंडळींनी आमचं स्वागत केलं. हातपाय धुवून आम्ही ताजेतवाने झालो. प्रवासाचा थकवा, जेवणं संपल्यावर यजमानांच्या कुत्र्याकडे लक्ष गेलं. हॉलमध्ये कोपऱ्यात एक मुद्दाम करवून घेतलेली छोटी जाडजूड गादी, वर मऊ कापड अंथरलेले आणि त्यावर अवाढव्य शरीरयष्टीचे श्वानमहोदय - 'कोको' दिमाखात विराजमान! मला पाहताच जागचे उठून त्याने घर दणाणून सोडले. (त्याला बांधलेलं होतं हे माझं नशीब!) रंगावरून याचं नाव 'कोको' ठेवलं असलं तरी त्याला 'भोभो' हे नाव अधिक शोभलं असतं असं त्यावेळी मला वाटलं आणि त्याच्याशी मैत्री करण्याचा विचार मला एका दिवसापुरता मागे घ्यावा लागला. त्या रात्री आम्ही एका खोलीत बंद होतो आणि 'कोको' चा घरात मुक्तसंचार...!

दुसऱ्या दिवशी सकाळपासून 'कोको' च्या दिनक्रमातील प्रत्येक घटनांनी मी थक्क होत होते. सकाळी ७ वाजता कोको मालकिणीबरोबर फिरायला निघे. फिरण्यासाठी खास वेगळा पट्टा. तो परिधान करून कोकोची स्वारी चार ढांगात खाली उतरली. फिरून आल्यावर कोकोची मालकाबरोबर मस्ती चाले ती ही ठरलेला वेळ. त्याच्या प्रत्येक गोष्टीचं काटेकोर वेळापत्रक होतं. "कोको, वॉटर..." अशा मालकिणीच्या सूचक मंजूळ आज्ञेवर हे महाशय पळत पळत पाण्याच्या जागी गेले. तिथे दोन फूट उंच भोकवल्या स्टूलात ठेवलेल्या चकचकीत भांड्यातले निर्जंतुक पाणी कोकोने प्राशन केले. त्यानंतर त्याची यथासांग न्याहारी... ताज्या भाकरी-पोळीच्या कुस्करावर तीन अंडी आणि मग सुपारी म्हणून चघळायला एक खास हाडूक! हे सगळं होईतो आमची न्याहारीची वेळ टळून गेली होती... दुपारी वामकुक्षीनंतर कोकोचे ट्रेनिंग सुरु झालं. फेकलेला चेंडू आणून देणे, लपवलेली वस्तू शोधणे, दोन पायावर चालणे, "सीट, डाऊन, अप, रीलॅक्स" अशा आज्ञा पाळणे... वगैरे. कुत्र्यांना फक्त इंग्रजीच समजते किंवा शिकवायचे असते अशी माझ्या ज्ञानात नवीन भर पडली. मी तिथे जाताच तो पुन्हा भुंकायला लागला. मालकिणीने त्याला आवरून "फ्रेंड" अशी माझी ओळख करून दिली. मी ही हळूच त्याला हात लावून पाहिला. मी "फ्रेंड"च आहे अशी त्याची खात्री व्हावी म्हणून त्याची आवडती बिस्किटे त्याला दिली. पण बिस्किटे खाऊनही कोको विरोधक भूमिकेतच राहिला.

संध्याकाळी थोड्या धीटपणे मी कोकोच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. पण हा कोको असा काही पेटला की माझं धाबंच दणाणलं! "फ्रेंssड" अशी मालकिणीने माझी पुनर-ओळख करून दिली. परंतु कोकोवर त्याचा काही एक परिणाम झाला नाही. "कोकोने एकदा नीट वास घेतला की मग तो विसरत नाही फक्त आधी खात्री पटेपर्यंत तो भुंकतो" हे मालकांचं स्पष्टीकरण ऐकलं. कुत्र्याला वास घ्यायला इतका वेळ लागतो?... त्यातून नक्की कोणती खात्री याला पटायला हवी आणि ही गोष्ट कोकोने मालकांला

कधी सांगितली? - तेवढं मात्र मला समजलं नाही. त्यानंतर मालकांनी मला कोकोचा सगळा इतिहास सांगितला. त्याला कोणाकडून, कसं, कधी आणलं वगैरे... तसेच दर आठवड्याने त्याला अंघोळ कशी घातली जाते; केस विंचरून गळणारे केस कसे काढले जातात; दर महिन्याला डॉक्टरकडे तपासणीला कार मधून कसे नेतात; त्याचा साबण, लोशन, कंगवा, जेवणाची भांडी, खेळणी सगळं कसं अप टू डेट आहे; त्याच्या ट्रेनरच्या सूचना; गावाला जायचं असलं की त्याचं महागडे पाळणाघर... आणि बरेच काही. शिवाय त्याचे घरी आणल्यापासूनचे फोटोही दाखवले... (कॉमेंट्रीसकट). अगदी लहान असताना कोको काय काय करायचा हे त्या मालकिणबाईंनी कौतुकाने सांगितले. बिछान्याची चादर, गादी, कार्पेट, चटई, पायपुसणी, वर्तमानपत्रे, मासिके यातले काहीही कुरतडणे; गॅलरीत कुंडीतल्या झाडांची वाट लावणे हा त्याचा आवडता खेळ होता म्हणे!... आणि याची शिक्षा म्हणून त्याला मारायचे नाही असे ट्रेनिंग मास्तरने सांगितलेले. कुरतडलेली वस्तू त्याच्या नाकासमोर धरायची आणि बाजूला तीनवेळा अलगद आपटायची की त्याला कळते म्हणे. पण पुढच्या वेळेस कुरतडण्यासाठी एखाद्या नवीन वस्तूचा नंबर लागायचाच. हे एकेक विलक्षण प्रकार ऐकून मला कोकोपेक्षा त्या मालक-मालकिणीचीच अधिक भीती वाटायला लागली. 'माणसांसाठी कुत्रा आहे की कुत्र्यासाठी माणसं?' - असा विचार क्षणभर येऊन गेला. पण श्वानप्रेमाखातर तो विचार मी मनातच ठेवला.

पुढच्या दोन दिवसात अनेकदा मी कोकोला प्रेमाने हात फिरवून किंवा त्याच्याशी खेळण्याचा प्रयत्न करून पाहिला. "फ्रेंsssड, फ्रेंsssड" अशी उजळणी झाली. घरात लहान मूल असेल तर जे कोड-कौतुक चालते त्याच्या वरताण कोकोचे किस्से ऐकले. पण कोकोच्या डोक्यात काही प्रकाश पडला नाही. निघायच्या दिवशीही कोकोने माझे सारे प्रयत्न धुडकावून लावले आणि हजारवेळा "फ्रेंsssड" सांगूनसुद्धा मला भुंकतच निरोप दिला. "आमचा कोको हुशार आहे. त्याला कोणाशी मैत्री करायची ते तो आधी वासावरून ओळखतो आणि मगच मैत्री करतो." इत्यादी कौतुकमिश्रित उद्‌गार आम्हाला खाली सोडायला आलेल्या मालकांनी ऐकवले. (म्हणजे त्यांच्यामते मीच त्या धटिंगण कुत्र्याच्या मैत्रीस लायक नाही??...)... त्या अजब कुत्र्यासमोर व त्याच्या मालक-मालकिणीसमोर हात टेकले!

येतानाच्या प्रवासात मनात विचारांचे तरंग उठले. माणसाच्या जन्माला येऊनसुद्धा सहसा असे सुख मिळायचे नाही, असं नशीब काढलंय या बेट्या कोकोनं. आज इथे अमेरिकेत येऊन इथल्या कुत्र्यांची बडदास्त पाहते. या समृद्ध देशातली कुत्री एका शिस्तीत जगतात. पण काही वर्षांपूर्वी भारतात जेव्हा कोको रुपानं अतिशयोक्तीचं उदाहरण पाहिलं तेव्हा हसायला (की रडायला?) आलं. दोनवेळा जेवायला मोताद असणारी लाखो माणसे ज्या देशात आहेत; जबाबदाऱ्यांची ओझी चिमुकल्या खांद्यावर वागवत लाखो बालकामगार जिथे शिक्षणापासून वंचित आहेत; वैद्यकीय सुविधांपासून लाखो दीन-दुबळे प्रतिदिनी मृत्यूला जवळ करीत आहेत; अशा देशात एका कुत्र्यासाठी केलेला एवढा पैशाचा आणि कार्यशक्तीचा अपव्यय पाहून मन अस्वस्थ झालं हे मात्र खरं...

पुढच्यावेळी (देवकृपेने तशी वेळ आली नाही पण) जर या कुटुंबाकडे भेट द्यायची वेळ आली असती तर हा लाडला श्वानपुत्र शर्ट-पँट हया पेहेरावात कोकाकोला किंवा पेप्सी पीत आरामात कोचावर टीव्ही बघत बसलेला दिसला असता तर त्यात नवल ते काय? शिवाय ट्रेनरच्या सल्ल्यानुसार वधू परीक्षा सुरु असती

किंवा कदाचित त्याचा वाढलेला कुटुंबकबिलाही बघायला मिळाला असता!... जोडीला जबाबदार झालेला कोको आता कमी भुंकतो म्हणून "गुड डॉग" पदवी देत मालकीण बाजूला उभी असतीच. त्या श्वानसम्राटाला आणि त्याचे लाडकोड करणाऱ्या त्या हौशी(?) श्वानप्रेमी कुटुंबाला माझ्या (श्वान)प्रेमपूर्वक शुभेच्छा!

****

सोनू

विदुला बंकापुरे

भालावरच्या रेशमी बटा

इवल्याश्या नाकाची चाफेकळी

हळुवार ओठांनी टिपून घ्यावी

गोबऱ्या गालाची गोड खळी ||

जाई-जुई च्या मोहक कळ्या

शुभ्र सुंदर मौक्तिक माळा

बदामी डोळ्याची खट्याळ नजर

आयुष्यवंत तू हो बाळा ||

बोबड्या बोलांची अविरत बडबड

बालगीतांची सुमधुर पखरण

दारी अवतरला कृष्ण-कन्हैय्या

खेळ क्रिडानी भरले अंगण ||

दुधावरली तू लोभस साय

हिरव्या देठाचं मी पिकलं पान

मिठीत घेऊन मी विरून जावं

आहेस माझा जीव कि प्राण ||

सात समुद्रापार तू

जीवास लागे उगाच हुरहूर

लवकर ये तू भेटीलागी

वाट पाहते होऊन आतुर ||

हनुमानाची गगन भरारी

अश्वत्थाम्याची चिरंजीविता

जे जे सुंदर जगात सारे

तुझ्या जीवनी होई पुर्तता ।।।

****

चित्रकार- राधा

परीची शाळा...कुणासाठी ? मोठ्यांसाठी !

अनुराधा गानू

काही वर्षापूर्वी माझ्या दोन्ही मुलांना घेऊन एकदा उत्तर, तर एकदा दक्षिण भारतदर्शनाला मी गेले होते. तिथली भव्य शिल्पं, त्यांचे भग्न अवशेष, गलिच्छ रस्ते, नागवलेला निसर्ग हे सर्व बघताना आनंद, दुखः, नैराश्य, वैफल्य, हताशपणा, स्वतःच्या नाकर्तेपणाची चीड अशा संमिश्र भावनांचा एकच कल्लोळ माझ्या मनात माजला होता. मुलांनी केवळ नातेवाईकांना भेटण्याऐवजी जमेल तेवढा भारत देश, त्यातील जीवन, त्याचा इतिहास त्याचा भूगोल, त्याची सांस्कृतिक बैठक, त्याची अस्मिता जाणून घेण्यात, त्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यात रस दाखवल्यामुळे मी आनंदात होते. जे दाखवत होते ते सुंदर होतं, भव्य होतं, उदात्त होतं. पण खंत एकच होती की हे सर्व कोणे एकेकाळी. त्या सर्व स्थानांची, शिल्पांची, कलाकृतींची आजची दैनावस्था, दुरवस्था पाहून मन विषण्ण होत होतं. एकेकाळी दिमाखात मिरवलेले हे सांस्कृतिक मानबिंदू, स्वर्गाचा तुकडा, नंदनवन म्हणून गाजलेली नैसर्गिक स्थानं, आज पोरक्या पोरांसारखी अनाथ, केविलवाणी दिसत होती. हे केविलवाणं, ओंगळ चित्रण दाखवून माझ्या जन्मभूमीबद्दल, तिच्या इतिहास, भूगोल, सांस्कृतिक ठेव्याबद्दल मी त्यांच्या मनात प्रेम निर्माण करत होते की तिरस्कार व घृणा हेही ताबडतोब न समजल्यामुळे मी आणखीनच संभ्रमित होत होते. मुलंही फारशी न बोलता डिजीटल व हृदय अशा दोन्ही कॅमेऱ्यांनी दृश्य टिपत होती. कसं वाटतय, आवडलं का विचारलं की अमेरिकन पद्धतीनुसार interesting म्हणत होती! एक मात्र खरं की त्यांच्या हृदयाच्या संगणकात त्या माहितीची छाननी नक्की चालली होती हयाची मला जाणीव होती आणि तो algorithm तयार झाला की ती मला सांगतील याची पण खात्री होती. म्हणून मी माझ्याही मनाला तत्काळ उत्तरे, आडाखे, निष्कर्ष काढण्यापासून परावृत्त केलं.

तरीही नकळत अंतर्मनात अमेरिकेतील प्रेक्षणीय स्थळांबरोबर (दोन्ही ऐतिहासिक व नैसर्गिक) हया अनुभवांची तुलना होत होती. त्यांची देखभाल, तेथील सुविधा, स्वच्छता, सुस्पष्ट पाट्या, माहितीपट, वाटाडे. तेवढ्यात कानावर एक संवाद पडला. "आपल्या लोकांना आपल्या सांस्कृतिक अस्मितेबद्दल काही चाडच नाही. कश्श्याची म्हणून जपणूक नाही. मंत्र्यांपासून संत्र्यांपर्यंत एकच तंत्र. स्वार्थ, लोभ व भ्रष्टाचार. नुसते पैसे खातात, पण कोणी काही करत नाहीत." मनात एकदम धोक्याची घंटा वाजू लागली की आपली लोकं म्हणजे कोण ? मी त्यातली नव्हे का? आहे म्हणूनच इतकी पोटतिडीक वाटली ना ? मग मी देखील ती अस्मिता जपण्यासाठी काय करते आहे? भारतात थोडीफार आर्थिक मदत पाठवण्यापलीकडे काहीच नाही. दहा हजार मैलांवर राहून मी काय करू शकते ? सांस्कृतिक अस्मिता फक्त ऐतिहासिक व नैसर्गिक स्थानांच्या जपणुकीतूनच व्यक्त करता येते का ? अस्मिता ही उपजत असते ? का प्रयत्नपूर्वक मिळवावी लागते ? का थोरल्यांनी लहानांना द्यायची असते ? तिची कुठे तयार पाकीटं मिळतात का? असली तर मोठा किफायतशीर धंदा होईल हे खरं ! हा अस्मितेचा भुंगा शकुंतलाप्रमाणे माझा पिच्छाच सोडीना. पण एक सुखद आश्चर्याचा धक्का म्हणजे एक दिवस ही अदृश्य, अस्पर्शीय, हुलकावण्या देणारी अस्मिता, अचानकपणे सुस्मिता झाली व माझ्यासमोर मायमराठीच्या रूपाने दत्त म्हणून उभी राहिली!

मातृभाषा म्हणजे संस्कृती नाही हे जरी खरं असलं तरी संस्कृती संवर्धन व जोपासनेतला एक अविभाज्य व अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे मातृभाषा. आणि भाषेच्या लयाबरोबर संस्कृतीचा व तिच्या केंद्रस्थानी असलेल्या अस्मितेचाही विलय हे ओघानं आलंच. तेव्हा नवीन

पिढीच्या हातात जर मी ही भाषा रंजकपणे पोहोचवू शकले, तिच्याबद्दल उत्सुकता, आत्मीयता, प्रेम निर्माण करू शकले तर माझ्या मनात लवलवणारी, इंग्रजी भाषा व पाश्च्यात्तीकरणाच्या झंजावातात विझू पाहणारी मायमराठीची, मराठी अस्मितेची, भारतीय संस्कृतीची ज्योत त्यांच्याही मनात चैतन्य निर्माण करील अशी मला नुसती आशा नाही तर विश्वास वाटू लागला. आणि हे काम तर मी दहा हजार मैलांवर बसून सुद्धा करू शकते.

जागतिकीकरण हे आता व्यापारापुरतं मर्यादित नाही तर सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातही ते घुसलं आहे. तेव्हा मला अभिप्रेत असलेली नवीन मराठी पिढी हि भारत किंवा अमेरीकेपुरती मर्यादित नसून सर्व जगभरची नवी मराठी पिढी त्यात सामावलेली आहे. माझी मातृभाषा मराठी आहे म्हणून मी मायमराठी, मराठी भाषा, मराठी पिढी असे शब्दप्रयोग करते आहे. पण मला जे म्हणायचं आहे ते फक्त मराठी भाषा, मराठी संस्कृती किंवा मराठी अस्मितेपुरतं मर्यादित नाही. केवळ भारतीयच नव्हे तर जगातल्या कुठल्याही भाषा व संस्कृतीलाही ते तितकंच लागू आहे. जगात जितक्या भाषा जिवंत राहतील तितक्या विविध संस्कृती त्यांच्यावर पोसतील. ह्या प्रत्येक भाषेत, संस्कृतीत विद्या, कला, ज्ञान, अनुभव यांचा अनमोल खजिना दडलेला आहे. शेतात दडलेल्या मोहरांच्या रांजणाप्रमाणे देवाने हे गुप्त धन आपल्या सर्वांसाठी ठेवलेलं आहे. रूपांतराच्या, भाषांतराच्या, संयोगाच्या माध्यमातून आपण सर्वांनी ते लुटावं, ते शोधण्याच्या निमित्ताने आपण विविधतेतील एकात्मता अनुभवावी अशी त्याची इच्छा असावी. नाहीतर ते पंचखंडामधील विविध शेतात पुरायची तसदी त्यानं कशाला घेतली असती ?

असो. तर अशा रीतीने माझं मन पोखरणारा अस्मितेचा भुंगा शेवटी मायमराठीच्या कोमल कैदेत अडकला व माझ्याकडून "परीची शाळा " हा चार व्हीसीडींचा संच, पुस्तक व पाटीसह त्याने करवून घेतला. संगीत ही हृदयाची भाषा. म्हणून मी प्रत्येक अक्षराची ओळख गाण्यातून करून दिली. या परीच्या शाळेत पाश्चिमात्य लोकप्रिय बडबडगीतांच्या धर्तीवर प्रत्येक अक्षर व त्याची बाराखडी आपापली हजेरी लावते ! ३६ सुमधुर बालगीतांच्या व कार्टून्सच्या माध्यमातून ही मुलं अ ते ज्ञ हि अक्षरं व बाराखड्या कधी शिकतात व त्यांची प्राथमिक शब्दसंपदा कधी व कशी वाढते ते त्यांना लक्षातच येत नाही. हे पथ्य पाळण्यात माझा दुहेरी हेतू होता. भारताबाहेरील मुलांना त्यांच्या ओळखीच्या चाली, त्यांचे ध्वनी ह्या माध्यमातून त्यांना अनोळखी असलेली अक्षरं, शब्द, त्यांचे ध्वनी ओळखीचे व्हावेत. तर भारतातील मुलांना त्यांच्या ओळखीचे शब्दं, अक्षरं ह्यांचा माध्यमातून पाश्चिमात्य संगीताची गोडी चाखता यावी ! हि देवाणघेवाण पंचखंडातील मुलांना किती लोभस वाटते हे पाहिल्यानंतर अनोळखी शेतातल्या रांजणातील धन हे पुरण्यासाठी नसून लुटण्यासाठी आहे याची मला खात्री पटली !

कधी कधी ज्यांची आई मराठी व वडील अमेरिकन किंवा वडील मराठी व आई इंग्रज अशी अर्धवट (!) मराठी मुलं मला आपली पाटी आणून दाखवतात व

बूड हलवा, अन पाय उचला

परीच्या शाळेत जाऊया चला !

हे गाणं बूड हलवत म्हणून दाखवतात , ळ उच्चारासकट ! तर कधी मराठवाड्यातल्या एकाद्या लहान गावातली, किंवा मुंबईतल्या अत्यंत मागासलेल्या वस्तीतील सरकारी शाळेतली मराठी मुलं की ज्यांच्या कानावर पाश्चिमात्य संगीत कधीच पडलेलं नाही तीदेखील दोनदा ऐकून ही पाश्चिमात्य धर्तीची मराठी गाणी नुसती घडाघड म्हणतच नाहीत तर "ताई आणखी म्हणा, आणखी म्हणा " म्हणून मला आग्रह करतात ! UCLA सारख्या मान्यवर विद्यापीठातील तरुण विद्यार्थ्यांनी परीच्या शाळेत हजेरी

लावली व देवनागरी लिहिता वाचता येऊ लागल्यामुळे संस्कृत, हिंदी असे कोर्सेस ती घेऊ लागली!

हे सगळं लिहिण्यामागे आत्मप्रौढी मिरवणं हा हेतू नक्कीच नाही. सांगण्याचा हेतू हा की आपल्या मर्मबंधातली, हृदयाच्या गाभाऱ्यात दडलेली सांस्कृतिक अस्मितेची ठेव, कल्पकतेनं, रंजकतेनं, आत्मीयतेनं, आनंदानं, उत्साहानं, कळकळीनं नवीन पिढीसमोर ठेवली तर तेही तिला हृदयाशी घेतात, लाथाडत नाहीत. हा अनुभव, ही जाणीव किती उत्साहवर्धक आहे.

परीच्या शाळेच्या निमित्ताने मी तीन वर्षाच्या बालकांपासून ते पंच्याण्णव वर्षाच्या वृद्धांपर्यंत अनेक जणांशी बोलते. ह्यात फक्त मराठी किंवा भारतीय लोकच समाविष्ट नाहीत तर युरोप, दक्षिण अमेरिका, मध्यपूर्व, आफ्रिका, आशिया ह्या सर्व खंडातील विविध भाषी लोक समाविष्ट आहेत. बहुतेक लोकांच्या बाबतीत दुसऱ्या किंवा फार तर तिसऱ्या पिढीपर्यंत त्यांच्या त्यांच्या मातृभाषा लोप पावलेल्या आहेत. पण गंमत अशी की तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या पिढीतील त्यांचे वंशज आज मनापासून हळहळत आहेत. प्रत्येकाची एकच खंत की आज जर आमच्या वाडवडिलांनी जर्मन म्हणा, फ्रेंच म्हणा, डच म्हणा, पोर्तुगीझ म्हणा ..जी कुठली त्यांची भाषा असेल ती जर आमच्यापर्यंत पोहोचवायची तसदी घेतली असती तर आमच्या मुलांना ती शिकवण्यात आम्ही एक क्षणाचाही विलंब लावला नसता. आमच्या मुळांशी आमची ताटातूट झाली आहे कारण आम्ही आमच्या मातृभाषेची कदर, जपणूक केली नाही म्हणून.

ह्या अनुभवावरून आपण असं निश्चित अनुमान काढू शकतो की मराठी भाषेला (किंबहुना जी कुठली भाषा अजून अस्तित्वात आहे तिला) मरण तर नाहीच, पण एक समृद्ध भाषा म्हणून विकसित व्हायला अजूनही वाव आहे. फक्त मराठी बोलणाऱ्या, लिहिता वाचता येणाऱ्या आईवडिलांनी ती न कंटाळता, प्रेमपूर्वक पुढील पिढ्यांना देत राहिली पाहिजे. मला असं वाटतं की ही तळमळ म्हणजेच अस्मिता. त्यासाठी वर उल्लेख केलेल्या पिढ्यांच्या हातून अनवधानाने म्हणा, अजाणतेपणी म्हणा, पण त्यांची त्यांची मातृभाषा आपापल्या मुलांना न देण्याची जी चूक झाली ती मात्र कटाक्षाने, प्रयत्नपूर्वक टाळली पाहिजे.

सत्तरी ते नव्वदीतल्या अनेक स्थलांतरीत कुटुंबियांचे ह्या बाबतीतले अनुभव फार बोलके व अतिशय हृदयस्पर्शी आहेत. एक नव्वदीतील गृहस्थ गदगदलेल्या स्वरात मला म्हणाले :"अनुराधा , ही एक फार मोठी त्रुटी आमच्या आयुष्यात राहून गेली की आम्ही आमच्या मुलांना मराठीची ओळख करून दिली नाही ." त्यामागची कारणही मी समजू शकत होते त्यामुळे त्यांच्या दुःखाची, वेदनेची झळ मलाही चाटून जात होती. पन्नास वर्षापूर्वी जेव्हा त्यांनी महाराष्ट्र सोडला तेव्हा परक्या देशात, परक्या खंडात, परक्या गावात त्याचं एकच मराठी कुटुंब असायचं. तेव्हा आईवडिलांपलीकडे ती मुलं मराठी बोलणार तरी कुणाशी ? बरं आत्तासारख्या टेप, सीडी, डीव्हीडी, फोन, संगणक, इंटरनेटचं महाजाल हे काहीच हाताशी नव्हतं. विमानप्रवासही इतका सुलभ किंवा परवडण्याजोगा नव्हता. त्यामुळे पुराणकाळातल्याप्रमाणे एखाद्याने समुद्र उल्लंघन केलं की तो जवळजवळ काशीला गेल्यातच जमा व्हायचा ! त्यातून बहुतेकजण घरच्यांचा रोष पत्करून आलेले. त्यामुळे जमलं नाही म्हणून शेपूट पायात घालून परत जाणं हेही इभ्रतीला शोभादायक नव्हतं. परिणामी त्यांच्यासाठी परक्या भूमीत जम बसवणं ही सर्वात निकडीची गोष्ट झाली. हे सर्व त्यांच्यापुढे मांडून आजोबांच्या दुखाची धार मी बोथट करू पहात होते. पण त्यावर ते जे बोलले ते वाक्य, तो विचार, ती भावना मुलांना वाढवणाऱ्या, भारतात तसेच भारताबाहेर कुठेही रहाणाऱ्या प्रत्येक नवीन आईवडिलांनी विचार करावा, मनन करावं, चिंतन करावं इतकं महत्त्वपूर्ण, हृदयद्रावक व आशयघन आहे. ते म्हणले : "तू म्हणतेस ते सर्व खरं आहे. पण हेही तितकच खरं की नवीन भूमीत, नवीन जगात, नवीन युगात

बस्तान बसवण्याइतकीच निकड मुलांना मराठी शिकवण्याची होती हे आमच्या लक्षातच आलं नाही. पण आता फार उशीर झाला गं !" मला प्रकर्षानं जाणवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे नव्वदीतील आजोबांना जाळणारी खंत, तिचं सावट आता साठीतील त्यांच्या मुलांवर व तिशीतील नातवंडांवर पण पसरलं आहे. जी जी तरूण मुलं आईवडिलांनी जाणीवपूर्वक मराठी न शिकवल्यामुळे ह्या संस्कृतीच ठेव्यापासून, ह्या आनंदापासून वंचित राहिली आहेत त्या प्रत्येकानं परीची शाळा पाहून मला म्हटलं की :" I wish my parents had taken the time and trouble to teach us. I wish something like this was available when we were growing up."

अजूनपर्यंत मराठी बोलणाऱ्या आईवडिलांनी जर आपल्या मुलांना हि भाषेची देणगी, हा वारसा दिला नाही तर पन्नास वर्षानंतरच्या आपल्याही पिढ्या अशाच हळहळणार आहेत हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे. दुर्दैवाने त्या हळहळीची तीव्रता, दाहकता, धार आणखीच जाचक, बोचक झालेली असेल. कारण वर उल्लेख केलेल्या आजोबांची वेदना, दुखः, हळहळ, पश्चाताप त्या समग्र अनुभवाचं संचित गाठीशी असूनही आपण त्या निकडीकडे दुर्लक्ष केलं, मातृभाषेला अव्हेरलं, आईवडिलांच्या कर्तव्यात कसूर केली ही खंतही आपल्याला जाळील.

पण या हळहळीचं जर तळमळीत रुपांतर झालं तर ? तर त्या अस्मितेचंही सुस्मितेत रुपांतर व्हायला वेळ लागणार नाही याची मला खात्री आहे ! एकताच्या वाचकांना डॉ. विजय सबनीसांची नव्याने ओळख करून द्यायची जरूर नाही. भाषेच्या जीवशास्त्रीय अभ्यासातून त्यांनी जे आडाखे, निष्कर्ष मांडले आहेत ते किती अचूक आहेत याचा मी अनेक प्रकारे अनुभव घेतला आहे. ते ठोकताळे, निष्कर्ष नुसते अचूकच नाहीत तर भाषा शिकण्यास उत्सुक असणाऱ्या कुणाचाही उत्साह द्विगुणीत करणारे आहेत. त्यांनी मांडलेल्या अभ्यासपूर्ण लेखातील सर्वात महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१. भाषेची प्रेरणा अंतस्थ असल्यामुळे भोवती वाणीसमृद्ध वातावरण असले कि पुरेसे आहे. लहान वयात दोन भाषा एकाच वेळी शिकवल्या तर मुलांचा गोंधळ होऊन ती कुठलीच भाषा नीट शिकू शकत नाहीत हि भीती सर्वस्वी निराधार आहे. दोन्ही भाषा (किंबहुना तिनसुद्धा) जितक्या लवकर, व्याकरण व उच्चाराच्या जितक्या बारकाव्यांसकट त्यांच्याशी बोलल्या जातील तितक्या सहजपणे, प्रभावीपणे ती दोन्ही किंवा तिन्हीवर प्रभुत्व मिळवतात. त्यामुळे अमेरिकेत रहायचं तर मराठीपेक्षा स्पॅनिश शिकणं जास्त महत्वाचं, जरुरीचं आहे म्हणणं ही पळवाट आहे.

२. भाषाप्रभुत्व नैसर्गिकरित्या दोन ते बारा वर्षे ह्या काळातच प्राप्त होते. भाषाप्राप्तीची आलेखरेखा जन्म झाल्यापासून चढणीला लागते. सहाव्या वर्षी शिखराला पोहोचते, नंतर उताराला लागते आणि बारा ते तेराव्या वर्षी जवळजवळ पायथ्याशी पोचते.

३. जी मुले सहाव्या वर्षापूर्वी दोन भाषा चांगल्या आत्मसात करतात, ती जास्त चांगले शैक्षणिक यश संपादन करतात असे उघडकीस येत आहे. दुसऱ्या भाषेचं ज्ञान व ती बोलण्याची क्षमता यांचे स्थायीकरण उजव्या बाजूला झाल्याने मेंदूचा उजवा अर्धगोल प्रज्वलित होतो. थोडक्यात म्हणजे उजवा मेंदू डाव्याचे विश्लेषणात्मक काम उचलतो व स्वतःचे होलिस्टिक कामही जास्त चांगले करतो असे आढळून आले आहे. सबनीस म्हणतात की एकविसाव्या शतकात डाव्या मेंदूनी काम करणारे, यांत्रिक विचारपद्धतीचे रोजगार कमी होणार आहेत. यशाची नवीन क्षेत्र उघडणार आहेत ज्यांचा उजवा मेंदू अधिक कार्यक्षम आहे अशा लोकांसाठी. इंग्रजीबरोबरच मराठी आणि स्पॅनिश भाषा शिकून हे मेंदूचा उजवा अर्धगोल प्रज्वलित करण्याचं काम जर जास्त सुकर होणार असेल तर दुधात साखरच म्हणायला पाहिजे. नवीन पिढीला आपण नुसता संस्कृतीक

ठेवाच देणार नाही, तर पोटापाण्याच्या तरतुदीसाठी पण जास्त सक्षम करू.

सबनिसांच्या लेखामुळे माझ्या मनातल्या अनेक प्रश्नांची उत्तरं मला सापडली. माझी दोन्ही मुलं इथं जन्मली पण माझ्या माहितीतल्या काही लोकांची मुलं दोन तीन वर्षाची असताना इथं आली. त्या मुलांच्या तुलनेत माझ्या मुलांचे मराठी उच्चार व व्याकरण तितके शुद्ध (म्हणजेच भारतीय धाटणीचे!) नाहीत हे माझ्या लक्षात येई. मला वाटे दुसऱ्या तिसऱ्या वर्षी अमेरिकेत आलेलं मूल अमेरिकेतच जन्मून वाढल्यासारखं आहे. तरी त्याचं मराठी इतकं शुध्द कसं ? तसंच २८ वर्षापूर्वी मी अमेरिकेत पाऊल टाकलं तेव्हाचा माझा ॲक्सेट खूप जाड होता. त्यामानाने आता तो खूप कमी झाला आहे. तरीदेखील तो जन्मभर अमेरिकेत राहूनसुद्धा माझं बोलणं १०१ टक्के अमेरिकनांसारखं कधीच ऐकू येणार नाही याची मला खात्री आहे. ते का? त्याउलट इथे जन्मलेल्या आपल्या मुलांच्या बोलण्यात तो भारतीय ॲक्सेट का येत नाही ? पण त्यांच्या मराठी बोलण्याला अमेरिकन ॲक्सेट का येतो? चीनी लोक जेव्हा फ्राईड राइस म्हणतात तेव्हा आपल्या कानाला ते फ्लाईड लाईस असं बोबडं का ऐकू येतं ? भारतीय लोक व्ह आणि व (V & W) ह्या उच्चारात गल्लत का करतात?

आता मला कळतं की सहाव्या वर्षापर्यंत मेंदूचा लवचिकपणा सर्वात जास्त असल्यामुळे त्याआधी नैसर्गिकरित्या प्राप्त झालेल्या भाषेचे संस्कार, त्यातील ध्वनी, त्यातील उच्चार हे मेंदूत पक्के रुजतात व बाराव्या वर्षानंतर तो लवचिकपणा वठतो व ही भाषाप्राप्तीची नैसर्गिक क्षमता जवळजवळ नष्ट होते. प्रौढ चीनी लोकांना र हा उच्चार करताच येत नाही कारण तो ध्वनी त्यांच्या कानावर बालवयात पडलेलाच नसतो. त्याच न्यायाने क व ख मधला किंवा ग व घ मधला फरक किंवा ळ हे उच्चार, हे ध्वनी जर सहाव्या वर्षाच्या आत मुलांच्या कानावर पडले तरच ती मुलं ते स्पष्ट उच्चारू शकतात. तात्पर्य शाळेत जाण्याआधी, दुसऱ्या अभ्यासाचा बोजा वाढण्याआधी, सहाव्या वर्षापर्यंत, मुलांवर मराठीची बरसात केली तर विनासायास ती ही भाषा शिकतील. तो आनंद, ती शक्ती, तो ठेवा जन्मभर त्याची साथ करेल.

ह्या संदर्भातील एक उदाहरण बोलकं आहे. आमच्या एका स्नेह्यांची मुलगी (लकेरी) अमेरिकेत वाढूनही स्वच्छ, सुंदर, अस्खलित मराठी बोलते. तिचा नवरा अमेरिकन आहे व त्यांना एक तीन वर्षाची गोंडस मुलगी आहे, लीला ! लीलाची आई व आजोळचे सर्वजण तिच्याशी कटाक्षाने मराठी बोलतात. तिला ट्रीट किंवा कँडी ऐवजी खाऊ मिळतो. तिच्या अमेरिकन आजीआजोबांना पण हा खाऊ शब्द कळला आहे. म्हणून तिच्याशी बोलताना ते तो शब्द वापरत होते. पण अमेरिकन ॲक्सेट मुळे ते खाऊ म्हणत असले तरी ते ऐकू येत होतं काऊ ! लीला जीव तोडून त्यांना सांगत होती काऊ नाही, खाऊ. कारण? मराठी काऊ काव काव करतो, खायचा नसतो ! आणि अमेरिकन काऊ मू मू करते, हम्मा हम्मा नाही !

लकेरिच्याच पिढीतील आणखी एक तरूण आई (जाई) मला म्हणाली : "मावशी, परीची शाळा मलिकेतील पुढचे संच लवकर तयार कर न. कारण आईबाबांमुळे मला मराठी येतं. पण माझ्या मुलांना शिकवण्यासाठी मला आणखी साधनं मिळाली तर खूप उपयोगी पडतील. नाहीतर आमच्याइतकं मराठी मी मुलांना कसं शिकवू ?" नवीन जन्मलेलं मूल त्याला कुठली भाषा शिकायची हा निवडा करत नाही, करू शकत नाही. तो निवाडा त्याच्या मातापितरांनीच करायचा आहे. लकेरी व जाईसारख्या माता नवीन पिढीत असताना, नवीन साधनं, प्रगत अभ्यासक्रम आम्हाला हवेत असा लोभस हट्ट त्या करत असताना, मराठी मरत चालली आहे, इंग्रजी शिवाय तरणोपाय नाही, मराठीची गरज संपलेली आहे, असा उदास सूर लावायचा का तो लोभस हट्ट पुरवायचा ? हा निवाडा आमच्या पिढीनं करायचा आहे.

एक डॉक्टर मला म्हणाले : "अहो, मराठी टिकवण्यासाठी तुम्ही कशाला एवढ्या तडफडता आहात ? मराठी कशीही मरत चाललीच आहे. तेव्हा दोन रट्टे घालून आपणच तिला मारून टाकली तर काय फरक पडणार आहे ?" मराठी टिकवण्याच्या कार्यात, प्रयत्नात "परीची शाळा" हा एकाच रामबाण उपाय आहे असा माझा मुळीच दावा नाही. ह्या जगन्नाथाच्या रथाला लागलेला माझा एक हात आहे. पण त्याला मिळालेला प्रतिसाद बघता तो प्रभावी आहे हे निश्चित. त्यामुळे मी त्यांना एवढंच म्हणू शकले की तुमच्याकडे येणारा प्रत्येक रुग्णही एक ना एक दिवस मरणार हे तुम्हाला ठाऊक असतंच. तरीही तो जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत त्याला सुखावण्यासाठी, त्याची आयुमर्यादा लांबवण्यासाठी, त्याला निरोगी जीवन देण्यासाठी तुम्ही उपाययोजना करताच ना ? त्याच धर्तीवर माझे हे उपाय आहेत याची मला जाणीव आहे.

परवाच्या दिवशी माझ्या मुलाचा फोन आला. माझ्याशी तो कटाक्षाने मराठी बोलतो. मला म्हणाला: "आई, मी आज तुझ्याकडे जेवायला येणार होतो, पण मला जमणार नाही." मी म्हटलं :"का रे ? काय झालं ?" तर म्हणाला : "माझ्या मित्राची आजी *वारती* आहे तिला मला भेटायला जायचंय !"

My friend's grandma is dying ह्या अमेरिकन वाक्याचं हे शब्दशः भाषांतर! पण गंमत म्हणजे ते ऐकलं आणि डॉक्टरांच्या भविष्यवाणीने मनावर आलेली मरगळ एकदम कुठल्या कुठे पळाली आणि हा लेख लिहायला मी सुरुवात केली ! लेखाच्या सुरुवातीला मी म्हणलं होतं ना की मुलांच्या मनातला algorithm तयार झाला की ती मला सांगतील याची मला खात्री होती म्हणून !

शब्दकोड्याचे उत्तर

						१ बा	र	२ मा	ही
३ स	खा	४ रा	म	५ ग	ट	णे		स	
द्र		धा		ड		६ दा	ख	ले	
क्ष		घ		७ ची	ल्ल	र		दा	
णा		न		रो				र	
य		श्या		८ ली	ला	९ व	१० ती		
		११ म	१२ ध			१३ र	स		
			रा			च			
					१४ ओ	ढ	णी		
		१५ बा	ले	कि	ल्ला				

बंडू, राजू आणि छोटू बंडूच्या काकांकडे येतात ...
बंडू: काका काका, मास्तर म्हणाले कि उद्या काकांना शाळेत घेऊन ये.
बंडूचे काका: काय रे बंडू -
आता कसले नवीन उद्योग केलेस?
राजू: आम्ही ना ... मास्तरांचे लक्ष्य नाही बघून हळूच वर्गात लिमलेट च्या गोळ्या विकत होतो. पण मास्तरांनी बघितले.
बंडूचे काका: शाब्बास मुलांनो.
छोटू: आणि तेवढेच नाही ... मास्तरांचा तास सुरु असताना आम्ही पोरे वर्गा बाहेर पळवली आणि झाडावरच्या चिंचा पाडल्या. खूप मज्जा आली काका आम्हीचिंचा पाडण्यात नंबर वन. Solid धम्माल ...
पोरे एकदम खुश.
बंडूचे काका: अरे पण लेकांनो ...चिंचा पाडायला मास्तरांचा तास सोडून दुसरी वेळ मिळाली नाही का?
मास्तरांचा काही आदर राखावा. आता मास्तर प्रगती पुस्तकात शेरे टाकणार.
बंडू: अरे बापरे! असे करणार.
काका ... काका मला वाचवा!!

आपले खरेदीमय जीवन!!!

मेधा कुलकर्णी

खरेदी हा सगळ्यांचा जिव्हाळ्याचा विषय ,विशेषतः आम्हा बायकांचा !!!पूर्वी सणावारांनिमित्त होणारी हि खरेदी आता रोजचीच बाब झालीय. म्हणजे विरंगुळा !!!! उगाच वेळ जात नाही ..चला ,सुटीच्या दिवशी बाहेर जेवण झाल्यावर लागलीच काय घरी जायचं ?? ..चला, मुलांना वाढदिवसाला सोडल्यावर दोन-तीन तास काय करणार ??-चला.....अश्या एक न दोन कारणांनी आपण ह्या खरेदीच्या नादाला लागतो.

सेल हा एक सापळा आहे ह्यावर कुणाच दुमत नसावं, पण तरीही उंदराप्रमाणे त्यात अडकण्याचं सुखच आपल्याला जास्त वाटतं. मग त्यातून नको असणाऱ्या जागा अडविणाऱ्या वस्तू जमायला सुरुवात होते.त्यातून चार आईस्क्रीम चमचे, दोन तीन सोलणी, ढीगभर डबे, वेगवेगळ्या ताटल्या आणि पेले, निरनिराळी साबण, क्रीम आणि अश्याच काहीश्या गर्दी करण्याऱ्या व कधीही वापरल्या न जाण्याऱ्या नगांच्या राशी वाढीस लागतात.

पूर्वीच्या काळी अडगळीची खोली किंवा माळा हा नको असलेल्या वस्तुंच आश्रयस्थान असायचा , हल्ली जागा नसते एवढी पण मग घरातलीच बंद कपाट आणि इथे garage हे मदतीला येतात !!!

कपडे, दागिने, घरातील उपकरणं, सजावटीच्या वस्तू .....काय वाट्टेल ते सेलवर घेणारे आपण चोखंदळ ग्राहकातून फक्त साधारण ग्राहकात कधी येतो ते काळातच नाही !!

पूर्वी धान्याच्या देवाणघेवाणीतून चालणारे व्यवहार मग पैशांनी होऊ लागले. मापं आणि माध्यम बदलली पण जोश तोच !!!! माणसाच्या गरजा वाढल्या , सवयी बदलल्या तसा खरेदीचा अंदाजसुद्धा बदलला. पूर्वी गरजा भागवण्यासाठी होणारी खरेदी आता प्रतिष्ठा म्हणून किंवा आवड म्हणून होऊ लागली. दुसऱ्यासारखे ... प्रसंगाला शोभेलसे ...माझ्या आवडीप्रमाणे, ह्या निमित्ताने खरेदी होताच असते !!!

आताच्या जाहिरात युगाने लोकांच्या मनाचा कल ओळखून ह्याला हातभार लावला नसता तरच नवल ! दुकानांनी आणि त्यांच्या आतल्या रेलचेलीने तर कधीच कात टाकली आहे. बाहेरून दिसणाऱ्या शोभेतून, आत जाण्याची उत्सुकता निर्माण न व्हावी हे कसे शक्य ?? प्रत्येक ऋतूचे, सणाचे, वेगवेगळ्या डेचे उदात्तीकरण करून ग्राहकांना खरेदीला भाग पाडण्याची अशी जणू स्पर्धाच व्यवसाय करणार्यांमध्ये झालीय !!! लहानलहान गोष्टींचा विचार करणारे आपण ह्या सापळ्यात कसे बरे अडकत जातो ?? मला वाटत त्याच मुख्य कारण आपल्या बदललेल्या सवयी !!!

Health concious असलेले आपण Organic गोष्टी आणण्यासाठी बाहेर पडतो, फ्रीजमध्ये जास्त ठेवलेले अन्न आणि भाजीपाला चांगला नाही म्हणून दर तीन चार दिवसात दुकान गाठतो. फक्त लागणाऱ्या चार गोष्टी न घेता उगाच ह्या त्या Aisle मध्ये डोकावतो आणि नवलाईची एखादी गोष्ट दृष्टीस पडल्यावर फक्त किंमत बघून पटकन घेऊन मोकळे होतो. उपयोगाचा फारसा विचार न करता होणारी हि खरेदी अशीच चालू असते ....

पूर्वी भाजीवाली बाई दारावरच भाजी घेऊन यायची, हल्लीसुद्धा येतात गावाकडे, पण तिच्याकडून भाजी घेतल्यावर इतर चार ठिकाणी बघण्याची संधीच

कुठे?? महिन्याचा किराणा महिन्याच्या सुरुवातीलाच आणून पडल्यावर परत दुकानात जाण्याची वेळच यायची नाही. हीच बाब कपड्यांची. दोन घरातले, दोन बाहेरचे, दोन ठेवणीतले. चवथा जोड नाही !! हवाई चपला ह्या सगळ्या कपड्यांवर perfect match असायच्या !!सोन्याचा एखादा दागिना सजण्यासाठी पुरेसा तर पावडर आणि स्नो (Ponds) फारतर त्याला जोडीला लागायचे .....खरेदीला जाऊन आणखीन काय आणणार?

आता काळ बदलला. कपडे व त्याला साजेश्या त्या बरोबरीच्या इतर गोष्टी ओघान आल्याच ..फॅशनच्या बदलत्या काळात काळाबरोबर चालणंही महत्वाचच .. अद्ययावत उपकरण घरात हवीच मग खरेदी होणारच कि हो !!

पूर्वीच्याकाळी असणाऱ्या वर्ण व्यवस्थेमुळे व्यवसाय विभागले गेले, एकमेकांवर अवलंबून असलेल्या गोष्टींची देवाणघेवाण खरेदी-विक्रीतून सुरु झाली. त्यातून अर्थ व्यवस्था तयार झाली आणि मग राज्याचा कणा बनली. तयार झालेल्या मालाची व पदार्थांची चव जाणणारा ग्राहकच नसेल तर उपयोग काय?? मग विक्रीच्या युक्त्या प्रयुक्त्या आणि ओघाने मग आली खरेदी !!

तर मंडळी गरजेवर चालू झालेल्या ह्या प्रक्रियेचा विरंगुळा कधी झाला समजलाच नाही. चालू बंद होण्याऱ्या Open च्या neon signs, सुंदर सजावट, आकर्षक packaging आणि कमीत कमी पैश्यात ग्राहकाला खुणावण्याची स्पर्धा हि प्रत्येकाच्या अंगवळणी पडली किंबहुना आपल्या आयुष्याचा घटकच बनली.

संप किंवा सार्वजनिक सुटीमुळे बंद असणारी दुकान आणि त्यामुळे नसणारी वर्दळ नकोशी वाटू लागली. सतत गर्दीची सवय अंगवळणी पडू लागली प्रत्येक गोष्टीचा बाजार होतोय म्हणणारे आपण मात्र गर्दीत वाट काढत तरीही खरेदीला जाण्यात आनंद मानु लागलो. कुटुंबात कमी होण्याऱ्या माणसांची कसर आणि वर्दळ अश्या तऱ्हेने बाहेर जाऊन अनुभवू लागलो !! हो खरच कुटुंब व्यवस्थेच्या बदललेल्या स्थितीचा असाही परिणाम म्हणायचा !! मोठ्या कुटुंबकबिल्यात दिवसभर राबणाऱ्या बायका चुलत्याबरोबर खेळण्यात रमलेली मुले हे चित्र दिसतं कुठे ?

दिवाळीचा फराळ असो वा संक्रांतीच्या गुळपोळ्या आणि वड्या, फार काय लोणची पापड सुध्धा काही काही घरात म्हणून नाहीच.

एका क्लिकवर निरोप इकडचा तिकडे, बसल्या बसल्या skype वरचा संवाद आणि विचारपूस, फोनवरच दिलेल्या शुभेछया आणि आमंत्रणं किती बदललय जीवन पण ह्या बदलत्या जीवनात आणि रोजच्या routine मध्ये बदलली नाही ती फक्त वाढणारी खरेदी !!!

$$$$$$$$$$

आठवणींचे गाव

लीना मोरे

रात्रीच्या शांततेत मी हरवून जाते,

मन मात्र आठवणींच्या गावी फिरून येते.

अंगणात होणारी पिंपळाची सळसळ,

ग्रीष्मात होणारी उन्हाची तळतळ

आजीची होणारी माझ्यासाठी तळमळ,

सारे काही पुन्हा मी अनुभवून घेते,

मन मात्र आठवणींच्या गावी फिरून येते.

वडाच्या पारावर मैत्रिणी साऱ्या,

तिखट-मिठाच्या कच्च्या कैऱ्या,

तुटलेल्या फरशीच्या सात लगोऱ्या,

खोटेच पण पुन्हा मी खेळून घेते,

मन मात्र आठवणींच्या गावी फिरून येते.

प्राजक्ताच्या फुलांचा सुटलेला गंध,

सुगंधाने झालेली हवा धुंद,

गडद झालेले मैत्रीचे बंध,

प्रयासाने स्वतःत सामावून घेते,

मन मात्र आठवणींच्या गावी फिरून येते.

तिन्ही सांजेला काढलेली दृष्ट,

घरपण जपणारे साऱ्यांचे कष्ट,

कधी न संपणारी आजीची गोष्ट,

आजीच्या कुशीत मी सुखावून जाते,

मन मात्र आठवणींच्या गावी फिरून येते.

GMM के शोले

गर्जा महाराष्ट्र माझाचा गणेशोत्सवात यशस्वी प्रयोग सादर झाल्यानंतरची गोष्ट. मोठ्ठी इमेल साखळी सुरु होती आणि अचानक विद्येशने शोले चित्रपटातला गब्बर जर मंगळागौर टीमच्या तावडीत सापडला असता तर काय? अशा प्रसंगाचं वर्णन केलं. झालं ! बघता बघता सगळ्यांना स्पुरण चढून कुणी त्यावर चारोळ्या केल्या तर कुणी कविता. शेतकरी नृत्य, शेवटची हाणामारी, ठाकूर, वीरू, जय कुठला प्रसंग सोडला नाही. शेवटी प्रत्येक सुपर-हिट सिनेमाप्रमाणे सिक्वेलचेही प्रसंग लिहून झाले. “ही सुपं कशासाठी आणलीत” वरून सुरु झालेली गाडी “तुम साइन करोगे या नाही” वर आली आणि GMM के शोले ने सुरु झालेलं गब्बर पुराण शेवटी GMM कि दीवार वर थाबवावं लागलं.

आरे ओ नाना तू आठे कोठे उना?

योगेश कुलकर्णी

(अहिराणी ही खानदेशची बोलीभाषा. फार वर्षांपूर्वी एका वर्तमानपत्रात या धर्तीवर लेखमाला येत असे तिला आजच्या संदर्भात पुन्हा प्रकाशित करण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न. कुणाच्या वैयक्तिक भावना दुखावण्याचा आमचा हेतू नाही पण तसे वाटल्यास दिलगिरी व्यक्त करतो. तसेच पात्र व पार्श्वभूमी ओळखीची वाटल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.)

स्थळ :- कुणा सांस्कृतिक मंडळाच्या सदस्याचे घर

वेळ :- रविवार दुपार

पात्र:- निळू (अध्यक्ष) , चित्रा , अजित , नाना, बनू...(सगळे सदस्य)

अरे ओ नाना तू आठे कोठे उना ?

नाना:- कोठे जाऊ मी आते ,मिटिंग तर आठेच शे. जरा चा पानी व्हयी तर मिटिंगले जोर येई म्हनस मी

चित्रा :- लोकेस्वो ,चा पानी नं सोडा आन जरा मंडयना विचार करा . तीन महिना व्हयी ग्यात आनी एक भी मजाना कार्यक्रम नई. अरे चालनं काय शे ?

निळू :- अरे पन गड्यास्वो मी काय म्हनस मांगे तो आॅरकेसक्ट्रा आपन लयनू कर्ज करीसन. त्याना पैसा नै दिधात अजून . ती बँकवाली बाई फोन करीसन वजी तरास करी ऱ्हायनी.

बनू :- पैसा - पैसा मरीमाय खाई जाओ पैसा . आरे मंडय शे का पैसाना कारखाना ? एक तर बठठा कार्यक्रम लास मा आन लोकेस्ले जोयजे पैसा !!

अजित :- पैसा कम पडी ऱ्हायना का ? मनाजोडे एक आयडीया शे. मंडयनी फी वाढई टाकसुत ....कार्यक्रम नं तिकीट भी वाढई टाकसुत . अरे लोकेसले चांगला रोड द्या , लोक तुम्हले टोल देतीन असं आमना नागपूरना नितीनभाऊ सांगस.

नाना :- ओ नितीनभाऊना चेला तुम्हना गावले अश्या नाटाबाई नई व्हतीन. ईचार आपना अध्यक्षाले . अरे तो धोबी भी कपडा बागी आपटत व्हई असा धूयेल शे अध्यक्षाले नाटाबाईनी.

निळू :- (आठवणीने सुद्धा कळवळतो) नाव बी नको काढू गड्या त्या नाटाबाईनं आठे कार्यक्रम लागना रे लागना का तठे मले धोई टाका . फी वाढनी धु , कार्यक्रम खराब व्हयना धु , जेवन मा मीठ कमी धु .....अरे अध्यक्ष नई व्हयना धोबिना कपडा व्हई ग्या. जो देखी तो ईसन धोई ऱ्हायना.

बनू :- खर शे निळूभाऊ . आज आपनी बहिणाबाई व्हती तर " अरे मंडय मंडय जसा तवा चुल्यावर .." लिखति . (निळूला दोन क्षण आपण चुलीवर बसल्याचा भास होतो).

अजित :- पन मी काय म्हनस एक खटाखट हिट पीच्चर लाई टाकू दादा कोंडकेना . लोके बी रग्गड अन कार्यक्रम बी खराब व्हता अशी कटकट नै.

चित्रा :- ते इतल सरय नै शे भाऊ . लोके पिच्चरमा बी चा अनी वडा मांगतसं . Batman ले स्वताना पैसा दिसन लिमलेटन्या गोया खातीन पन मंडयना पिच्चरले वडा नी चा मांगतीन .

नाना :- अरे चा मा बी सतरा नाच नचाडतस. पानी बिसलेरी वापरेल शे का?....दुध फॅटवालं शे का बिगर फॅटवालं? ....साखर पहिले काबर टाकनी? ....अन कप असाच काबर आननना?.....दोन कचराकुंडी ठेवाले काय व्हस? मंडयना कार्यक्रम शे का मव्हा पोरीन लगिन ? इतनी तर पंजावाली बाईबी पंतप्रधानले नई नाचाडत व्हई !!

निळू :- शांत व्हई जा नाना ... भोग ऱ्हातस नशीबना . अरे एक सावा फेरा पडना कि भोगवं लागस गड्या

चित्रा :- हाई पिच्चर बिच्चरनं काई खर नै. असं करान का? एक नाटक लई येसुत. एक नाटक कंपनीना हिरो मना लई वळखमा शे. तो आपना करता आठे एक फस्कलास ईनोदी नाटक ली येई पुनाथून.

बनू :- मी या पुनाना हिरोनी लई ष्टोरी ऐकेल शे. महाभारतमा भीष्मनी प्रतीग्या नंतर हाईचं एक हे ज्यानी आन खाएल शे कि भले रस्तावर खेय करसू पन कोनता मंडयन तोंड नई देखाऊ.

अजित :- सोप्प शे मग. आपन त्याले सांगवोच नई कि नाटक मंडयमा करानं शे. बठठा प्राब्लेम सुटना.

निळू :- म्हणे प्राब्लेम सुटी ग्या. तो लई हुशार शे. आपनाच घरमा यीसन आपलाच मायबापले तिकीट इकि जाईन आनी आपला मागे सुध भी नई लागाऊ. आपण गड्या नाचच करसुत.

नाना :- हाइ काई व्हयानी मुद्यानी गोट. आरे आपन बठ्ठा मराठी मानशे , बाता मोठ्या करसुत पन कोना ना कोना तालवर जिंदगीभर नाचसुत. नाच आपला रगतमाच शे. कधी मायबापना, कधी बायकोना, कधी पोरेस्ना तर कधी लोकेस्ना तालवर.

बनू :- तर मंग ठरन, दिवाईमा नाचनी जादू समदीकडे. चित्रा वडापाव काढ बैन अन डबल चा ठेव आते. डोकं वजी फिरेल शे.

सगळे वडापाव खातात व चहा पिऊ लागतात पण का कुणास ठाऊक वड्यात मीठ आणि चहात साखर नसल्याने सगळ्यांचं वाजतं आणि शेवटी आपलं एकमत होऊ शकत नाही यावर एकमत होऊन मिटिंग संपते (कि तुटते ?).....

नाना घरी येत नाही तोवर त्याची बायको विचारते “अरे ओ नाना तू आठे कुठे ....”

ता.क. वर्षभराने ही मंडळी पुन्हा एकत्र येतात आणि कोला-दर्शन नावाचा बँड काढतात.

|| गार्बेजचा कचरा ||

एक मिग्लीश कविता

-सुरेश पित्रे

वन डे एके दिवशी , बॉय हा मुलगा

सिटीच्या शहरात , फिरायला गेला ||१||

रोडच्या रस्त्यावर , कॉर्नरच्या कोप-यात

गारबेजचा कचरा , जिथे तिथे दिसला ||२||

बॅड बॅड घाणेरडया, स्मेलच्या वासाने

ब्रीदिंगचा श्वास त्याचा, घुसमटून गेला ||३||

कच-याच्या घाणीने , नाईटच्या रात्री

डास हा मॉस्कीटो, कडकडून चावला ||४||

सिटीच्या शहरातून, बाहेर जाताना

कचरा डंपिंगचा , वास त्याला आलां ||५||

कचरा जाळताना, एअरच्या हवेच्या

पॉयझनसच्या विषारी, स्मोकच्या धुराने ||६||

बॉय हा मुलगा , ब्रीदिंगच्या श्वासाच्या

प्रॉब्लेमच्या त्रासाने, गुदमरून गेला ||७||

बॉय हा मुलगा , वैतागुन म्हणाला

सिटीच्या शहरात, रोडच्या रस्त्यावर ||८||

कॉर्नरच्या कोप-यावर, रोड हा रस्ता कधी

कचरा गार्बेजशिवाय ,असणारच नाही का ? ||९||

वास्को दि गामाने आणलेले मसाले गेले कुठे?

वैशाली जोशी

दोन महिन्या पूर्वी आम्ही दोघें पोर्चुगलला गेलो होतो तेव्हा एक दिवस लिस्बनला आम्ही वास्को दि गामाची कबर बघायला गेलो होतो. तिथे असताना कबरी जवळ मी डोळे बंद करून शांत पणे उभी असताना मला कबरीतून आवाज ऐकू आला " मला जर का असे होणार हे माहित असते तर जीव धोक्यात टाकून भारताला मसाले आणायला गेलोच नसतो" वास्को दि गामा माझ्याशी खरच बोलला कि हा भास होता, आणि भास नसला तर तो असे का म्हणाला ह्याचा विचार क्षणभर आला. पण लिस्बनची इतर प्रेक्षणीय स्थळे बघण्यात हा प्रसंग विसरून गेले.

आम्ही एका रात्री लिस्बनला चांगल्या उपाहारगृहात रात्रीचे जेवण घ्यायला गेलो होतो. जेवणाला सुरुवात भोपळ्याच्या सुपाने झाली. सुपाचा पहिला चमचा तोंडात ठेवल्या बरोबरच ते अगदी आळणी असून त्यात कोठल्याही प्रकारचे मसाले किंव्हा तिखट घातलेले नसल्याचे लक्षात आले. आम्ही व्हेकेशनवर आहोत हे लक्षात घेऊन, कोठल्याही गोष्टीचा मनःस्ताप करून न घेण्याचे निघण्या पूर्वीच ठरवले होते. असे अनुभव हा नवीन देश बघण्याचे जे अनुभव असतात त्यातलाच भाग समजून, मी जरा वेटरची गंमत करायचे ठरवले व त्याला बोलावून म्हंटले " वास्को दि गामा मोठा पराक्रम करून, समुद्राचा हजारो मैलाचा अतिशय धोक्याचा प्रवास करून, मसाल्या साठी भारतात येऊन, जहाज भरून अनेक वर्षे मसाले आणीत होता. आज मी त्याच्या देशात हजारो मैलाचा प्रवास करून आले आहे तर मला असे विचारावेसे वाटते कि ते सगळे मसाले गेले कुठे?" बिचारा वेटर ओशाळलेले हास्य देऊन, खांदे उडवत निघून गेला. पण त्या नंतर अचानक मला वास्को दि गामाच्या कबरीला भेट दिली होती तेव्हांचे त्याचे शब्द आठवले व त्याचा अर्थ उमजला. मसाले नसलेले खाद्य पदार्थ खाणाऱ्या आजच्या पोर्चुगल देशा विषयी तो बहुधा बोलत असावा!

आम्ही पोर्चुगलचा प्रवास संपवून अमेरिकेला परतलो पण त्या लिस्बनच्या रेस्टोरंटमध्ये मसाले नसल्याचे काही केल्या मनातून जात नव्हते. युरोपमध्ये लोकांना मसाल्याची सवय का झाली नाही, मसाले वापरायचे त्यांनी का सोडून दिले? ह्या गोष्टीचे संशोधन करायचे आणि त्याची कारणे शोधायचे ठरवले.

चवदाव्या शतकांत युरोप मध्ये शेतकरी अगदी छोट्या जमिनीत शेती करीत असत. वारसात जमिनीची वाटणी करणे ह्यामुळे खूप कठीण होऊ लागले. ह्याचा उपाय म्हणून एक नवा कायदा करण्यात आला ज्यात जमीन फक्त मोठ्या मुलालाच मिळेल असे ठरवण्यात आले. अचानक इतर लहान भावंडांना उदरनिर्वाह करणे मोठे कठीण होऊ लागले. ही मुले कुठलेही काम करायला तयार होती.

हा काळ धर्मांधतेचा (डार्क एजीस) होता. टर्कीश सेलीजक साम्राज्याने इस १०७१ मध्ये जेरुसलेम वर आक्रमण करून मुस्लीम धर्मी राज्याची स्थापना केली. ख्रिस्ती धर्मगुरू ह्या पवित्र भूमी वर (होली लँड) पुन्हा ख्रिस्ती राज्य करण्या साठी उत्सुक होते व त्या साठी धर्मयुध्ध (क्रुसेड) करायच्या तयारीला लागले होते. ही धर्मयुद्धे इस १०९५ ते १२९१ पर्यंत चालली. त्यांना सुशक्त गरीब तरुणांची गरज होती. त्यांनी वरील तरुणांना धर्मयुद्धात सैनिक म्हणून भरती केले. त्या काळी समुद्राचा प्रवास अतिशय धोक्याचा होता. शेकडो तरुण समुद्रावर लुटारूंशी (पायरेट्स) लढण्यात मरण पावले. अनेक तरुण गळक्या जहाजात बुडून मेले. आज जिथे क्रोएशिया आहे तिथ पर्यंत सुद्धा येऊ शकले नाही.

असे हे थकलेले घायाळ तरुण थोडा आराम घेण्या साठी त्या काळातील ख्रिस्ती बीझनटीन साम्राज्याची राजधानी कोंस्टनटीनोपोल ह्या शहरात राहिले. ह्या गरीब मुलांनी सबंध आयुष्यात कधीही असे ऐश्वर्य, अशी समृद्धी, असे चवदार मसाल्यांनी रंगावलेले खाद्य पदार्थ बघितले नव्हते, खाल्ले नव्हते. धर्मयुद्ध संपल्या वर स्वतःच्या देशांना परतल्या वर ह्या तरुणांनी मसाल्याच्या पदार्थांचे वर्णन करून, प्रचार करून, युरोपाला मसाल्याचे वेड लावले. भारतातून मोठ्या प्रमाणात मसाले रेशीम-मार्गाने (सिल्क-रोड) आणायला सुरुवात झाली. आत्ता पर्यंत हा मार्ग ख्रिस्त-धर्मी बिझनटीन साम्राज्याच्या ताब्यात होता पण ओटोमन साम्राज्याने आपले वर्चस्व वाढवायचे सुरु केले होते, त्या मुळे हळू हळू कोंस्टनटिनोपोलचा ताबा ओटोमान साम्राज्य कडे इ.स. १४५३ साली गेला. आणि टर्किश व्यापाऱ्यांनी मसाल्याची किंमत अनेक पटीने वाढवण्यास सुरुवात केली. शेवटी कंटाळून युरोपिअन देशांनी भारतात जाण्याचा जल-मार्ग शोधण्याचे धाडस घेण्याचे ठरवले. युरोपचा नुकताच झालेला सांस्कृतिक पुनर्जन्म (renaissance) पण ह्याला कारणीभूत होता, ज्याच्या मुळे नवीन चांगली जहाजे, नवीन त्रिकोणी शीड, वगैरे आता उपलब्ध झाले होते.

स्पेनची राणी इझाबेलाने कोलंबसला जहाजाने समुद्र मार्गाने भारताला जाण्या साठी पाठवला. तो भारताच्या ऐवजी चुकून, आज ज्याला बहामा म्हंटले जाते त्या बेटा वर आला व या बेटाला भारत समजून त्याला भेटलेल्या लोकांना त्याने इंडिअन असे नाव दिले.

स्पेनला लागून असणार्या पोर्चुगल देशाने चार वर्षाने वास्को डी गामाला पाठवला. दक्षिण आफ्रिकेला वळसा घालून, पूर्व आफ्रिकेला जावून नंतर तो कालीकटला आला व जहाज भरून मसाले घेवून गेला. जहाजातून आणलेल्या मसाल्याची किंमत एका सफरीच्या खर्चा पेक्षा ५० पटीने जास्त होती! जरी मसाल्याची बरीच मागणी होती पण अजूनही लोकांना त्याची सवय झालेली नव्हती. अशी सवंय लागायच्या आधीच ह्याच काळात शेती मध्ये वेग वेगळ्या धान्याची आलटून पालटून लागवण करून पिक वाढायला सुरुवात झाली होती व आता वर्षभर पिक होऊ शकत होते. त्या मुळे लोकांना अशा लागवणीतून वर्षभर अन्न मिळायला सुरुवात झाली होती. अमेरिका खंडातून ब्राझील कडून प्रथमच साखर आणायला सुरुवात झाली होती व चीन मधून चहा आणायला सुरुवात झाली होती. लोकांना मसाल्याच्या ऐवजी आता अचानक साखर आणि चहाचे वेड लागले होते.(साखरेच्या धंद्या मध्ये प्रचंड फायदा होत असे त्या मुळे डच लोकांनी मॅनहाटन बेट सुरीनाम देशासाठी विनिमय केले!) ह्या वस्तू आणण्याचा धंदा खूप फायद्याचा झाला होता त्या मुळे हळू हळू मसाल्याची आवड कमी होऊन मसाल्याची जागा आता साखर आणि चहाने घेतली आणि "मागणी नाही पुरवठा नाही" ह्या नियमानुसार (demand and supply) मसाल्याचे महत्व संपले. युरोपिअन लोकांना मसाल्याची गोडी व सवय लागायच्या आधीच अशा रितीने मसाल्याचे प्रेम संपले.

आणि ह्या सगळ्या कारणां मुळे मला त्या दिवशी वास्को दि गामाच्या दुःखात सहभागी होवून, लिस्बनला मसाला नसलेले अगदी अळणी सूप त्या उपाहारगृहात खावे लागले!

****$****

गब्बरायण

जंगलागौरीचे करतो मनापासून पूजन
अबे दोस्तो हटो, मला बोलावते हेलन

मेहबूबाला सांगाया लाजू नको मर्दा
तुझ्या इतकाच प्यारा मला बंदूकछाप जर्दा


ॐ गं गणपतये नमः

MTM
INDIAN FOODS INC.
9225, WEST PARMER LANE, AUSTIN, TX,78717
Location: Intersection of FM 620 & Parmer Lane
Next to 7-11 Gas Station and Sonic
PH: 512-249-0075
Store Hours: Mon-Sat, from 11 am to 9 pm and on Sundays from Noon – 9pm
For all Indian Groceries and Spices. We specialise in South Indian Foods.
We carry major brands like Daily Delights, MMRF, Wynad Foods, Eastern, Double Horse, Nirapara ,etc.
We also carry different varities of Kerala Fish and frozen Goat meat.
Fresh Vegetables are available daily at a lowest price. No one beats our qual and no one matches our price, Guaranteed.
Delicious Indian Sweets and Fresh Snacks available
Frozen Foods
Fresh Samosa, Paripuvada & Beef Cutlets are available on Saturdays and Sundays
Latest Malayalam, Hindi, Tamil and Telugu DVD's are available

San Gabriel Park


APNA BAZAAR
INDIAN GROCERIES
Providing EXCELLENT customer service
Jozito George
Owner
8650 Spicewood Springs RD.
Ste# 133B Austin TX, 78759
Ph: (512) 249-0202
Fax: (512) 249-0202
www.apnabazaaraustin.com
$10 OFF DINNER MENU
When you buy $ 30 or more in food. Good after 5.30pm.
Expires 12/31/2012.
Maharaja Indian Cafe
Not good with any other offer. Drinks and gratuity not included. Dine in only. Limit only 1 card per table.
Fax: 512-249-0202
8650 Spicewood Springs Road
Suite 119
Austin, TX 78759

OBAMA OR ROMNEY?

Give Me Insurance
Good Rates. Great Service

www.givemeinsurance.com

Kiran Sathaye
972-556-0556

१९९९ पासून **TEXAS** मधील ग्राहकांच्या सेवेत.

आपले घर, गाडी, आरोग्य आणि जीवनविमा संदर्भात किंमत तात्काळ जाणून घेण्यासाठी क्लीक करा, www.givemeinsurance.com अथवा दूरध्वनी वरून संपर्क साधा.

श्री. किरण साठये (९७२) ५५६ ०५५६

We are an independent insurance agency representing several insurance companies.

Please visit us online to receive instant quotes from one or more of the following companies

SOME OF THE COMPANIES WE REPRESENT

The Hartford | Travelers | Metlife Auto & Home | Fidelity | Kemper | ASI Lloyds Safeco | Universal | State Auto

Call:
Kiran Sathaye for more details (972) 556-0556.
Address: 11496 Luna Road, Suite 400, Dallas, Texas 75234

बीटरूट सार

१ मध्यम उकडलेले आणि किसलेले बीट

२ कप ताजे खोवलेले खोबरे

१ हिरवी मिरची

१ आल्याचा बारीक तुकडा

१ चमचा जीरा पावडर

मीठ, साखर चवीनुसार

वरील सर्व साहित्य २ कप पाणी घालून मिक्सर मध्ये घालून एकजीव करून घ्या . लागेल तर थोडे पाणी घाला व गाळून घ्या . त्यात २-३ कप ताक घाला .मंद आचेवर ठेवून द्या .१ चमचा जीरा पावडर, मीठ व साखर घालून घ्या . तुपाची फोडणी (तूप, जीरा, कढीपत्ता आणि हिंग) ह्या मध्ये घाला आणि वरून कोथिंबीर घाला. छान गुलाबी रंग येतो. गरमागरम प्यायला द्या.

-मीना बलकुंदी

बास्केट चाट

१ मोठ्ठा लांबट बटाटा

१ चमचा कॉर्नफ्लावर

२ थेंब लेमन फूड कलर

२ गाळण्या

प्रथमं बटाटयाची साल काढून एकाच दिशेने किसणे ,२ ते ३ वेळा पाण्यातून काढणे. कापडावर कीस कोरडा करून घेणे , त्यात १ चमचा कॉर्नफ्लावर व रंग घालणे.

१ गाळणी तेलात बुडवून घेणे ,त्यात कीस पसरवून घालणे व दुसरी गाळणी तेलात बुडवून घेऊन पहिल्या गाळणीवर दाबणे. मग त्या गाळण्या गरम तेलात धरुन गोल्डन ब्राऊन होऊपर्यंत तळणे. गाळण्या बाजूला करणे म्हणजे बास्केट तयार होईल.

त्यांत प्रथम उकडून मीठ हळद लावलेले कोरडे छोले, त्या नंतर मेदुवड्याचे तुकडे, आलू टिक्कीचे तुकडे, शेवपुरीच्या पुऱ्यांचे तुकडे, पुदिना चटणी , चिंच गुळ खजूर चटणी ,चाट मसाला व शेव घालणे.

पाव किलो चक्का घेऊन त्यात सधारण १कप दूध घालून घुसळणे. त्यात ४ चमचे किवा गोडसर होईपर्यंत साखर घालणे. ते दही बास्केट झाकली जाईपर्यंत घालणे व त्यावर थोडे लालतिखट, डाळिंबाचे दाणे आणि कोथिंबीर घालून खायला देणे.

-शुभदा दिलीप घाटे

टेस्टी टोफुचा पराठा

३ कप कणीक

१ कप किसलेला टोफू (हार्ड टोफू)

१/२ कप बारीक चिरलेली कोथिंबीर

१/२ टीस्पून हळद

१.५ टेबलस्पून आलं, लसून, हिरवीमिरची पेस्ट

१. ५ टेबलस्पून धणा जिरे पूड

मीठ चवीनुसार

वरील सर्व साहित्य एकत्र करून घ्या. लागेल तेवढे पाणी घालून गोळा भिजवा . लहान गोळा घेऊन लाटा व तव्यावर इतर पराठ्यांसारखे भाजा. गरम गरम सर्व्ह करा.

- अश्विनी बलकुंदी

भरली कार्ल्याची भाजी

८-१० छोटी कारली

७-८ लसूण पाकळ्या

१/२ कांदा चिरून

सुक्या खोबऱ्याचा कीस

धने-जिरे पावडर

गरम मसाला

मीठ चवीप्रमाणे

कार्ल्याला काप देऊन , बिया काढून मिठाच्या पाण्यात उकडून घ्यावी. वरील सर्व मसाल्याचे साहित्य एकत्र दळून घ्या. कार्ली रोळीत उपसून त्यात दळलेला मसाला भरा व दोऱ्याने घट्ट बांधा. नंतर कढईत तेलावर खरपूस परता. एकदम खुसखुशीत भाजी तयार होईल व ही ८-१० दिवस टिकेल.

- प्रतिभा प्र कुलकर्णी

आंबा नारळ बर्फी

४ कप खोवलेला नारळ

२ कप साखर

१ कप आंब्याचा रस

१/२ कप मिल्क पावडर

१.५ चमचा पिठीसाखर

१ चमचा वेलदोडापूड

वरील सर्व साहित्य एकत्र करून मिश्रण शिजायला ठेवा. सारखे ढवळत राहा. मिश्रणाचा एक गोळा होऊ लागला कि खाली उतरवा. वेलदोडापूड आणि पिठीसाखर घालून परत मिक्स करा व तूप लावलेल्या ट्रेवर लगेच वड्या पाडा. २५-३० वड्या होतात.

- मीना बलकुंदी

शंकरपाळी

१ कप पाणी

१ कप साखर

१ कप तूप/क्रिस्को

२ चमचा बारीक रवा

तेल तळणी करता

मैदा

पाणी, साखर, तूप एकत्र करून मंद आचेवर ठेवा. साखर, तूप विरघळले कि एक उकळी आणा. हे मिश्रण कोमट झाले कि बसेल तेवढा मैदा घाला आणि २ चमचे बारीक रवा मिक्स करा.

पुरीच्या कणके सारखे घट्ट भिजवा . दोन तासांनी मिश्रणाचे गोळे करून पोळ्या लाटा. सुरीने चौकोनी शंकरपाळे कापा व तळून काढा. हे शंकरपाळे खुसखुशीत होतात. १ किलो शंकरपाळे होतात.

- अश्विनी बलकुंदी

दही दुधाच्या वड्या

१/२ किलो दही

१/२ लिटर दुध (दह्याच्या समप्रमाणात)

१/२ किलो साखर

१ ओल्या नारळाचा खव

पिस्ता, बदामाचे काप

वेलदोडा पूड

दही, दुध व ओल्या नारळाचा खव एकत्र करून उकळायला ठेवावे. थोडे उकळल्यावर त्यात साखर घालावी. हे मिश्रण आटायला बराच वेळ लागतो. कडा सुटून आल्या कि खाली उतरवून पुन्हा घोटावे. वड्या होतील इतके घट्ट झाले कि त्यात वेलदोडा पूड घालावी. ताटाला तूप लाऊन थापाव्या व वरून पिस्ता, बदामाचे काप लावावे. या वड्या श्रीखंडासारख्या लागतात.

-प्रतिभा प्र कुलकर्णी

क्रॅनबेरी चटणी

१२ औस फ्रेश क्रॅनबेरी पाकीट

१ चमचा जिरं, थोडी जिरे पावडर

१/२ चमचा लाल तिखट

गूळ, साखर, मीठ चवीनुसार

कोथिंबीर

क्रॅनबेरी मिक्सरमधून जाड दळून घेणे. पेस्ट करू नये. गुळाचे प्रमाण साखरेपेक्षा जास्त घेणे. दळलेल्या क्रॅनबेरीमध्ये गूळ, साखर, जिरं,लाल तिखट, जीरा पावडर, मीठ घालून एकजीव करणे. वर कोथिंबीर घालून खायला द्या .

-अश्विनी बलकुंदी

Russian Salad

Ingredients:

100 gms each cabbage, carrots, sweet corns, yellow capsicum, red capsicum, green or orange capsicum, raw mushrooms, pineapple, pomegranate

250 gms mayonnaise or by taste

Salt & pepper for seasoning



Method:

Cut all vegetables & pineapple into small cubes. Keep all vegetables except mushrooms on a strainer.

Place the vegetable strainer on a pot of boiling water. Steam vegetables for about 5-7 mins or just done. Place all steamed vegetables in a separate bowl. Add raw mushrooms, pineapple, and pomegranate to the vegetables. Mix mayonnaise with all fruits & vegetables. Sprinkle salt & pepper. Garnish with pomegranate & mint leaves.

Best served when cold. Enjoy with burgers or sandwiches of your choice

-Aarti Dighe

चित्रकार: ऋचा जोशी

चित्रकार: राधा



राघू

योगेश कुलकर्णी

“राघू, अरे राघू. येतोस न आत? किती खेळशील? संध्याकाळ झाली बघ.”

“आलोच आई. फक्त ५ मिनिट. या वेळी खरच शेवटचे ५.”

राघू घरात आला तोच दमून भागून. कपडे खेळून मळलेले, घामाच्या धारा, पळून पळून धाप लागलेली.

“ए आई , खूप भूक लागली आहे. मला काहीतरी खायला दे आत्ताच्या आत्ता.”

“बाळ, असं करतात का कधी ? कसा अवतार केला आहेस बघ बर. बाबा आणि आजोबा येतील इतक्यात. त्यांनी बघितला न असा अवतार तर ... पळ पटकन आणि हातपाय धुऊन, कपडे बदलून ये बघू.”

“अरे बापरे ! आजोबांनी असं बघितलं न तर म्हणतील - राघवराव आज तुम्हाला गोष्ट नाही आणि खाऊही नाही. खाऊ वरून आठवलं, आई आज सोनपापडीवाला आला होता का गं?”

“तुला त्या सोनपापडीवाल्याचं फार वेड. अरे त्याला द्यायला जुन्या वस्तू आणायच्या कुठून सारख्या? म्हणे सोनपापडीवाला. पळ लवकर आणि स्वच्छ होऊन शुभंकरोती म्हणायला बस हे येण्याआधी.”

खरच फार वेड होतं राघूला त्या सोनपापडीवाल्याचं. तो त्याला मोठा राक्षस म्हणायचा. गावात राघूच्या मते दोन राक्षस , म्हणजे राक्षसासारखी दिसणारी माणसं होती. एक म्हणजे अब्दुल अंडेवाला , ज्याला तो उंचीनुसार छोटा राक्षस म्हणायचा, आणि दुसरा सोनपापडीवाला. सोनपापडीवाल्याचं बहुदा कुणाला नाव माहित नसावं किंवा त्याला विचारण्याची कुणाची हिंमत झाली नसावी. काळाकभिन्न, साडेसहाफुट उंच, धिप्पाड, चेहेऱ्यावर वणं, नेहमी पांढरास्वच्छ झब्बा व लेहंगा घालणार. त्याच्या खांद्यावर नेहमी एक मोठ्ठा तराजू , तराजूच्या पुढच्या तागडीत चमचमीत सोनपापडी आणि मागे एक भली मोठ्ठी काळीशार पत्र्याची ट्रंक. गावात तशी मिठाईची फारशी दुकान नसल्यान हा सोनपापडीवाला “सोनपापडी घ्या हो,सोनपापडी ..लई गोड लई खास . ”असं म्हणत निघाला कि त्याची कितीही भीती वाटत असली तरी राघुसह त्याचा प्रत्येक मित्र हमखास त्यांच्या आईवडिलांच्या मागे ती सोनपापडी घेण्याचा हट्ट करीत असे. ”राघू..”बाबांच्या हाळीने राघूची ध्यानधारणा भंग झाली आणि तो हातपाय धुवायला धूम पळाला.

दिवसामागे दिवस गेले राघू आता शाळेत जाऊ लागला होता. उन्हाळे -पावसाळे गेले. श्रावणसरी गेल्या. पानगळही आली गेली आणि अशाच एक पानगळीत राघूचे आजोबाही गेले. कळण्याच त्याचं वय नव्हतं. फक्त आता आजोबांच्या गोष्टी नाहीत हे त्याच्या मनाच्या कुठल्यातरी कप्प्यात दडून बसल होतं.

अशीच एक सुटीची दुपार बाबांची वामकुक्षी चालली होती आणि नेमका त्याचं वेळी एक कुडमुडा ज्योतिषी दारी आला. बाबा आजोबांच्या बंगईवर लवंडले होते आणि तिच्या कड्यांचा कर्र कर्र असा आवाज चौसोपीत येत होता. ”भगवान तेरा भला करे बच्चा,घरमे कोई बडा है?जा जाके बता बोल के इलाहाबाद्से बडे जोशी तेरे घर आये है. हम भूत ,वर्तमान और भविष्य सब देखते है. राधे कृष्ण !! “ आवाज ऐकून बाबाच बाहेर आले. “कोण आहे बाबा? काय काम आहे? ज्योतिषाने परत सगळी कथा बाबांना ऐकवली. राघूच्या बाबांचा विश्वास नव्हता

असल्या गोष्टींवर त्यामुळे त्यांनी त्याला नम्रपणे जायला सांगितले. एवढ्यात आई बाहेर आली. "अहो इतक्या दुपारी आला आहे बिचारा कुठून काशिबिशीकडून. निदान गुळ-पाण्याला तरी विचारा त्याला. मिनिटभर ऐकून घ्या काय सांगतो ते."

"माई तू सती - सावित्री है भगवान से लंबी उमर लिखवाके लाई है तेरे पतीकी. बेट तू बडा भाग्यवान है. तेरा बच्चा इस घर के भाग्य खोलेगा. पढलिखकर बडा अफसर होगा ये. खुद देश विदेश कि सैर करेगा और तुम्हेभी करवायेगा. गाडीमे घुमायेगा और पोते पोतीओके साथ चैनसे तुम बुढापा बिताओगे. अभी पच्चीस तीस साल उमर है तुम्हारी. ये जोशी अंकुरनाथ कि भविष्य वाणी है , न कभी खाली गई है न कभी जाएगी. राधे कृष्ण ! " आईने दिलेला गुळपाणी पिऊन आणि बाबांकडून सव्वा रुपया दक्षिणा घेऊन तो गेला.

राघू शाळेत गेला तरी त्याच्या डोक्यातून तो ज्योतिषी कित्येक दिवस जात नव्हता. आपण ऑफिसर झालोय , गाडी घेतलीय आणि देशविदेशात फिरतोय अशी स्वप्नं त्याला कित्येक दिवस पडत होती. परीक्षा जवळ आल्या होत्या. झटकून अभ्यासाला लागायला हवं होतं. ऑफिसर व्हायचं होतं ना राघुला आता. म्हणता म्हणता तो SSC ही झाला. राघू चांगल्या टक्क्यांनी पास झाला होता. ऐपत नसली तरी राघुला कॉलेजात शिकायला पुण्याला पाठवायचं बाबांचं घाटत होतं. पैशाचा कसाबसा बंदोबस्त झाला आणि राघुचं बिऱ्हाड स.प महाविद्यालयाच्या होस्टेलमध्ये हाललं. बाबा सोडून गेल्यावर काही दिवस राघुला खूप सुनं सुनं वाटत होतं. हळ हळू नवे मित्र जमले. अभ्यासाबरोबर धमालही सुरु झाली. अशाच एका संध्याकाळी राघू रूमवर परतला तोच शिपाई रेक्टरांचा निरोप घेऊन आला. कुलकर्णी सरांनी दिलेली तार राघूने थरथरत्या हातांनी उघडली. 'Father not feeling well. Start immediately.' मिळेल त्या गाडीन राघूने गावाकडे धाव घेतली.

राघू घरी पोहोचला तोपर्यंत दिवेलागणी झाली होती. अंधार घराइतकाच घराबाहेरही होता. सर्वत्र एक बोचरी शांतता पसरली होती. "आई काय झालं ग बाबांना?" "काय सांगू बाबा ,गेले ४ महिने अंथरुणाला खिळून आहेत. एक नाही अनेक डॉक्टर झाले , गंडा-तावीजही करून झाला. प्रकृतीला आराम नाही." "पण मला कळवायच नाहीस इतके दिवस?" " अरे हेच म्हणाले कि परीक्षा असते , अभ्यास असतो. नको बोलावूस त्याला. मी बरा होईन लवकरच मग भेटायला जाऊ पुण्याला तेव्हा सांगू. शेवटी आता डॉक्टरांनीच हात टेकले तेव्हा मीच सांगितल शेजारच्या भटांना तार करा म्हणून." बाबांचे हातपाय चारच महिन्यात खूप क्षीण झाले होते. राघुनं बाबांना असं कधी बघितलचं नव्हत. त्यांच्या डोक्यावरून हात फिरवतांना राघुला कसंनुसं झालं. बाबांच्या डोळ्यात राघुला बघून थोडी चमक आल्यासारखं वाटलं आणि त्यांनी काहीतरी बोलण्याचाही प्रयत्न केला. ते जे काय बोलत होते ते जरी कळत नव्हत तरी त्यातून काहीतरी अर्थ नक्कीच निघत असावा. ती रात्र राघू आणि आईने बहुतांश जागूनच काढली .

रात्रीचा अंधार सकाळच्या उजेडात कुठेच पळून गेला होता. सूर्यकिरणांनी आकाशातलं उरलं सुरलेलं मळभही पळवून लावल होत. राघू बाबांजवळ जाऊन जुन्या आठवणींच्या गोष्टी करत होतं आणि अचानक त्याला आठवला तो अलाहाबादि कुडमुडा ज्योतिषी.

"बाबा, आठवतंय तो ज्योतिषी काय म्हणाला होता ते? म्हणे अंकुरनाथ कि भविष्यवाणी है. तुम्ही २५ ३० वर्ष अजून जगणार , जगभर माझ्यासोबत फिरणार , सुन-नातवंड बघणार. आठवतंय ?" बाबांचे डोळे

लुकलुकले त्यांनी पुन्हा बोलण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्यांच्या बोलण्याचा थोडा अर्थही लागत होता. दुपारपर्यंत तर ते जादू झाल्यासारखे बोलू लागले होते. आईच्या चेहेरयावर राघूने पहिल्यांदाच आनंदी भाव बघितले. संध्याकाळी बाबांची मजल लापशी पिण्यापर्यंत गेली होती. त्या रात्री राघू आणि आईला शांत झोप लागली. पुढचे तीन दिवसही बाबांच्या प्रकृतीला थोडा आराम होता. त्यांनी राघुशी खूप गप्पाही मारल्यात. डॉक्टर येऊन औषध देऊन जात होते.

" आई तो सोनपापडीवाला येत नाही का ग आजकाल ?" राघुला कुणास ठाऊक पण तो सोनपापडीवाला आठवला कित्येक वर्षानंतर. त्या रात्री त्याच्या स्वप्नात सोनपापडीवालाच आला. तोच चेहेरा , तेच कपडे, तीच ढब आणि तोच तराजू. फक्त फरक होता तो पुढल्या थाळीत. त्यात होती ती चमचमणारी स्वप्न. कुणाचं शिक्षण , कुणाची गाडी , कुणाची मुलंबाळं तर कुणाची नोकरी. अचानक कुठूनसे राघुला बाबा दिसले. त्या सोनपापडीवाल्याच्या मागे धावणारे बाबा. ते वेड्यासारखे त्याच्या मागे धावत होते. स्वप्न घ्या हो स्वप्न. चमचमणारी स्वप्न ... लई गोड.... लई खास असं म्हणणारा तो सोनपापडीवाला आणि त्याच्या मागे " अरे माझ्या राघूची स्वप्न दे रे. त्याचं शिक्षण , त्याची नोकरी दे रे. त्याचं घरदार ,गाडी ,बायको मुल , मला सगळ बघायचं आहे. ती स्वप्न दे रे मला .... ती स्वप्न दे." अचानक तो सोनपापडीवाला थांबला त्याने थंडगार नजरेने बाबांकडे बघितल , थाळीतली मुठभर स्वप्न बाबांच्या हातात कोंबली. मागच्या काळ्याशार ट्रंकेचं झाकण उघडलं आणि काही कळण्याच्या आत त्याच्या मजबूत हातानी त्यानी बाबांना त्या ट्रंकेत लोटलं. ट्रंकेवर पुन्हा भला मोठ्ठा दगड ठेऊन तो जणूकाही झालाच नाही अशा अविर्भावात " स्वप्न घ्या हो स्वप्न ..... चमचमणारी स्वप्न." म्हणत दिसेनासा झाला. आईच्या रडण्याने राघुला जग आली. बाबा रात्रीतच कधीतरी गेले होते.

नातेवाईकांची गर्दी झाली. अंत्यसंस्कार पार पडले. आईच्या अश्रूंना तर खळ नव्हता. राघू पार सुन्न झाला होतं. काय होतंय ,काय कराव त्याला काही कळत नव्हतं. बाराव्या तेराव्याचे विधी झाल्यावर नातेवाईकही पांगले. घरात उरले ते फक्त आई आणि राघू. अशावेळी राघुला आठवला तो ज्योतिषी .

"खोटारडे, पोटभरू कुठले. पैश्याकरता काय वाट्टेल ते खोटं बोलतील. म्हणे पाच्चीसतीस साल जिएंगे. याव करतील आणि त्याव. सगळं खोटं. अरे पैसाच उकळायचा तर उकळा पण लोकांच्या भावनांशी का खेळता? काय अधिकार आहे तुम्हाला असं फसवण्याचा? मला तो खोटारडा पुन्हा कुठे भेटू दे, चागलाच धडा शिकवतो त्याला." राघू संतापाने नुसता धुमसत होता. त्याच्या तोंडून ज्योतीष्याकरता शिव्याची लाखोली सुरु होती.

आई राघूच्या जवळ आली , त्याला मायेने जवळ घेतलं. डोक्यावरून हात फिरवत म्हणाली " राघू , का बोल लावतोस रे बिचाऱ्याला ? अरे धंदा आहे तो त्याचा. काही दोष नाही रे बाबा कुणाचा... काही दोष नाही. प्रत्येकजण आपलं आयुष्य जन्मताच लिहून घेऊन येतो ईश्वराकडून. तू किंवा मी ते किती आहे हे सांगू शकत नाही रे. सांगू शकतो ते फक्त ते आयुष्य आपण कसं जगलो ते. अरे आपण खरतर त्या ज्योतिषाचे आभारच मानायला हवे. मी तुझ्या बाबांना चार महिने प्रत्येक दिवस मरताना बघितलं आहे. ते जगले ते फक्त शेवटचे चार दिवस. तू त्या भविष्याची आठवण करून दिल्यावर त्यांना जगण्याची एक नवीन उमेद मिळाली होती. जगण्याची आशा पुन्हा एकदा त्यांच्या डोळ्यात परतली होती. तेवढेच चार दिवस जगले रे ,तेवढेच चार दिवस. त्याला दोष देऊ नकोस

बाळ ..... कुणाचाही दोष नाही .....” राघुला जाणवलं कि आई खूप मोठी आहे , आभाळाहूनही मोठी . बाबा गेल्यावर प्रथमच तो आईच्या कुशीत शिरून रडू लागला. खूप वेळ रडतच होता .....

कथा व मूळसंकल्पना - राघवेन्द्र गायकैवारी

पुनःशब्दांकन - योगेश कुलकर्णी

(१९८६ सालची गोष्ट असेल . मी आबासाहेब गरवारे कॉलेजला ११ वीत होतो आणि कॉलेजला कथाकथन स्पर्धा होती. मी त्यात नाव दिल पण कथा कुठली मनात भरत नव्हती. प्रथितयश लेखकांच्या लोकांनी शंभरवेळा ऐकलेल्या कथा सांगण्यात मला रुची नव्हती. यावेळी मला भेटला बी.ए. फायनलला असलेला राघवेन्द्र. त्यानी त्या रात्री होस्टेलचा गच्चीत मला एकट्याला ऐकवलेली ही मुळ कथा मी दुसऱ्या दिवशी शेकडो विद्यार्थ्यांसमोर स्पर्धेत सादर केली व तिला द्वितीय पारितोषिक मिळाले. मार्क गेले ते फक्त कथा प्रथितयश लेखकाची नसल्याने. आज राघवेंद्र माझ्या संपर्कात नाही पण ही कथा मनात घर करून आहे म्हणून पुनःसादरीकरणाचा हा छोटासा प्रामाणिक प्रयत्न.)

****

अर्थ

राजेंद्र कुलकर्णी

नाही कुठे सापडला, सारे जीवन चालले व्यर्थ
उभे जीवन लावले शोधण्यात जीवनाचा अर्थ

जीवन असेपर्यंत सापडत नसतो तो अर्थ
त्याच्या पश्चात सांगता येत नाही तो अर्थ

कोड्यांच्या उत्तरा सारखा
पटकन सुचत नसतो तो अर्थ

खजिन्याच्या पेटाऱ्यात उचकल्यासारखा
शोधून सापडत नसतो तो अर्थ

आपले अतीत, आपले सगेसोयरे
नातेसंबंधातून जोडला जातो तो अर्थ

स्वतःच्या भावना, आपलेच आचार विचार
स्वानुभवातून प्रकट होतो तो अर्थ

पिढीजात संस्कार, वडीलधाऱ्यांची शिकवणूक
आकलनातून हृधयात भिनतो तो अर्थ

स्वतःबरोबर बाळगलेली तत्वे, विश्वासलेली मुल्ये
जपलेल्या श्रद्धा जो साकारतात तो अर्थ

आपल्यावर प्रेम करणारी माणसे, मिळालेला स्नेह
अनुभवलेली माणुसकी जो स्पर्श करते तो अर्थ

भोगलेले चढ उतार, स्वकष्टातून मिळवलेला आशावाद
त्यातून जाणलेले मोल जो दाखवतो तो अर्थ

जोपासलेली विनम्रता, समाजाचे मानलेले ऋण
कोणासाठी तरी केलेला त्याग जे प्रगटतो तो अर्थ

काय आले गेले, कोणी किती दिले घेतले
तुलनपत्र जुळवण्याची गरज भासत नाही
तेंव्हा मनाला जो आनंद देतो तो अर्थ

कोणाला दाखवता येत नाही, समजवताही येत नाही
आपणच आपल्या आयुष्याचा ठरवतो तो अर्थ

जिनी

विनता कुलकर्णी

दीपावलीच्या झगमगाटात,

तेजाळून गेली शीतहवा

अवचित आला माझ्या मनांत,

अल्लाउद्दीनचाजादूचा दिवा ||

भोवतालच्या दिव्यांना मनोमनी,

केला कुतूहलाने स्पर्श

आहे कसा दिव्यांतला जिनी,

घेऊ लागले मीपरामर्श

प्रगटलेदेखावे रंगबिरंगी,

विविध आविष्कार दिव्यांचे

मागे सावल्या बहुढंगी,

अगाध चमत्कार जिनीचे ||

आयुष्य स्वत:चे खुशाल जाळून,

उजळीत होते वाटकुणी

कुणाच्या सरणावर मशालपेटवून ,

मिरवत होते ऐट कुणी

रेड लाईटची दिवटी वदली,

दाम करी काम अमुची रीती

कोसळणारी घन-वीजगर्जली,

दुष्ट संहारण्या दंड-भेद-नीती ||

काळवंडला होता तोतयासूर्य,

आपल्याच कर्माच्या ग्रहणानं

चेतवीत होता तारकांनाचंद्र,

सात्विक प्रेमाच्या चांदण्यानं

नवी वाट शोधतहोता,

स्वतंत्रपणे एक काजवा

काळाकुट्ट मलीन रस्ता,

छेदत होता किरण नवा

उधळलेल्या पिसाट वणव्यात,

वायूमंडळ होते प्रक्षुब्ध

तेवणा-या निरांजनाच्या पुढ्यांत,

मनोवादळही झाले स्तब्ध

सांज वेळी प्रसन्न समई ,

छेडत होती दीपरागाच्या कळा

दिव्य जिनी तो भिडला हृदयी,

हवा कशास मग झगमग सोहोळा

(टीप: विनता कुलकर्णी लिखित हया कवितेचे पूर्व प्रकाशन: बृहन्महाराष्ट्र वृत्त, नोव्हे २००९)

स्वप्नातलं एक गाव –चिखलदरा त्याचं नाव

मधुरिका गडकरी

महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील नंदनवन म्हणजे, थंड हवेचं ठिकाण चिखलदरा! अमरावती जिल्हयातील हे ठिकाण पश्चिम महाराष्ट्रातील महाबळेश्वर व माथेरान इतकचं प्रेक्षणीय, आणि दर्शनीय पर्यटन स्थळ आहे. नितांत रमणीय निसर्ग सौदर्यासह निकटच्या गाविलगड, व नरसाळा, या प्राचीन किल्यांमुळे एक महत्वाचं ऐतिहासिक ठिकाण म्हणूनही ते प्रसिद्ध आहे. तर, महाभारत काळातील पराक्रमी पांडवाच्या वास्तव्याने त्याला पौराणिक संदर्भही लाभले आहेत.

चिखलदरा ठिकाण आठवताच, तिथली गर्द हिरवी वनराई, व नागमोडी वळणाच्या लालसर पायवाटांवरन केलेल्या भटकंतीचे ते क्षण पुन्हा–पुन्हा साद घालु लागतात. मेळघाटच्या जंगला जवळ सातपुडा पर्वताच्या पठारावर वसलेलं हे छोटसं–सुबक गाव आहे. इथल्या निसर्गाचं लोभसवाणं रूपडं मनाला मोहवुन टाकतं. जगण्याच्या निवांत क्षणी शहरापासून, गर्दीपासून, सिमेंटच्या जंगलापासून दूर असलेलं, दैनंदिन जीवनातील सुख–आनंदाच्या चार घटकांच्या कायम आठवणीचं हे जणू स्वप्नातलं गाव आहे.

चिखलदरा व निसर्ग सौंदर्य यांचे अतूट नाते आहे. इथलं दाट हिरवकंच जंगल, आभाळाशी स्पर्धा करणारी उंच–उंच सळसळीत झाडं, निळेशार डोंगर, मनाला वेडावून टाकणाऱ्या रानफुलांनी नटलेल्या दऱ्याखोऱ्यांची अपूर्वता आणि, मान वेळावीत जाणाऱ्या इथल्या नखरेलं पायवाटा! पाचूंच्या या रानात भटकंती करणाचा मुक्त आनंद, इथल्या ओलसर मातीचा मनाला सैरभैर करून टाकणारा धुंद गंध, इथले मुक्त पक्षी जीवन, वन्य प्राणी जीवन, हे सारे सौदर्य शब्दात कसे मावणार ? पृथ्वीच्या सौंदर्याचे हे सारे नजराणे क्षणोक्षणी रूप पालटून उभे असतात. इथल्या झाडाफूलावेलींशी झालेली सलगी आणि मैत्री मनाला कशी घट्ट बिलगून राहते.

महाभारताच्या काळातील प्रत्यक्ष पांडवांसह द्रौपदीच्या वास्तव्यानं पवित्र झालेल्या पौराणिक आरण्यायिका व स्थल दर्शनामुळे त्याही दृष्टीने हे एक महत्वाचं ठिकाण आहे.

पुरातन वैभवाचे अवशेष अंगाखांद्यावर जपणारे इथले प्राचीन किल्ले, खोल पाण्याचे निळसर जलाशय, हे सगळचं दर्शनीय आहे. शिवाय, या भागात झालेलं वनीकरण व लगतचे अभयारण्य भारतातील सर्वात मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. महाभारत काळात अज्ञातवासात असतांना पांडव ह्याच भागात वास्तव्याला होते. या ठिकाणीच महापराक्रमी भीमाने किचकाचा वध केला. त्यावरून ओळखली जाणारी भीम कुंड, किचकदरा व पांडवांच्या नावाने ओळखली जाणारी स्थळे येथे आहेत. शिवाय, या गावाच्या आवतीभवतीही अनेक सुंदर स्पॉटस् आहेत. समुद्रसपाटीपासून 3664 फुट उंचीवर असलेलं चिखलदरा व मेळघाटचं आरण्य बघणं हा पर्यटकांचा खास आनंद–उत्सुकतेचा विषय आहे. वैराट हा येथील प्रमुख पॉईंट असून, मेळघाटमधील सर्वांत ऊँच (3884 फुट) म्हणून ख्यातनाम आहे. महाभारत काळातील वैराट राजाची नगरी असलेल्या या ठिकाणाहून सुर्यास्ताचा नजराणा नजरेत साठवून घेणं हा अनोखा अनुभव आहे. इथल्या निसर्गाच्या कुशीतील पंचबोल पॉईंटच्या दरीतनं कधी वाघाची डरकाळी ऐकू येते. तर कधी बिबट्यांचे दर्शन होते. तर कधी नामशेष झालेल्या पांढऱ्या छातीची गिधाडही दिसतात. याशिवाय, येथील हरिकेन पॉईंट, दिपशिखा सैनिकी शाळा, वन विभागाचे प्रशिक्षण महाविद्यालय मंकी पॉईंट, पाच डोंगराकड्यांच्या मिलाफाचा पंचबोल पॉईंट .... जेथुन आपण हाकारलेल्या शब्दांचे प्रतिध्वनी पाचवेळा ऐकू येतात, हे सारचं अद्भुत आहे. या शिवायही शिवसागर पॉईंट, काळा पाणी तलाव, देवी पॉईंट, मोझरी पॉईंट, राजापाधी टेकडी, विविध जातीची सुरेख फुलझाडे, गोराघाट पॉईंट यासह विविधरंगी निसर्ग फुलांच्या उधळणीसह जीवनातल्या 'सत्यं–शिवम्–सुंदरम्' ची यथार्थ अनुभूती प्रदान करणारे निसर्ग सौंदर्याचे अद्भुत नजराणे तनामनावर जादुई फुंकर घालतात. या ठिकाणी जलक्रिडेचा आनंद घेण्यासाठी शंकर तलाव व सेमाडोह आहे तर, खगोलप्रेमी पर्यटकांसाठी पौर्णिमेच्या मधाळ रात्रीचं आकाश व नक्षत्र दर्शन हा जेवढा रोमांचक तेवढाच मनोहारी अनुभव आहे. आपल्या समवेतच्या रानवेड्या प्रेमिकांसह खोलगट दरीतल्या नितळ पाणवठ्यात अनिवारनेने कोसळणांर रूपेरी चांदणं, त्यावरनं सरसरत निघुन जाणारा नाचरा पक्षी, व त्या हेलकाण्यानं मनात उठलेले तरंग अनुभवायला, दूरस्थ ताऱ्यांचा वेध आपल्या दुर्बिणीतून घेतांना सारे आभाळच ओंजळीत असल्याचा आभास अनुभवायला, चिखलदऱ्यातला तरूण निसर्ग बघायला आणि 'येतो कुठुनसा वारा, जातो अंगाला वेढून अंग उरते न अंग जाते अत्तर होऊन....' ही मादक–मोहक अनुभुती घ्यायला तरी, कधीतरी प्रवासपक्षी होऊन येथे यायलाचं हवं.....

आयर्नमॅन 70.3

प्रसाद पानवलकर

२८ ऑक्टोबर २०१२ रोजी मी 'आयर्नमॅन 70.3' ('Ironman 70.3') किंवा "70.3" ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. स्पर्धा पूर्ण करायला मला ७ जास ४२ मिनिटे आणि १३ सेकंद लागले. एकूण २५२७ लोकांनी या स्पर्धेत भाग घेतला होता ह्या सर्व स्पर्धकात फक्त ४ भारतीय होते, आणि ऑस्टिनहून फक्त मी एकटाच भारतीय आणि मराठी!

अंतिमरेषा (Fihish Line) मी पार केली खरी, पण जेव्हा मी माझ्या पत्नीला, निवेदिताला, घट्ट जवळ घेतले तेव्हाच माझ्यासाठी ही स्पर्धा पूर्ण झाली. निवेदिताने माझ्यावर विश्वास दाखवून मला ह्या स्पर्धेत भाग घ्यायला मंजूरी दिली आणि प्रचंड सहकार्य केले. त्याचबरोबर आमची मुले, नील (९ वर्षे) आणि प्रिया (३ वर्षे), नातेवाईक मंडळी व अक्षरश: शेकडो मित्रमंडळींनी दिलेले प्रोत्साहन आणि शुभेच्छांमुळेच मी ही स्पर्धा पूर्ण करू शकलो. ह्या सर्वांचा मी आभारी आणि ऋणी आहे.

सर्वप्रथम ह्या स्पर्धेचे स्वरूप लक्षात घेऊ या. या स्पर्धेत, स्पर्धकाला ७०.३ मैल एवढे अंतर पूर्ण करायचे असते. ही स्पर्धा हा ट्रायथलॉन (Triathlon) चा प्रकार असल्याने यात ३ वेगवेगळे खेळाचे प्रकार आहेत: पोहणे (१.२ मैल), सायकलिंग (५६ मैल) आणि धावणे (१३.१ मैल किंवा 'हाफ-मॅरेथॉन') = एकूण ७०.३ मैल!!! (मेट्रिक प्रमाणात: पोहणे (जवळजवळ २ कि.मी), सायकलिंग (जवळ जवळ ९० कि.मी) आणि धावणे (जवळ जवळ २१ कि.मी) = एकूण जवळ जवळ ११३ कि.मी). या सर्व गोष्टी एकापाठोपाठ एक करून कमीत कमी वेळात सगळे अंतर पूर्ण करायचे.

थोडक्यात 'आयर्नमॅन' ही कणखरपणा सिद्ध करण्याची परिक्षा (Endurance Test) आहे आणि हा कणखरपणा फक्त शारीरिक (Physical) नसून,मानसिक (Psychological) पण आहे हे विसरून चालणार नाही.

गेल्या वर्षी, एप्रिल महिन्यात (२०११), निवेदिताच्या आग्रहावरून मी Nitro Swimming Club मध्ये फ्रि-स्टाईल पोहायला शिकलो. आम्हा दोघांनाही अंदाजे दुसरीत असल्यापासून पोहता येत होते. मात्र ते म्हणजे भारतात सर्वसाधारण पणे पोहतात तसे - डोके पाण्यावर ठेवून मान इकडे तिकडे हलवत पोहतात तसे. जर खूप अंतर पोहून जायचे असेल तर ही पद्धत फारशी उपयोगी नाही. आम्हाला दोघांनाही पोहता येत असल्याने फ्रि-स्टाईल चे तंत्र अवगत करायला फार वेळ लागला नाही.

ऑगस्ट महिन्यात 'अँडरसन मिल मिनी ट्रायथलॉन' (Anderson Mill Mini Triathlon) ची जाहिरात पाहिली. स्पर्धा १७ सप्टेंबरला होती. ३०० मीटर पोहणे+ १ मैल सायकलिंग + १ मैल धावणे असे ह्या स्पर्धेचे स्वरूप. आम्ही नील ला (तेव्हा ८ वर्षे) या स्पर्धेत भाग घ्यायला सांगितले. नीलला सोबत म्हणून मी ही त्याच्याबरोबर ह्या 'मिनी ट्रायथलॉन' मध्ये सहभागी होण्याचे ठरविले. स्पर्धा झाल्यावर त्या दिवशी घरी आल्यावर ट्रायथलॉन स्पर्धेविषयी जास्त माहिती मिळवली.

ट्रायथलॉन'चे मुख्यत्वे २ प्रकार असतात:

१. स्प्रिंट ट्रायथलॉन (Sprint Triathlon): ७५० मी. पोहणे + २०कि.मी सायकलिंग + ५ कि.मी धावणे

२. ऑलिंपिक ट्रायथलॉन (Olympic Triathlon): १५०० मी. पोहणे+४०कि.मी सायकलिंग+१० कि.मी धावणे

'Capital of Texas Triathlon' ही ऑस्टिनची सर्वात प्रसिद्ध ट्रायथलॉन. पुढे २८ मे, २०१२ रोजी मी या स्पर्धेत भाग घेवून 'ऑलिंपिक ट्रायथलॉन' ३ तास ५६ मि. ४५ सेकंदात पूर्ण केली. ऑलिंपिक ट्रायथलॉन झाल्यावर मात्र वेध लागले ते 'आयर्नमॅन 70.3' चे. त्या साठी मी YMCA मध्ये केसी (Casey) कडून ट्रेनिंग घ्यायचे ठरविले. आम्ही केसीला भेटून आलो आणि तिचा सल्ला घेतला. १ जुलै पासून केसी कडे माझे ट्रेनिंग सुरु झाले. आमचा

१०-१२ लोकांचा ग्रुप होता. आठवड्यातून एकदा सकाळी सहा वाजता जमून दीड तास पळायचे. मग दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ७ ते ८.३० स्थिर सायकल (Spin Bike) चालवायची व पुढच्या दिवशी रात्री ८ ते ९ वाजता पोहायचे -असे हे प्रशिक्षण. हे सगळे कमी की काय म्हणून केसी होमवर्क द्यायची (उदा. शनिवारी ३० -४० मैल सायकलिंग करून या किंवा ८-१० मैल धावून या, वगैरे). तिने सुरुवातीलाच सांगितले होते की, ज्या गोष्टी तुम्ही स्वत:हून करणार नाही, त्या ती आमच्याकडून करून घेणार आहे म्हणून. केसीच्या ह्या प्रशिक्षणाचा एक फायदा असा झाला की मला आता - 'काय खायचे, किती खायचे, कधी खायचे' याचे मार्गदर्शन होते. मी पूर्ण शाकाहारी असल्याने अनेक बंधने होती. त्यामुळे निवेदिताचे काम वाढले. दररोज ताजा स्वयंपाक वेळेत खाणे आवश्यक होते. माझ्या अपेक्षा नव्हत्या, पण निवेदिता हुरुप घेऊन दररोज पोळ्या-भाज्या वगैरे करत होती. दूध-फळे-सुकामेवा वगैरेचा खुराक चालू होताच. म्हणता म्हणता माझा व्यायाम वाढू लागला. सकाळी एक तर कधीतरी दीड तास धावणे/सायकलिंग तर आठवड्यातून ३-४ वेळा संध्याकाळी ४० मिनिटे पोहणे हे अंगवळणी पडले. शनिवारी मोठा टप्पा गाठायच्या दृष्टीने व्यायाम, तर रविवारी विश्रांती असे हे वेळापत्रक.

३ महिने भरपूर सराव केल्यानंतर १३ ऑक्टोबर २०१२, ला मी 'आयर्नमॅन 70.3' चे १०० टक्के अंतर पूर्ण केले - ते करताना मला पावणे आठ तास लागले आणि मोठा अनुभव मिळाला. माझी ही रंगीत तालीम झाल्यावर बऱ्याच जणांनी मला प्रश्न विचारला की मी त्या सहा-आठ तासात कसला विचार करतो? त्याचे उत्तर द्यायचे झाले तर पूर्णवेळ मी सकारात्मक विचार करतो. त्यासाठी आवडीच्या गोष्टींचा/छंदांचा विचार करणे, आवडीची स्फूर्ती गीते /गाणी गुणगुणणे (उल्लेख करण्या जोगे गाणे म्हणजे 'चक दे इंडिया' मधील 'कुछ करिये- कुछ करिये'),आवडीच्या चित्रपटातील दृष्येआठवणे, आणि हे सगळे कमी पडले तर चक्क दिवसाढवळ्या उघड्या डोळ्यांनी स्वप्ने बघणे (उदा. मला खेळाची आवड आहे म्हणून, माझी स्वप्ने म्हणजे मी सचिन तेंडूलकर बरोबर वानखेडेवर क्रिकेट, तर रॉजर फेडरर बरोबर विम्बल्डन,किंवा टायगर वुडस बरोबर मास्टर्स खेळतोय वगैरे..) थोडक्यात कधीही 'मी दमलोय' असे चुकुनही वाटले नाही पाहिजे. 'आयर्नमॅन' हा शारीरिक तसेच मानसिक कणखरपणाचा सिद्ध करण्याचा खेळ आहे. कदाचित मानसिक कणखरपणा शारीरिक कणखरपणापेक्षा जास्त असावा लागतो आणि हा मानसिक कणखरपणा केवळ होकारार्थी प्रवृत्ती ठेवूनच येतो. जसे कोणतेही मोठे काम करताना आपण माईलस्टोन किंवा टप्पे ठरवितो आणि एका वेळी एक या प्रमाणे ते टप्पे गाठण्याचा प्रयत्न करतो, तसेच टप्पे ट्रायथलॉनच्या तयारीसाठी लिहून ठेवावेत.एकदा तो टप्पा गाठला की पुढचा टप्पा आणि त्यामुळे आपण सुरवातीला अशक्य वाटणारे काम पूर्ण करून शकतो. '70.3' असो किंवा'स्प्रिंट ट्रायथलॉन', आपल्याला झेपतील असे टप्पे ठरवायचे आणि एक एक पूर्ण करत जायचे. त्यामुळे स्पर्धेच्या दिवशी मनाला एकच गोष्ट सांगायचीः हे आधी मी केले आहे आणि आता मला हे सहज शक्य आहे.

पुढे २ आठवड्यांनी, शुक्रवार संध्याकाळ पासून नातेवाईक व मित्रमंडळींचे शुभेच्छांसाठी फोन येत होते. माझ्यावर मानसिक दबाव हळूहळू वाढू लागला. शनिवारी स्पर्धेच्या ठिकाणी रजिस्ट्रेशन (नोंदणी) करण्याकरिता घरातून निघताना मला धडाधडा रडू कोसळले. हे असे काय होतय ते मला कळत नव्हते. निवेदिता समोरच होती, तिने मला घट्ट जवळ घेतले. प्रचंड मानसिक ताणामुळे हे असे झाले होते. हे दडपण अपयश येण्याच्या भीतीचे होते --अनेक मित्र-मंडळीआणि नातेवाईक यांच्या अपेक्षा मला पूर्ण करायच्या होत्या. सकाळी साडे दहा वाजता स्पर्धेच्या ठिकाणी पोहचलो. भरपूर गर्दी होती. स्पर्धेत एकूण २५०० खेळाडूंनी भाग घेतला होता. या सर्वांना संध्याकाळी ५ वाजेपर्यंत नोंदणी करून सायकल स्पर्धेच्या ठिकाणी जमा करणे बंधनकारक होते. प्रयेक खेळाडू बरोबर १-२ कुटुंबिय किंवा मित्रमंडळी होती.

भीती आणि उत्साहाचे ते वातावरण होते. नोंदणी कार्यालयात गेलो. तिथे प्रचंड गर्दी होती. इथे मला माझा नंबर, टी-शर्ट, टायमिंग चिप आणि स्विमिंग कॅप मिळाली.

रविवार २८ ऑक्टोबर, २०१२ - शेवटी स्पर्धेचा दिवस उजाडला. मी पहाटे चारला उठलो. पहाटे सव्वा पाच वाजता मी निवेदिताला उठवले. आमचे आवरून झाल्यावर पहाटे ५.४० वाजता प्रियाला गाडीत ठेवून आम्ही पावणेसहाला अंधारात घर सोडले. नील मित्राकडे झोपायला गेला असल्याने आमच्या बरोबर नव्हता. घरातून निघतांना निवेदिताने हातावर दही टेकवले. गाडी हायवेवर लागली आणि मन भूतकाळात गेले. गेले कित्येक दिवस घेतलेले कष्ट, घरातल्या मंडळींनी माझ्यासाठी केलेला त्याग,त्यांच्या, मित्रमंडळी व नातेवाईकांच्या शुभेच्छा आता कामी येणार होत्या.

अंदाजे सकाळी ६.१० वाजता आम्ही स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचलो. पार्किंग लॉटमध्ये प्रचंड गर्दी होती.गाडी बाहेर उतरलो तेव्हा भयानक थंडी होती. जवळजवळ सर्व खेळाडूंनी वेटसूट घातला होता.या ठिकाणाहून दीड मैल दूर असलेल्या जलाशयाकडे - डेकर लेक (Decker Lake) - जाण्यासाठी संयोजकांनी चार्टर बसची सोय केली होती. बसमध्ये बसण्यासाठी खूपच लांब रांग होती. सर्व काही शिस्तीने चालू होते.थोड्या वेळाने आमचा नंबर आला आणि आम्ही जलाशयाकडे मार्गस्थ झालो. प्रिया एवढ्या थंडीत निवेदिताच्या खांद्यावर झोपली होती. सकाळी ७.१० वाजता सायकली ठेवलेला भाग स्पर्धकांना बंद करण्यात आला आणि सर्व स्पर्धकांना पाण्याकडे जाण्यास सांगण्यात आाले. बऱ्यापैकी उतरण उतरून आम्ही पाण्याजवळ पोहोचलो. सव्वा सात वाजले होते. पण बऱ्यापैकी अंधार होता. थंडी तर विचारूच नका. अजून १५ मिनिटांनी व्यावसायिक खेळाडू (Professional Athletes) स्पर्धा सूरू करणार होते. लाऊड स्पीकरवरून अनेक सूचनांचा भडिमार होता होता. ७ वाजून २५ मिनिटांनी एका शाळेतील मुलीने राष्ट्रगीत गायले आणि स्पर्धा सुरु झाली असे जाहीर करण्यात आले. बरोबर वेळेत म्हणजे ७.३० वा. व्यावसायिक पुरुषांनी पोहायला सुरुवात केली आणि ५ मिनिटांनी व्यावसायिक स्त्रिया पाण्यात पोहू लागल्या. त्या नंतर दर ५ मिनिटांनी ५ वर्षे फरक असलेला वयोगट (उदा. २५-२९, ३०-३४, ३५-३९, ४०-४४) पुरुष-स्त्रिया-पुरुष-स्त्रिया या गटवारीने पाण्यात उतरू लागले. अंदाजे १५० जण माझ्या गटात होते. माझी पोहणे सुरु होण्याची वेळ सकाळी ८ वा. ०५ मि. अशी होती. पण १० मिनिटे आधीच गटाने उभे रहायचे होते. त्यामुळे योग्य वेळ आल्यावर मी माझे जॅकेट, टी-शर्ट, जीन्स उतरवली आणि निवेदिताला दिली.आता अंगावर फक्त पोहण्याची चड्डी. मरणाच्या थंडीत फक्त १० मिनिटे काढायची होती.अंगातील गर्मी वाढविण्यासाठी मी जागेवरच उड्या मारत होतो. पाण्यात उतरण्याआधी निवेदिताला टाळी देऊन निरोप घेतला आणि सकाळी ८ वा. ०२ मिनिटांनी पाण्यात उतरलो.पाणी तुलनेने कमी गार होते त्यामुळे बरे वाटले. सूर्य काही मिनिटांपूर्वीच उगवला होता. लाऊडस्पीकरवर आमच्या गटाची माहिती देणे चालू होते. ८ वा. ४ मि. ५५ सेकंद. निवेदन करणाऱ्या माणसाने काऊंडडाऊन सुरु केले तसे खेळाडू आणि त्यांच्या काठावरच्या समर्थकांनी त्याच्या आवाजात आवाज मिळवला.. . . 5 - 4 - 3 - 2 - 1 ...

'वेडात दौडले वीर मराठे सात' या उक्तीप्रमाणे मी ही देवाचे नाव घेऊन स्वत:ला पाण्यात पुढे झोकून दिले. १.२ मैल (जवळजवळ २ किमी. अंतर पोहायचे होते). आमच्या गटातील जोरात पोहणारे खेळाडू म्हणता म्हणता पुढे निघून गेले. मी आणि इतर काही स्पर्धकांनीही हळूहळू पाणी कापायला सुरुवात केली. मी आता पोहत पुढे निघालो. एव्हाना मी खुणेचे बरेच पांढरे फुगे मागे टाकले होते. थोड्या वेळाने दूरवर अंतिम रेषेची कमान दिसू लागली.अंतरखूप होते पण आता लवकरात लवकर तिथे जायचे होते. एव्हाना शरीर गरम (warmed up) झाल्याने पोहायचा वेगही बऱ्यापैकी वाढला होता.

शेवटी एकदाचा अंतिम रेषेजवळ पोहोचलो आणि काठ जवळ आल्यावर पाण्यातून धावत धावत कमानी खालून आलो. बाहेर अजूनही खूप थंडी होती (४०^{0}F किंवा ४.५^0 C). निवेदिता प्रियाला घेऊन माझी वाट बघत होती. मला हे अंतर कापायला सव्वा तास लागला. निवेदिता खुष होऊन 'गुड जॉब प्रसाद - गुड जॉब'ओरडून मला प्रोत्साहन देत होती. मी तिला टाळी देऊन धावत धावत माझ्या सायकल ठेवण्याच्या जागेकडे गेलो. निवेदिता पण प्रियाला घेऊन कुंपणाच्या बाजूने सावकाश चालत आली. सायकल जवळ आल्यावर मी पटापट टॉवेलने अंग पुसले.बनियान/टी-शर्ट चढवला. पायात बूट घालून सगळ्यात शेवटी हात मोजे चढवले आणि निवेदिता 'बाय-बाय' म्हणून सायकल उचलून सायकलिंगच्या सुरवातीच्या रेषेकडे निघालो.

परत एकदा देवाचे नाव घेऊन माझी ५६ मैलाची (जवळजवळ ९० कि.मी.) सायकल यात्रा सुरु झाली. एव्हाना सकाळचे पावणे दहा वाजले होते. मस्त उन पडले होते. तरीपण हवेत कमालीचा गारवा होता. एका तासाने मी १५ मैलाच्या पाटीजवळ होतो. मला माझा वेग कळला. सरावाच्या काळात माझा वेग ताशी १४ मैल असे, आज वेग जरासा जास्त होता. दर १२ मैलाला पाणी/गेटोरेड व खाण्याचा स्टॉल होता.फिरती स्वच्छतागृहेपण होती. मी पहिल्या स्टॉलवर काहीही घेतले नाही. माझ्याकडची पाण्याची व गेटोरेडची बाटली फक्त निम्मिच संपली होती. एक तास झाल्यावर मागे टी-शर्टच्या खिशात हात घालून एनर्जी जेल काढले व खाल्ले. या नंतर प्रत्येक अर्ध्यातासाला एक,या हिशोबाने उरलेली जेल संपवली. हा सगळा सराव मी गेले काही आठवडे केला होता.त्यामुळे यात नवीन काही नव्हते. पुढे २४ मैलावर असलेल्या 'फुड-ड्रिंक स्टॉल' वर थांबून पाणी व गेटोरेडच्या नव्या बाटल्या घेतल्या. अजूनही बाथरूमला जावेसे वाटत नव्हते म्हणून तसाच पुढे निघालो. एव्हाना सूर्य बऱ्यापैकी वर आला होता. तसेच शरीरही गरम (warmed up) झाल्याने आता थंडी एवढी वाजत नव्हती. ३ तासाने मी ४५ मैलाची पाटी मागे सोडली आणि पुढे उतारावरच्या एका वळणावर पडता पडता वाचलो.थोड्याच वेळात ४८ मैलावरचा चौथा आणि शेवटचा 'फुड-ड्रिंक-स्टॉल' आला. इथे मी परत एकदा थांबून पाणी व गेटोरेडच्या बाटल्या घेतल्या आणि स्वच्छतागृहाचा वापर करून घेतला. ताजेतवाने झाल्यासारखे वाटले. आता शेवटचा टप्पा सुरु झाला. शेवटचे ८ मैल...या टप्प्यात मी बऱ्याच स्पर्धकांना मागे टाकले. ५० मैलाच्या पाटीनंतर बऱ्यापैकी चढण होते. थोड्याच वेळात ५५ मैल पूर्ण झाले. आता शेवटचा मैल. हया वेळेला मी ऑस्टिन हिंदू मदिराच्या समोरून जात होतो. बाहेरूनच देवाला नमस्कार केला आणि पुढच्या काही मिनीटातच माझी ५६ मैलाची (जवळ जवळ ९० कि.मी.) सायकल सफर पूर्ण झाली.

एव्हाना तपमान ६४° F किंवा १८°C झाले होते. सायकलिंगचा टी-शर्ट काढून पळण्यासाठीचा टी-शर्ट अंगावर चढवला आणि पटकन एनर्जीबार खात खातच स्पर्धेतला शेवटचा टप्पा म्हणजे 'हाफ-मॅरेथॉन' (१३.१ मैल किंवा २१ कि.मी.) धावायला सुरुवात केली. म्हणता म्हणता मी २ मैल पूर्ण केले व पहिल्या फेरीतला परतीचा प्रवास सुरु झाला. परत एकदा इनडोअर स्टेडियमच्या (४ मैल टप्पा) जवळ आलो तेव्हा माझी प्रशिक्षक केसी दिसली. तिने ओरडून प्रोत्साहन दिले. मी तिचे धावता धावताच आभार मानले. नाही म्हटले तरी तिच्या प्रशिक्षणाचा खूप फायदा झाला होता. मी जुने दिवस आठवले. आम्ही सकाळी ६ वाजता मैदानात धावण्यासाठी हजर रहात असू. त्यासाठी मला पहाटे सव्वा पाच वाजता उठून ब्रेकफास्ट करावा लागे. केसीचे प्रशिक्षण घेतले नसते तर मी या जन्मात व्यायामासाठी पहाटे पाच-सव्वापाचला उठलो नसतो.

माझी धावण्याची दुसरी फेरी आता सुरु झाली होती. पाणी-गेटोरेट मी एक-आड-एक स्टॉल्सवरून घेत होतो. केळी, संत्री -मोसंबी,एनर्जी जेल .. खाण्याचीही रेलचेल होती. मी धावता धावता खाणे पण खात होतो. तुमची कामगिरी चांगली होण्यासाठी पाणी,

गेटोरेड, खाणे या गोष्टी फार महत्वाच्या आहेत. मी या वेळेला योग्य समन्वय साधला होता. दुसऱ्या फेरीचा माझा परतीचा प्रवास सुरु झाला.स्टेडियमच्या जवळ आल्यावर परत एकदा केसी दिसली तिला टाळी देऊन पुढे धावत गेलो तर काय आश्चर्य. माझे काही मित्रमंडळी मला प्रोत्साहन देत ओरडत होते. त्यांनाही टाळ्या देत माझी तिसरी आणि शेवटची फेरी सुरु केली. थोड्या वेळाने खऱ्या अर्थाने स्पर्धेचा अखेरचा टप्पा सुरु झाला. शेवटचे २+ मैल... धावणे चालूच ठेवले. या शेवटच्या टप्प्यात धावत असताना मला विरुद्ध दिशेन एक अपंग स्पर्धक धावत येताना दिसला. या स्पर्धकाचा एक पाय कृत्रिम होता. मी दचकलोच. त्या स्पर्धकाची दांडगी इच्छाशक्ती आणि हया स्पर्धेसाठी त्याने घेतलेल्या कष्टाचे कौतुक वाटले. थोडे पुढे गेल्यावर मला त्या खेळाडूशी संवाद न केल्याबद्दल रूखरूख लागली. जरी आम्ही एकमेकांच्या विरुद्ध दिशेने धावत होतो तरी मी थांबून त्यांचे कौतूक करायला हवे होते.

आता शेवटचा १ मैल.... अजून पुढे आलो तर काय आश्चर्य. आमची मित्र मंडळी एक एक करून दिसू लागली. शेवटच्या वळणावर तर मित्रमंडळींची प्रचंड गर्दी. 'Prasad Panwalker - Ironman 70.3 Congratulations !!!' असा मोठा बॅनर निवेदिताने बनवून आणला होता. सर्व मित्र मंडळींना टाटा करत मी स्टेडियमकडे आत जाण्याचा रस्ता धरला, तशी आमची सर्व मित्रमंडळी जवळच्या दरवाज्याने स्टेडियममध्ये धावली. एक पूलाखालून धावत धावत जाऊन मी स्टेडियममध्ये प्रवेश केला आणि मला माझ्या नावाची घोषणा स्टेडियममध्ये होत असल्याचे कळले. समोर अंतिम रेषेची कमान. . . काही सेकंदांचा अवधी. . . म्हणता म्हणता मी अंतिम रेषेची कमान ओलांडली आणि उपस्थितांकडे बघत आभारप्रदर्शित केले. समोरच असलेल्या स्वयंसेवकाने माझ्या गळ्यात पदक घातले तर दुसऱ्या स्वयंसेवकाने 'Austin - Ironman 70.3' छापलेली टोपी दिली. तिसऱ्या स्वयंसेवकाने मला वैद्यकीय मदत हवी आहे का याची विचारपूस केली. मी सगळ्यांचे आभार मानत ठीक आहे असे सांगितले आणि मागे बघितले. . . निवेदिता मधल्या दुभाजकाच्या पलिकडे एकदम जवळ येऊन उभी होती. मी तिला घट्ट जवळ घेतले. निवेदिताला आनंदाश्रू आवरेनासे झाले. माझे ही डोळे क्षणभरासाठी पाणावले.

मी 'Ironman 70.3' झालो होतो. निवेदिताच्या सहकार्यानेच ते शक्य झाले. त्यामुळे माझ्या गळ्यातले पदक काढून मी ते तिच्या गळ्यात घातले. मला 'Iron Man' बनवताना ती खंबीरपणे माझ्यामागे उभी होती. गंमतीत काही मित्रांनी तिला 'Iron Lady' ही पदवी देऊ केली. मी आता आमच्या मित्रमंडळींना भेटण्यासाठी दुभाजकाच्या दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी निघालो. सर्व मित्रमंडळींनी जोरदार अभिनंदन केले. माझ्यासाठी बनवलेले अनेक विनोदी बॅनर्स बघायला मिळाले. बरेच ग्रुप फोटो झाले. वातावरणात प्रचंड उत्साह होता. सकाळी ८ वाजून ५ मिनिटांनी सुरु झालेली स्पर्धा मी दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी तब्बल ७ तास ४३ मि.१२ सेकंदांनी पूर्ण

केली. देवाच्या कृपेने स्पर्धा निर्विघ्नपणे पार पडली. सर्व मित्रमंडळींनी थोड्या वेळाने निरोप घेतला. निवेदिताने माझ्या दोन्ही बहिणींना व तिच्या भावाला फोनवरून नव्या 'आयर्नमॅन'बद्दल माहिती दिली. परत एकदा अभिनंदनाचा वर्षाव झाला. सायकल गाडीत ठेवून आम्ही ऑस्टिन हिंदू मंदिरात गेलो. देवाचे दर्शन घेऊन मगच घराकडे प्रयाण केले.

घरात आल्यावर परत एकदा आश्चर्याचा धक्का. बरीच मित्रमंडळी अगोदरपासून घरात उपस्थित होती. 'Surprise!!!' मगाशी स्टेडियममध्ये पाहिलेले सर्व बॅनर्स आता घरातील भिंतीवर लावलेले होते. जेवणाच्या टेबलावर एक सुंदर असा केक होता व त्या केकचे डिझाईन 'Prasad Panwalker - Ironman 70.3 Congratulations !!!' ह्या बॅनर सारखेच होते. हा केक आमच्या एका मैत्रिणीने बनवला होता. केकवर ऑलिंपिक टॉर्च सारखी ऐक मेणबत्ती लावण्यात आली. लहान मुलांनी मेणबत्ती फुंकल्यावर केक कापण्यात आला.ज्या मित्रमंडळींना इतर काही कारणामुळे स्टेडियमवर यायला जमले नव्हते, त्यांनी आवर्जून संध्याकाळी आमच्याकडे येऊन माझे अभिनंदन केले.

आमच्या बऱ्याच मित्रमंडळींनी तर पुढील वर्षी ट्रायथलॉन मध्ये भाग घेण्याचा संकल्प केला आहे. तुम्हाला जर असे काही करावेसे वाटले तर माझ्याशी जरुर संपर्क साधा. मी पहिल्यापासून तुम्हाला पूर्ण मार्गदर्शन करायला तयार आहे. ट्रायथलॉन हा प्रकार वरकरणी जरी अवघड वाटला, तरी टप्प्या टप्प्यात केला तर हळूहळू सहज साध्य होईल असा खेळ आहे. फक्त नियमितपणा आणि चिकाटी पाहिजे म्हणजे झाले. 'एका दगडात दोन पक्षी' म्हणतात तसे तुमचे ट्रायथलॉन पूर्ण करण्याचे स्वप्नही पूर्ण होईल आणि खूप व्यायाम केल्यामुळे तब्येतही चांगली होईल. वजन कमी होणे, शरीर पिळदार बनणे, चांगले खाण्याची सवय लागणे, उत्साह आणि आत्मविश्वास वाढणे हे जास्तीचे फायदे.

देवाची कृपा, निवेदिताच्या व नातेवाईक मित्र-मंडळींच्या पाठिंब्यामुळे आणि सहकार्यामुळे मी आज माझे 'Ironman 70.3' चे स्वप्न पूर्ण करु शकलो. खरोखरच 'शून्या पासून ७०.३' असा हा विलक्षण प्रवास होता. असाच पाठिंबा आणि सहकार्य मला माझ्या पुढच्या उपक्रमांसाठी पण लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

गोळाबेरीज

Uttamrao living in Anytownville in North America takes his family to Olive Garden.

Bruschetta and Flatbread, Pasta and Chicken Alfredo - $ 38
Kids meal - $7
Red wine by glass for Uttamrao and his wife - $10
Tax and Tip - $15

Total - $70

पुढच्या आठवड्यात उत्तमराव परिवाराला घेऊन मराठी मंडळाच्या कार्यक्रमाला जातात

श्रीखंड, पुरी, मसाले भात, रस्सा भाजी, उसळ,मठ्ठा , पेढे - अद्‌वितीय
कार्यक्रम - अविस्मरणीय
मित्रमंडळी आणि मराठी परिवार – अतुलनीय

Total - $68 (3 adults and 1 kid)

वेणा पर्वत - एक अपुरी इच्छा !

पद्माकर गंगातीरकर

दक्षिण अमेरिकेतील पेरू देशामध्ये असणारे माचू पिचू हे ठिकाण इंका राज्याच्या ई. स. १४००-१५५० या वेळी बांधलेल्या शहरा बद्दल फार प्रसिध्द आहे. माचू पिच्चूचा कोणताही फोटो पहा! समोर संपूर्ण शहरातील नव्याने उत्खनन केलेल्या विविध इमारती व बाजूला डोंगराच्या उतारावरली शेती!

परंतु डोळ्यात भरतो तो मागचा छोटा पर्वत! याचे नाव आहे हुयाना पिच्चू. मी त्याला वेणा पर्वत म्हणतो. केव्हा तरी हा पर्वत आपण चढून जावा ही मनातली इच्छा. तसे पहिले तर हा पर्वत माचू पिच्चू वर बसने पोचल्या नंतर फार अवघड नाही. समुद्र सपाटी पासून ९००० फूट उंची वर असलेला पर्वत माचू पिचू पासून फक्त १२०० फूट चढावा लागतो. सरळ हाता पायाच्या सशक्त लोकांना साधारण एक दीड तासात चढून जाता येण्यासारखा.

तेंव्हा या वर्षी ऑगस्ट मध्ये माचू पिचूला भेट द्यायचे ठरले तर प्रथम गोष्ट म्हणजे वेणा पर्वतावर चढण्याचा बेत करणे. येथे दररोज फक्त ४०० लोकांना वर चढण्याची परवानगी आहे. चढायला काही ठिकाणी कठीण आहे. परंतु चढण्या पेक्षा उतरायला जास्त कठीण. मे महिन्यात सर्व बेत निश्चित केला.

मंगल म्हणत होती कि या वयात कशाला हे करायचे! आपण दोघेच जाणार आहोत ! दुसऱ्या देशातून सुखरूप परत येऊ.

" पण या पर्वतावर ५०० वर्ष पूर्वी तेथील ज्येष्ठ पुजारी सूर्याची पूजा करत असत. आपण तेथे जाऊन सकाळी सूर्याचे दर्शन घेऊ आणि दोन फुले ठेऊन परत येऊ! "

येथील पूर्वीची संस्कृती आपल्या संस्कृतीशी बरीच जुळते. ते लोक सूर्य, चंद्र ,पृथ्वी यांची पूजा करायचे. त्यांच्या धर्मात एक विश्वकर्मा पण होता.मला असा वाटत की आपली संस्कृती इंडोनेशिया, बाली, फिजी, या मार्गाने कदाचित दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर असणाऱ्या पेरू देशातील रहीवाश्यापर्यंत पोचली असावी.

आम्ही वेणा पर्वताची चढण्याची तयारी चालू केली. एकाच दिवसात माचू पिच्चू व वेणा पर्वत जमेल असे पण वाटले !!

त्या दृष्टीने वेळा पत्रक तयार केले व तिकिटे घेण्याबद्दल कुझ्को च्या एजंटला कळवले.

परंतु मे महिन्यात टेनिस खेळताना माझा उजवा गुढगा बराच दुखावला. तो काही बरे व्हायची चिन्हे दिसत नव्हती. त्यामुळे नाईलाजाने हा बेत आम्ही सोडून दिला.

२९ ऑगस्ट ला बुधवारी आम्ही पेरू मधील कुझ्को या गावात पोचलो. इंका लोकांची ही राजधानी. पाचाकुती राजाने साधारण १४५० साली माचू पिचू येथे धार्मिक, शेतकी व खगोल शास्त्राचा अभ्यास या साठी आपली वसाहत निर्माण केली. दक्षिणेला माचू पिच्चू -- जुना किंवा अनादी पर्वत- व उत्तरेला हुयाना पिचू - नवा किंवा तरुण पर्वत.

कुझ्को गावा पासून साधारण ३० - ४० मैलावर उरुबम्बा नदीचे सुपीक खोरे आहे. आपल्या गंगा नदी सारखी ही पवित्र नदी. म्हणून या खोऱ्याला ते पवित्र खोरे म्हणतात. हे खोरे बघायला आम्ही दोघे गुरुवारी सकाळी एका टुर बरोबर निघालो. गाडी मध्ये सगळे मिळून ७ लोक. आम्ही दोघे, एक अमेरिकन, दोन भारतीय व टुर चे दोन लोक. ५-१० मिनिटात हे भारतीय लोक चक्क मराठी बोलतात हे कळल्यावर आमच्या गप्पांना तोंड फुटले. पुण्यातील शुक्रवार पेठे तील ही नवरा बायको, अभय आणि अंजली , साधारण ३० च्या आसपास असावीत. सध्या पॅरिस, फ्रांस येथे कामाला. बहुतेक मुल बाळ नसावे. आठ दिवसाच्या पेरू सहलीला आले होते.

" काय, माचू पिचू ला केंव्हा जाणार?" मी विचारले.

" उद्याच! " अभय म्हणाला.

" अरे वा ! आम्ही पण उद्याच जातोय ! तुम्ही वेणा पर्वताला जाणार आहात ??"

" अर्थातच! पण उद्या संध्याकाळी तेथे राहून शनिवारी सकाळी आम्ही वर जाणार आहोत" अंजली म्हणाली.

" ते बर केलेत. सकाळी वर चढल्यावर सूर्याचे मस्त दर्शन होईल तुम्हाला ! " माझ्या म्हणण्यात थोडी हेवेची भावना होती.

" हो ना ! सकाळी लौकर उठून ८ च्या आत वर पोहोचायचं आमचा विचार आहे " इति अभय.

" तुम्ही तरुण लोक! या पर्वतावर चढण्याचा जागतिक विक्रम २२ मिनिटाचा आहे! तो पण तुम्ही पार कराल! पण आमच्यासाठी एक गोष्ट करा. टोकावर पोचल्यावर आमच्य वतीने सूर्याला नमस्कार करा ! " मी म्हणालो.

" अवश्य !" अभय व अंजली उत्साहाने म्हणाले.

उद्या भेटू असे एकमेकाला सांगून, पवित्र खोऱ्याची सहल संपवून आम्ही आपापल्या हॉटेल मध्ये परतलो.

शुक्रवार ३१ ऑगस्ट. सकाळी लौकर उठून ६:४० ची माचुपिच्चू ला जाणारी गाडी पकडली. या गाडीत चार लोकांना समोर समोर बसण्याची सोय. समोर एक बहुदा नवे लग्न झालेले जोडपे येऊन बसले. गाडी सुरु होताच आमच्या गप्पा चालू झाल्या! थोड्याच वेळात लक्षात आले की हा नवरा दिल्लीचा आहे आणि त्याची पत्नी अमेरिकन आहे. त्याचे नाव राज व ती जुली. गेल्या नोव्हेंबर मध्ये मोठ्या धूम धडाक्यात दिल्ली मध्ये लग्न झाले. समोर आलेला ब्रेकफास्ट खाताना खूपच गप्पा झाल्या.

" आम्ही आज माचू पिचू बघून परतणार आहोत. तुमचा काय बेत आहे ? " मंगल ने विचारले.

" आज माचू पिच्चू बघणार व उद्या सकाळी वेणा पर्वत! " राज म्हणाला.

" वा वा! छान ! पण आमच्यासाठी एक गोष्ट करा. टोकावर पोचल्यावर आमच्यावतीने सूर्याला नमस्कार करा ! " मी म्हणालो.

साडे तीन तासाच्या प्रवासात उरुबम्बा नदीच्या खोऱ्याचा अप्रतिम निसर्ग पहिला व या खोऱ्याला हे लोक पवित्र खोरे का म्हणतात याचा उलगडा पडला. गाडीतून उतरल्या नंतर " भेटू कधी तरी " असे म्हणत आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.

शुक्रवारी गाडीतून उतरल्या नंतर संपूर्ण दिवस माच पिचू वरची अनेक जीर्ण स्थाने बघितली. मुख्य देऊळ, राजवाडा, पवित्र स्थळे, सूर्याचे देऊळ, उतारावर केलेल्या शेतीच्या जागा व सर्व निसर्ग सौंदर्य बघण्यात वेळ कसा गेला ते कळले नाही. पण दोन्ही जोडप्यापैकी एकाचीही गाठ पडली नाही.

शनिवारी आम्ही मिठाची खाण व गोल शेतीचे वाफे बघितले. रविवारी सकाळी पेरूची राजधानी लिमा येथे आलो. दुपार भर संपूर्ण शहर हिंडत संध्याकाळी ७ वाजता विमानतळावर आलो. रात्री साडे बाराचे परतीचे विमान होते. तेंव्हा इकडे तिकडे भटकणे व थोडे फार खाणे यातच वेळ घालवला. पण थोड्याच वेळात दुसऱ्या मजल्यावर भटकताना समोर दिसले ते राज व जुली हे जोडपे.

" अरे, तुम्ही आत्ता विमानतळावर कसे?" मी विचारले.

" आमच विमान साडे अकराचे आहे ! आम्ही युनायटेड ने परत चाललो आहोत." जुली म्हणाली.

" बरं झाले भेट झाली..पण प्रथम एक सांगा .. वेणा पर्वत चढलात का?? " मी विचारले.

दोघे ही थोडी लाजल्यासारखी वाटली.

" माचू पिचू बघून आम्ही थकलो होतो. सकाळी लौकर उठून परत वर चढण्यापेक्षा हॉटेल मध्येच आराम करायचे ठरवलं. पुढल्या वेळी बघू." राज म्हणाला.

हे ऐकून माझी निराशा झाली. खरे पाहिल्यास मला वाईट का वाटावे? थोडा अपेक्षा भंग झाला! ते दोघे सुट्टीला आले होते; पर्वत चढण्या ऐवजी त्यांनी आराम केला. ठीक आहे. नंतरथोडा वेळ गप्पा मारून ते दोघे आपल्या विमानात चढण्यास निघून गेले.

आत्तापर्यंत जवळ जवळ रात्रीचे ११ वाजले होते. आम्ही आमच्या बॅगा देऊन विमानाचे बोर्डिंग पास घेतले. पासपोर्ट तपासणे, सिक्युरिटी ई. करून विमानाच्या गेटवर वाट पाहत बसलो. तेवढ्यात मागून कोणी तरी " काका, काका" असे आपणाला बोलवत आहे असे वाटले. अरे, ही तर अंजली! तिला आणि अभयला आता येथे पाहून आश्चर्याचा धक्का बसला.

" अग, तू इकडे कशी? आणि तुम्ही आज परत जाणार ? "

" हो ! आम्ही कामाची माणसे ! परवा कामाला जाणार ! लिमाहून अटलांटा मार्गे पॅरिसला जाणे जास्त स्वस्त आहे! " अभय म्हणाला.

" म्हणजे तुम्ही आमच्याच विमानात ! काय योगा योग आहे! " मंगल म्हणाली.

" बरे तुम्ही प्रथम सांगा .. वेणा पर्वत चढलात ?" मी अतिशय उत्सुकतेने विचारले.

" अर्थातच! आणि तुम्ही एवढे आवर्जून सांगितले होते ना? " अंजली म्हणाली.

" जरा मला पूर्ण हकीगत सांग" मी म्हणाले.

" आम्ही सकाळी लौकर ६ वाजता उठून निघालो. पर्वत चढण्यासाठी दीड तास लागला. जाताना काही कठीण वाटला नाही, पण येताना गुडघे दुखू लागले! आम्ही शिखरावर अर्धा तास बसलो." अंजली म्हणाली.

" मग तेथे पद्मासन घालून..... आम्हाला तेवढे जमत नाही.... तरी पण प्रयत्न केला...समोरच्या माचू पिच्चू च्या पर्वतावरून नुकत्याच वर आलेल्या सूर्याचे दर्शन घेतले. काय मस्त देखावा होता!" अभय म्हणाला.

अंजलीच्य वर्णना वरून ते भव्य दृश्य माझ्या मनासमोर उभे राहिले. २० हजार फूट उंचीवरील बर्फाच्छादित शिखरे, निरभ्र निळे आकाश, खाली खोऱ्यात वाहणारी उरुबम्बा नदी व माचू पिच्चू पर्वताच्या वर नुकताच उगवलेला सूर्य!

" मग ? "

" आम्ही दोघांनी सूर्याला तुमच्या साठी व आमच्या साठी नमस्कार केला आणि परत निघालो." अभयने अभिमानाने सांगितले.

हे ऐंकून मला अतिशय समाधान वाटले. माझी इच्छा या प्रकाराने का होईना पण पूर्ण झाल्या सारखी वाटली. मी त्यांचे आभार मानले.

" काका, त्यात आमचे काय आभार? " अंजली म्हणाली.

मी नुसता समाधानाने हसलो.

कर्दळीवनातील दैवी अनुभूती



"**कर्दळीवन : एक अनुभूती**" हे प्रा. क्षितिज पाटुकले यांनी लिहलेले पुस्तक दि. २७ ऑक्टोबर २०१२ रोजी श्री.गुरू पीठ - श्री. क्षेत्र त्रंबकेश्वर नाशिक येथे प्रकाशित होत आहे. कर्दळीवनावरील हे पहिलेच पुस्तक आहे. अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ हे कर्दळीवनात प्रकट झाले. गुरूचरित्रामध्ये कथा भाग असा आहे की श्री नृसिंह सरस्वती हे १३ व्या शतकात श्री शैल्य जवळील कर्दळीवनात पाताळगंगेच्या पात्रात बुट्टीत बसून गेले आणि तेथे एका अश्वत्थ वृक्षाखाली बसून त्यांनी तप:साधना केली. ते बसलेल्या ठिकाणी त्यांचेभोवती वारूळ तयार झाले. अशीच साडेतीनशे वर्षे गेली. एक लाकूडतोड्या झाडाचे लाकूड तोडताना त्याचा आघात होवून त्यांची समाधी भंग पावली. तेव्हा त्या वारूळातून अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ प्रकट झाले. श्री शैल्य या ज्योतिर्लिंगाजवळ कृष्णा नदी पाताळगंगा रूपाने जवळजवळ २०० कि.मी. वाहते. हा सर्व परिसर अत्यंत घनदाट अरण्याने वेढलेला आणि दुर्गम असा आहे. तेथे जाण्यासाठी किमान सोयी उपलब्ध व्हायला इ.स. २००० हे साल उजाडले. कर्दळीवनात चेंचुआ या जमातीचे आदिवासी लोक रहात आहेत. कर्दळीवनात पहिल्यांदा जाऊन तेथील मूळ स्थानाचा शोध अकोल्याचे श्री दत्त महाराज यांनी इ.स. २००७ साली घेतला. कर्दळीवन यात्रेसंबंधी अनेक समज, अपसमज आणि श्रद्धा आहेत. इतर तीर्थक्षेत्री आपल्याला इच्छा झाली की लगेच जाता येते. कर्दळीवनात जायला अवधुतांची आणि स्वामींची इच्छा असल्याशिवाय जाता येत नाही. भारतात दरवर्षी १ लाखातून १ व्यक्ती काशी-रामेश्वरला जाते, १० लाखातून १ बद्री केदारनाथला जाते, २५ लाखातून १ नर्मदा परिक्रमा करते, ५० लाखातून १ कैलास मानस सरोवर यात्रेला जाते. मात्र कर्दळीवनात १ कोटीतून १ च भाग्यवान व्यक्ती जाते. त्यामुळे कर्दळीवना विषयी लोकांना फार माहिती नाही. कर्दळीवन नवनाथ आणि नाथपंथी साधू, योगी यांचे साधनास्थळ आहे. तसेच ती सिद्धांची भूमी आहे. नागार्जून, रत्नाकर इ. सिद्धांची प्रयोगशाळा म्हणजे कर्दळीवन. कोणत्याही मूलद्रव्याचे सुवर्णामध्ये रूपांतर करायचे तंत्र त्यांनी विकसित केले होते. कर्दळीवनात विलक्षण दैवी अनुभव येतात. कर्दळीवनात प्रत्यक्ष जाऊन आणि तेथे मूळ स्थानी निवास करून लेखकाने स्वत: दिव्य अनुभूती घेतल्या. कर्दळीवनासंदर्भातील अनेक इंग्रजी, हिंदी पुस्तकांचा आणि दत्त संप्रदायातील अनेक ग्रंथांचा सखोल अभ्यास करून लेखकाने हा ग्रंथ लिहला आहे. याचबरोबर कर्दळीवन यात्रा कशी करावी, तेथे कसे जावे, महत्वाचे फोन, मोबाईल क्रमांक, ईमेल, राहण्याची व्यवस्था इ. सर्व माहिती या पुस्तकात दिली आहे. कर्दळीवनाचे धार्मिक

आणि अध्यात्मिक महत्व याबाबत विवेचन केले आहे. लेखकाने आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून दत्तसंप्रदायाचा अभ्यास केला असून कलियुगातील दत्त अवतारांचे महत्वपूर्ण कार्य आणि अवतार यावर वैशिष्ट्यपूर्ण भाष्य केले आहे. दत्तसंप्रदायात अन्नदान आणि अतिथीसेवा यांचे अपरंपार महत्व असून अन्नदानाचे विलक्षण अनुभव लेखकाने कथन केले आहेत. महावतार बाबाजी, लाहिरी महाशय आणि शिर्डीचे साईबाबा यांचेमधील गुरू शिष्याचे नाते आणि मुस्लीम व ख्रिश्चन धर्माचा दत्तसंप्रदायाशी असणारा संबंध लेखकाने विशद केला आहे. कर्दळीवनासंबंधी हे एक अत्यंत अद्भुत आणि विलक्षण पुस्तक असून प्रत्येक दत्तभक्ताने आणि स्वामी भक्ताने हे पुस्तक संग्रही ठेवावे असे आहे. कर्दळीवनाचा इतिहास सांगताना लेखकाने कर्दळीवनातील जैवविविधते विषयीही चर्चा केली आहे. हे पुस्तक वाचल्यावर जणूकाही कर्दळीवनात जावून आल्याची अनुभूती येते. या पुस्तकाला वासुदेव निवास, पुणे चे मुख्य ट्रस्टी परम पूजनीय **श्री नारायणकाका ढेकणे महाराज** यांनी आशिर्वाद दिला असून श्री.गुरू पीठ - श्री. क्षेत्र त्रंबकेश्वर येथील **प.पू. गुरुमाउली आण्णासाहेब मोरे** यांनी अभिप्राय दिला आहे. जेष्ठ पत्रकार **श्री.विजय कुवळेकर** यांनी प्रस्तावना लिहली आहे. प्रत्येक स्वामी भक्ताने आणि दत्त भक्ताने कलियुगात एकदा तरी कर्दळीवनात जावून यावे, हा हे पुस्तक लिहण्याचा लेखकाचा हेतू आहे. अधिक माहितीसाठी, **कर्दळीवन सेवा संघ**, ६२२, पुलाचीवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४ महाराष्ट्र भारत ईमेल : swami@kardaliwan.com येथे संपर्क साधावा. तसेच अधिक माहिती www.kardaliwan.com या वेबसाईटवर देखिल उपलब्ध आहे. **(प्रा. क्षितिज पाटुकले मोबाईल - ९८२२८४६९१८ / ईमेल - patukalesir@gmail.com)**

तू तिथे मी

परेश केळवेकर

प्रिये, काय सांगू कसं सांगू
असे काय करू कि तुझ्या जवळ राहू ?
माझ्या तळंहातावरचा तू फोड म्हणून
वाटते तुला सारखे कुरवाळत राहू
तुझ्या वेणीतले फूल म्हणून
उडणाऱ्या केसांशी खेळत राहीन
तुझ्या गालावरचा तीळ होऊन
लाजत मुरडत मिरवीत राहीन
नटण्याची हौस तुझी, बुगडी होऊन मी
तुझ्या कानात फुंकर घालत राहीन
अन कधी तुझ्या डोळ्यातले काजळ होऊन
बुजऱ्या नजरेत चमक भरत राहीन
माझ्या कंठातला श्वास तू
तुझ्यापासून कसे मी दूर राहू ?
की तुझ्या पायातले पैंजण होऊन
टाचेवर ताल धरून वाजत राहू
आणि नाही पाहिलेस मला जरी
तरी स्पर्श माझा मी देउन जाईन
जमिनीवरचा क्षुद्र गांडूळ होऊन
तुझ्या पायाखाली चिरडत राहीन

रिओ (ब्राझिल)

प्रसाद पानवलकर

एप्रिल २०११ ची गोष्ट. माझा ४० वा वाढदिवस जवळ आल्याने माझ्या पत्नीला, निवेदिताला, मला आवडीची गोष्ट भेट द्यायची होती. पर्यटन हा माझा आवडीचा छंद असल्याने कुठेतरी नव्या ठिकाणी जायचे हे नक्की होते, प्रश्न होता की कुठे?युरोपातले दहा एक देश बघून झाले होते, तसेच काही वर्षांपूर्वी इजिप्त (आफ्रिका खंड)मधील पिरॅमिड्स ही बघून झाली होती. अलास्का तसेच कॅनडाचा पूर्व भाग (टोरंटोपासून क्युबेक पर्यंत पूर्वीच बघून झाल्याने दक्षिण अमेरिकत यावेळी फिरायला जायचे असे निवेदिताने ठरवले. गंमतीचा भाग म्हणजे, इतके पर्यटन करून सुद्धा मी अजूनपर्यंत विषुववृत्त (Equator)ओलांडला नव्हता. आणि जर दक्षिण अमेरिकेत गेलो तर ५ प्रमुख खंडातील कमी कमी एका देशाला तरी भेट दिली हे एक मानसिक समाधान मिळणार होते.

दक्षिण अमेरिकत जायचे तर कुठे? मागे २००६ साली पेरू देशात माचू-पिचू (Machu-Picchu) या प्राचीन इंका संस्कृतीच्या पर्यटन स्थळाला भेट द्यायाची असा बेत ठेरला होता. मात्र त्यावर्षी हवाई बेटांना भेट दिल्याने तो विषय तेव्हा बारगळला. यावेळी आमची मुलगी, प्रिया, दीड वर्षाची होती. त्यामुळे तिला घेऊन ८००० फूट डोंगरात प्राचीन भग्न अवषेश बघायला जाणे निवेदिताला योग्य वाटत नव्हते. त्यामुळे ब्राझिलला भेट द्यायची हे निश्चित झाले. इतके दिवस मला निवेदिताने याबद्दल काही सांगितले नव्हते. परंतु प्रवासी व्हिसा लागणार असल्याने निवेदिताला surprise फोडायला लागले... पण तरीही वाढदिवसाची ही Surprise Gift माझ्यासाठी अमूल्य होती.

ब्राझिलला जायचे ठरले खरे पण नेमके कुठे? ब्राझिल म्हटले की सॉकरपटू पेले, त्यांचा हिरवा-पिवळा झेंडा, सुंदर समुद्र किनारे, आणि रियो डि जानिरो चा ख्राईस्ट चा डोंगरावरील उंच पुतळा लगेचच डोळ्यासमोर येतात. त्यामुळे रिओ ला भेट द्यायची हे नक्की झाले पण रिओ बरोबर अजून काही शहरांना भेटी देता येतील का याची चाचपणी आता सुरु झाली. इगुआझु धबधबा (Iguazu Falls) हा ब्राझिल आणि अर्जेंटिनाच्या हद्दीवरचा प्रसिद्ध धबधबा लांबीला जवळजवळ दीड मैल पेक्षा मोठा आहे. २५० फूट कोसळणारा हा धबधबा डोळ्याचे पारणे न फेडेल तर नवलच. रिओ हून ह्या धबधब्याकडे जाऊन येण्याचे नियोजन सुरु केले परंतु सोयीची विमाने नव्हती. जाताना साओ पावलो ला थांबून, तर येताना अजून २ ठिकाणी थांबून येणारी विमाने होती. तसेच आमची प्रिया दीड वर्षाची... त्यामुळे तिला घेऊन या धबधब्यासाठी दोन -अडिच दिवसाची ओढाताण योग्य वाटत नव्हती. माझ्या नोकरीच्या ठिकाणीही मी ब्राझिल बद्दल चौकशी सुरु केली. आमच्या कंपनीच्या ब्राझिलमध्येही २-४ शाखा आहेत. संदर्भ घेऊन १-२ जणांशी संपर्क साधला. इगुआझु धबधबा नाही तर कमीत कमी साओ पावलो ला तरी भेट देऊया असे मला वाटत होते. परंतु नव्याने झालेल्या ह्या ब्राझिलीयन मित्रांनी साओ पावलो हे "प्रचंड लोकवस्तीचे दक्षिण अमेरिकेतील मोठे शहर" या पलिकडे ह्या शहरात काही नाही असे सांगून तेथे जाण्याचा मनसुबाही हाणून पाडला. त्यामुळे शेवटी फक्त रिओलाच भेट देऊन यायचे असे ठरले. कोपाकबाना (Copacabana) हा रिओतला एक प्रसिद्ध बीच. त्यामुळे आम्ही समुद्रासमोरचे हॉटेल (Leme Othon) बुक केले. प्रत्यक्ष प्रवासाला अजून एक महिना उरला होता, मात्र मनाने ब्राझिलकडे केव्हाच प्रयाण केले होते... सॉकर,.. खेळाळूंचा जोश... निसर्ग सौंदर्य...आणि बीचवर दिसणारे सौंदर्य... मन स्वैरभैर पळू लागले...

२८ जून, २०११ रोजी आम्ही प्रवासाला सुरुवात केली. ऑस्टिनहून डॅलसला आणि मग डॅलसहून थेट रिओला असे आमचे विमान होते.

डॅलसला ब्राझिलचे चलन R$ किंवा Reais (hey-ice असा उच्चार) घेतले. संध्याकाळी पावणे आठ वाजता आमचे विमान निघाले ते १० तासांचा प्रवास करून दुसऱ्या दिवशी सकाळी स्थानिक वेळेनुसार ८ वाजता रिओला पोहोचले. मी विमानतळावर इकडे-तिकडे बघत होतो. रिओ- आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ जगभरातून इथे दररोज हजारो लोक येतात, पण विमानतळावर मला अभावानेच इंग्रजी पाट्या दिसत होत्या. सगळीकडे पार्तुगीज भाषेत फलक/जाहिराती. चुकुन एखाद्याला वाटावे की आपण ब्राझिल मधल्या कोणत्या तरी छोट्या शहरातील विमानतळावर तर नाही आलो ना? बॅगा घेऊन विमानतळा बाहेर पडत असताना एका बूथवर जाऊन टॅक्सी आरक्षित केली.

रिओत आमचा टॅक्सी प्रवास सुरु झाला.सकाळचे ९.१५ वाजले असतील. स्वच्छ-सुंदर दिवस. थोड्याच वेळात बाजूला समुद्र दिसू लागला. आश्चर्याचा धक्का म्हणजे टॅक्सी ड्रायव्हर चक्क इंग्रजी बोलणारा होता. एवढेच नाही तर अमेरिकेत २ वर्षे राहिलेला होता. त्याचे नाव मार्सिलो. आमच्या आनंदाला पारावर उरला नाही आणि मग आमच्या गप्पा सुरु झाल्या. थोड्याच वेळात मार्सिलोने आम्हाला बाजूच्या डोंगराकडे बघायला सांगितले आणि आम्हाला पहिल्यांदा त्या भव्य 'ख्राईस्ट'च्या पुतळ्याचे दर्शन झाले. हिरव्यागार डोंगरमाथ्यावर पांढराशुभ्र'ख्राईस्ट' खूपच छान दिसत होता. पुढची काही मिनिटे आम्ही गप्पा न मारता 'ख्राईस्ट'ला बघण्यात घालवली. थोड्या वेळाने 'ख्राईस्ट'दिसेनासा झाला आणि आम्ही परत एकदा गप्पा सुरु केल्या. मार्सिलो सांगू लागला की तो 'टूर गाईड' पण आहे आणि जर आम्हाला हवे असेल तर पूर्ण दिवस तो आम्हाला रिओ फिरवेल. आम्ही विचार करून सांगतो असे सांगितल्यावर त्याने खिशातून त्याचे कार्ड काढून दिले. पुढील काही मिनिटातच टॅक्सी थांबली आणि त्याने आमचे हॉटेल आल्याचे सांगितले. धन्यवाद म्हणून आम्ही मार्सिलोचा निरोप घेतला.

सकाळचे दहाच वाजले होते आणि हॉटेलच्या खोलीचा ताबा मिळायला अजून २ तास होते. समोर समुद्र दिसत होता. आमचा मुलगा नील (८ वर्षे) आणि प्रियाची समुद्राकडे चला अशी मागणी जोर धरू लागली. त्यामुळे आम्ही सामान हॉटेलमध्ये ठेवून थेट कोपाकबाना बीच गाठला. तत्पूर्वी मार्सिलो ला १जुलै ला 'रिओ दर्शन' घडवायला ये म्हणून सागितले. मुंबईच्या नरीमन पॉईंटची आठवण होईल असाच अर्धचंद्राकृती बीच, खास वैशिष्ठ्य म्हणजे खूपच रूंद असा फूटपाथ आणि त्यावर सुंदर असे कृष्ण-धवल लाटेचे डिझाईन (Portuguese Pavement Design) की जे पूर्ण अडीच मैल भर आहे.

आम्ही सगळेच आता समुद्राच्या पाण्यात खेळू लागलो. घड्याळाकडे कुणाचेच लक्ष नव्हते. तासाभराने फूटपाथच्याकडे आलो. तेथे पामची झाडे होती आणि शहाळ्याचे स्टॉल्स. सगळ्यांनी शहाळ्याचे पाणी पिऊन तरतरी आणली आणि नील व प्रिया परत पाण्याकडे वळाले. मी व निवेदिता आता पाण्याजवळ मातीत बसून समुद्राकडे बघत होतो. निळाशार समुद्र लांबवर पसरला होता. दूरवर १-२ मोठ्या बोटी न हलता शांत उभ्या होत्या. डाव्या बाजूला अर्ध्यामैलावर बीच संपत होता व तेथे उंच डोंगर होता. त्या डोंगरावर ब्राझिलचा हिरवा-पिवळा झेंडा फडकत होता. उजव्या बाजूला मात्र २ मैल बीच वळण घेऊन होता आणि शेवटी किल्ल्यासारखे काहीतरी दिसत होते. त्याही पलिकडे मागे डोंगर दिसत होते आणि आमच्या मागे सगळीकडे उंचच उंच हॉटेलच्या इमारती. फूटपाथ आणि समुद्रामध्येही भरपूर जागा होती व त्यात पांढरीशुभ्र समुद्राची वाळू. एकंदरीत, तासनतास बसून रहावे अशी जागा होती. जून महिन्याचा शेवट, दक्षिण गोलार्ध असल्याने नुकताच हिवाळा सुरू झालेला पण अजिबात थंडी जाणवत नव्हती.तापमान ७७^0 F (२५^0 C) एकदम आल्हाददायक!

आम्हाला दहाव्या मजल्यावर खोली मिळाली होती. दुपारी थोडी झोप काढून संध्याकाळी आम्ही बीचवर आलो - मात्र यावेळी पाण्यात नाही तर फूटपाथवर चालायला. इथे अनेक खाण्या-पिण्याचे स्टॉल्स होते. परत एकदा प्रत्येकाच्या आवडीनुसार खाणे घेण्यात आले आणि आम्ही फूटपाथवर चालणे सुरु केले. डावीकडे समुद्र ... वाळूत अनेक तरुण-

तरुणी बीच व्हॉलीबॉल, पायाने फक्त मारण्याचा व्हॉलीबॉल(?), वगैरे खेळ खेळत होती. इकडे बीचवर अनेक स्थानिक लोक समुद्राच्या वाळू पासून वेगवेगळी शिल्पे/किल्ले तयार करतात. तुम्ही त्या कलाकृतीबरोबर फोटो काढला की त्या शिल्पकाराला टीप द्यायची अशी प्रथा आहे. अनेक सुंदर सुंदर शिल्पे आम्ही पहिली. लक्षात राहतील अशी म्हणजे वाळूतून बनवलेला रिओचा परिसर, त्यात ख्राईस्ट, शुगरलोफ माऊंटन, रिओ ऑलिंपिक २०१६ चे चिन्ह, सँटाक्लॉज, वगैरे. आम्ही चालता चालता एकदम थांबलो कारण या ठिकाणाहून मागे डोंगरावर ख्रिस्ताचा पुतळा विद्युत प्रकाशात खूपच छान दिसत होता. आम्ही तसेच पंधरा एक मिनिटे चालत गेलो. आता 'Queen's Necklace' च्या मध्यावर आलो असू. मागे वळून पाहिले तर आमचे हॉटेल दूरवर दिसत होते. आता आम्ही परतीचा प्रवास सुरु केला. रिओमधील आमच्या मुक्कामात पुढील सर्व रात्री आम्ही हा चालण्याचा उपक्रम केला. रात्रीही थंडी अजिबात नव्हती. ७३^{0}F (२३^0 C) थोडक्यात दिवस-रात्रीच्या तपमानात फार फरक नव्हता.

सकाळपासून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती ती रिओतील लोकांचा सुडौलपणा. पुरुष असो वा स्त्री, तरुण मुलगा वा तरुणी- अत्यंत सुंदर बांधा. थोडक्यात सांगायचे तर तरुण मुले/पुरुष बहुतांशी '6 पॅकस्'वाले आणि तरुणी/स्त्रिया व्यवस्थित आकारात... त्यामुळे आज पहिल्या दिवशी निवेदिता आणि माझा वेळ 'अरे हा बघ आणि ही बघ' असे एकमेकांना सांगण्यात गेला. अर्थात ज्यांना शरीर प्रदर्शन करायचेय तेच बीचवर येऊन अल्पकपड्यात फिरत होते. असो.

दुसऱ्या दिवशी (गुरुवार ३० जून) सकाळी लवकर उठून मी समुद्रावर फेर फटका मारून आलो. नंतर सर्व मंडळी उठल्यावर अंघोळी वगैरे करून आम्ही रिओ-दर्शन साठी बाहेर पडलो. हॉटेलच्या मागच्याबाजूला एक गल्ली होती. तिथे पहिले जायचे ठरविले. ह्या गल्लीत गेल्यावर आम्हाला एकदम पुणे-मुंबईत आल्याचा भास झाला. समुद्राच्या बाजूला जो श्रीमंतपणा होता तो इकडे आतल्या बाजूला नव्हता. इकडे पर्यटक अभावानेच, पण स्थानिक लोकांची खूप वर्दळ होती. भारतात दिसतात तश्या बेकऱ्या, पेपर/मासिकांचे स्टॉल्स, छोटी उपहारगृहे, औषधाचे दुकाने (केमिस्ट)...आम्हाला एकदम आपण भारतात तर नाहीना असा प्रश्न पडला? एका फेरीवाल्या बाईकडून निवेदिताने केसाच्या पिना, वगैरे घेऊन ब्राझिल मधल्या शॉपिंगचा 'श्रीगणेशा' केला. मग आम्ही जवळच्या बेकरीत जाऊन स्थानिक केक आणि इतर पदार्थांवर ताव मारला. त्यानंतर मग जवळपासच्या वेगवेगळ्या दुकानांमध्ये जाऊन निवेदिताची किरकोळ खरेदी झाली. जवळच्याच एका फळे व भाज्या विकणाऱ्या दुकानात गेलो. तेथे बटाट्याच्या टीगाखाली चक्क 'Batata' अशी पाटी होती.म्हणजे 'बटाटा' हा शब्द पोर्तुगीजांनी आपल्या कडे आणला तर? आमच्या हॉटेल च्या जरा पुढे गेल्यावर 'Brahma Beer - since 1888' अशी मोठी पाटी एका रेस्टॉरंटच्या बाहेर दिसली. ही स्थानिक बीअर म्हणे खूप प्रसिद्ध आहे. ब्राझिलच्या लोकांचे 'ब्रह्मा'वरचे प्रेम बघून साक्षात ब्रह्मदेवालाही छान वाटत असावे.

दुपारी जेवण झाल्यावर कोपाकबाना बीचच्या शेवटी दिसणाऱ्या किल्ल्याकडे जायचे ठरले. 'Fort Copacabana' हा किल्ला ब्राझिलीयन लष्कराच्या नियंत्रणाखाली आहे. त्यामुळे दरवाज्यावर सैनिक होते. तिकीट काढून आत गेलो. समोर कोपाकबाना बीच सुंदर दिसत होता. पोर्तुगीजांनी जेव्हा ब्राझिलवर राज्य केले तेव्हा या किल्ल्याचा पोर्तुगीजांना खूप उपयोग झाला असे किल्ल्यातील चित्रांवरून समजले. आता आम्ही किल्ल्यात इतर ठिकाणी फिरत होतो. चालत चालत किल्ल्याच्या टोकाला पोहचलो. हा पॉईंट म्हणजे कोपाकबाना बीचच्या अर्धचंद्राकृती भागाचा शेवटचा बिंदू... इथून डावीकडे पाहिले तर कोपा कबाना बीच आणि परिसर दिसत होता आणि उजवीकडे पाहिजे तर अजून एक सुंदर बीच दिसत होता. हाच तो रिओतील दुसरा प्रसिद्ध 'इपानेमा बीच'. किल्ल्याबाहेर आल्यावर आम्ही इपानेमा बीचकडे जायला सुरुवात केली. इपानेमा बीचचे सौंदर्य जरा अनोखेच...समोर समुद्रात छोटेसे बसके डोंगर, तर

बीचच्या कडेने गेले तर शेवटी उंचच उंच डोंगर. मंत्रमुग्ध होऊन जायला होईल असे सृष्टीसौंदर्य. सुंदर अशी पामची झाडे संपूर्ण बीचच्या बाजूला आहेत आणि जसे कोपाकबाना बीचच्या फूटपाथवर कृष्ण-धवल लाटांचे डिझाईन आहे तसेच पण वेगळे असे कृष्णधवल डिझाईन इपानेमा बीचवर पण आहे.

निसर्ग सौंदर्याच्या बाबतीत इपानेमा बीच कोपाकबाना बीचपेक्षा सरस वाटला. पण बीच ऍक्टिविटीज (खेळणे, पळणे, पाण्यात डुंबणे) यासाठी कोपाकबाना बीच योग्य आहे. इपानमा बीचला फूटपाथपासून समुद्राकडे पाणी तुलनेने जवळ आहे त्यामुळे कमी लोक बीचवर मावू शकतात. मात्र कोपाकबाना बीचला फूटपाथ व समुद्राच्या पाण्यामध्ये खूप अंतर आहे... त्यामुळे उन्हाळ्यात हजारोंनी पर्यटक पांढऱ्यावाळूत खेळून-लोळून आनंद घेऊ शकतात.

इपानेमा बीचवर अनेक तरुण-तरुणी अल्पकपड्यात उन्हात पहूडलेल्या दिसल्या तर समोर पाण्यात खूप पर्यटक सर्फिंग करताना दिसले. आम्ही आईस्क्रीम घेऊन सावलीत बसून एकंदरीत प्रकाराची मजा घेतली. आणि मग हळूहळू बीचवर चालत जायला सुरवात केली. २०-३० मिनीटे चालल्यावर मंडळी थकली आणि टॅक्सी करून आम्ही हॉटेलवर आलो. रात्री जेवण झाल्यावर समुद्रावर फेरफटका मारला.

१ जुलै २०११, माझा ४० वा वाढदिवस! रात्री बाराचा ठोका पडला आणि निवेदिताने 'हॅपी बर्थडे' गाणे म्हणून शुभेच्छा दिल्या. तिने ऑस्टिनवरूनच काडेपेटी, मेणबत्त्या व थोडेफार सजावटीचे सामान आणले होते. हॉटेलमधील त्या छोट्याश्या गोल टेबलावर सजावट करण्यात आली होती. आश्चर्याचा धक्का म्हणजे निवेदिताने तबक-निरांजन पण आणले होते. त्यामुळे लगेचच ओवाळण्यात आले. हा सगळा उत्साह आणि नियोजन बघून मी गलबललो. सकाळी ६.३०-७ वाजता जाग आली. आज वाढदिवस असल्याचे बीचवर फिरायला गेलो नाही. तेवढ्यात सगळेजण जागे झाले. मग परत एकदा 'हॅपी बर्थडे' गाणे आणि शुभेच्छा देण्यात आल्या. थोड्या वेळाने मार्सिलोचा फोन आला. तो स्वतः येणार नसून त्याचा सख्खा भाऊ मार्को येत आहे असे त्याने कळविले. ब्रेकफास्ट करून आम्ही जेव्हा हॉटेल बाहेर आलो तेव्हा मार्को आमची वाट बघत उभा होता. दोघे भाऊ दिसायला बऱ्यापैकी सारखे होते त्यामुळे आम्ही मार्कोला लगेचच ओळखले. आश्चर्याचा धक्का म्हणजे मार्कोचे इंग्रजी मार्सिलोपेक्षा छान होते. आम्ही आनंदाने त्याच्या गाडीत उड्यामारून बसलो आणि आमची रिओ टूर सुरू झाली.

सकाळचे ९ वाजले होते. मात्र रस्त्यावर अजिबात गर्दी नव्हती. गाडी मार्कोने गाडी आता थेट ख्राईस्टच्या पुतळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर वळविली. 'तिजुका' हया रिओतील शहरामध्ये असलेल्या जंगलातून हा रस्ता जातो. अरुंद आणि अनेक वळणावळणाचा हा रस्ता उंचच उंच झाडांमधून कधी 'कॉरकोवाडो' डोंगर चढायला सुरवात करतो ते कळत पण नाही. अंदाजे २००० फूट उंचीवर गेल्यावर मार्कोने गाडी थांबविली आणि आम्हाला सूचना दिल्या. त्याप्रमाणे आम्ही तिकीट काढायला रांगेत उभे राहिलो. तिकीटे काढली आणि एका छोट्या ट्रॉलीमध्ये उभे राहून अजून उंच डोंगरात आम्ही ख्राईस्ट बघायला निघालो. ट्रॉलीतून बाहेर आलो आणि वर पाहिले तर काय? ख्राईस्टचा भव्य पुतळ्याची मागची बाजू. एक सेकंद आम्ही थबकलो. प्रिया माझ्या हातात

होती... आणि मी नकळत 'हा बघ बाप्पा'असे म्हणालो. आज एक दीड वर्षांनी सुद्धा प्रिया जेव्हा जेव्हा हया 'ख्राईस्ट'चे चित्र बघते तेव्हा त्याला 'बाप्पा' म्हणूनच संबोधते. पुढील ३-४ मिनिटात आम्ही पुतळ्याजवळ पोहोचलो. एका उंच चबुतऱ्यावर हा पांढराशुभ्र 'ख्राईस्ट' हात पसरून शांतपणे उभा होता. आम्ही समोरून बराच वेळ हा पुतळा बघत राहिलो. निवेदिताच्या चेहऱ्यावर प्रचंड समाधान दिसत होते. 'याच साठी केला सारा अट्टाहास!'' माझ्या ४०व्या वाढदिवसाला एक आगळीवेगळी भेट मला मिळाली होती. निवेदिताला आणि मंडळींना धन्यवाद म्हणून फोटो सेशन सुरू केले. पर्यटकांची खूप गर्दी झाली होती पण सगळेजण 'भगवंत' भेटी ने आनंदात वावरत होते. आम्ही आता डोंगरावरुन आजुबाजूचे रिओ कसे दिसते ते बघत होतो. बराचवेळ घुटमळून शेवटी निघण्याचे ठरवले, पण पाय निघत नव्हता. मग परत ख्राईस्टकडे बघत फोटो काढत आम्ही ख्राईस्टचा निरोप घेतला. खाली पायथ्याशी आल्यावर टॅक्सीने उरलेली प्रेक्षणियस्थळे बघायला निघालो. यावेळी मार्कोने गाडी दुसऱ्या अरुंद रस्त्याने हाकली.आता आम्ही 'सँटा टेरेसा' या भागातून जात होतो. थोड्या वेळाने पुढे जाऊन मार्कोने गाडी थांबवली आणि आम्हाला सगळ्यांना उतरायला सांगितले. समोर बघताय तर पूर्ण डोंगर एकमेकांना खेटून उभ्या असलेल्या घरांनी भरून गेला होता. आम्ही अवाक होऊन बघू लागलो. मार्को म्हणाला याला 'फावेला' म्हणतात. रिओला जाण्यापूर्वी मी फावेला बद्दल ऐकले होते, पण ख्राईस्ट बघून झाल्यावर थेट फावेला उर्फ रिओची 'धारावी झोपडपट्टी' बघायला मिळेल असे वाटले नव्हते. फावेला हा रिओतील सर्वात धोकादायक भाग म्हणून ओळखला जातो. इतके की याच्या काही भागात पोलिससुद्धा फिरकत नाही. ड्रगची वाहतूक, त्यामुळे होणाऱ्या मारामाऱ्या आणि खून, वगैरे प्रकार येथे नेहमीचेच. ऑलिंपिक जवळ आल्याने ब्राझिलीयन सैन्याने आता इथे साफसफाई अभियान (Clean up operation) करायचे ठरविले आहे असे ऐकले.

या नंतर आम्ही 'माराकाना स्टेडियम' बघायला निघालो. हे स्टेडियम १९५० च्या 'फिफा वर्ल्ड कप' साठी बांधले होते आणि हे आजही दक्षिण अमेरिकेतील सर्वात मोठे स्टेडियम आहे. २०१४ चा 'फिफा वर्ल्ड कप' आणि २०१६ चा 'रिओ ऑलिंपिक्स' उद्घाटन आणि समारोप समारंभ याच स्टेडियममध्ये होणार आहे. त्या नंतर मार्कोने आम्हाला रिओचा जगप्रसिद्ध कार्निव्हल होतो ते स्टेडियम आणि रस्ता दाखवला. दरवर्षी अंदाजे फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात हा सोहळा होतो आणि जवळजवळ २० लाख (२ million) लोक याचा आनंद लुटायला रस्त्यावर उतरतात. नृत्याचे विविध प्रकार वेगवेगळ्या मंडळांकडून इथे सादर केले जातात. थोड्याच वेळेत आम्ही डाऊन टाऊनला पोहोचलो. आजुबाजूला सगळीकडे उंचच उंच इमारती होत्या. अमेरिकेतील कोणत्याही मोठ्या शहरातील डाऊन टाऊनमध्ये आल्यासारखेच वाटत होते. दुपारचे जेवण झाल्यानंतर मार्को आम्हाला डाऊन टाऊन फिरवू लागला. सर्वप्रथम शहरातले प्रसिद्ध असे कॉथिड्रल पाहिले. एखादी बादली उपडी ठेवल्यावर जशी दिसेल तशा प्रकारची ही इमारत वैशिष्ट्यपूर्ण आहे. नंतर जवळच १८ व्या शतकात बांधलेला 'Carioca Aqueduct' पहिला. हा त्या काळी Carioca नदीचे पाणी शहरात आणण्यासाठी बांधलेला पूल होता. सध्या त्या पूलावरून ट्राम जाते. नंतर असेच आजूबाजूच्या गल्ल्यांमध्ये फिरून वेगवेगळ्या इमारती पाहिल्या. मला मुंबईत 'हुतात्मा चौक ते गेट वे ऑफ इंडिया' या भागात फिरत असल्याचा भास होत होता. भारतात जश्या ब्रिटीशकालीन इमारती अजूनही भक्कम अवस्थेत आहेत, तश्याच पोर्तुर्गीजकालीन इमारती येथेही इतिहासाची आठवण करत उभ्या आहेत. अशाच एका इमारतीच्या भिंतीवर चक्क भारतातील एका प्रादेशिक भाषेतील पोस्टर चिटकविलेले दिसले. त्या चित्रात एक भारतीय स्त्री कुंकु लावून आवेशात आणि त्याखाली भगवे झेंडे घेऊन अनेक पुरुष दिसत होते. तसेच पोर्तुगीज भाषेत 'Revolution' भाषांतर होईल असा शब्द आणि काहीसा मजकूर. भारतीय लोक इकडे

येऊन काहीतरी 'क्रांतिकारी' करतायत हे बघून छान वाटले.

शहरातील एक दोन भव्य राजवाडे व चर्चेस बाहेरून बघून आम्ही आमच्या ट्रीपच्या शेवटच्या प्रेक्षणिय स्थळाकडे, शुगरलोफ माऊंटनकडे, निघालो. शुगरलोफ माऊंटनला केबलकारने जावे लागते.२ टप्प्यात प्रवास पूर्ण होतो. पायथ्यापासून पहिल्या केबलकारने 'Urca' पर्वतावर जावे लागते. जशी केबलकार वर निघते तसे रिओचे सुंदर दर्शन सुरु होते. अंदाजे ७०० फूटावर आल्यावर ही केबलकार सोडून नवीन केबलकार ने 'Pao de Acucar' पर्वतावर जावे लागते. जसे आपण अधिक अधिक वर जातो तसे अधिक सुंदर रिओ दर्शन होऊ लागते - आजूबाजूला सुंदर निळशार समुद्र आणि जिकडे तिकडे पसरलेले उंचच उंच डोंगर, पलिकडे डोंगरावर ख्राईस्टचा पुतळा आणि मधे मिळालेल्या जागेत वाढलेले शहर. २-४ मिनिटातच आम्ही १३०० फूट उंचीवर येऊन पोहोचलो. श्वास रोखला जाईल इतके सुंद दृश्य आजूबाजूला दिसत होते. वातावरणात गारवा होता. त्यामुळे छान वाटत होते. या ठिकाणाहून आमचे हॉटेल आणि पूर्ण कोपाकबाना बीच (चंद्रकोरीचा आकार) छान दिसत होते. इथे अर्धा तास काढल्यानंतर आमचा परतीचा प्रवास सुरु झाला. मार्कोचा निरोप घेताना आम्हा सर्वांना खूप वाईट वाटले. गेल्या ६-७ तासात त्याच्याशी खूप गप्पा झाल्या होत्या, त्यामुळे तो जवळच्या मित्रासारखाच वाटत होता.

पुढील २ दिवस आम्ही असेच रिओ आणि परिसर बघण्यात घालवले. सकाळ - संध्याकाळ समुद्रावर होतो हे सांगायला नकोच. ट्रीप च्या शेवटच्या दिवशी हॉटेलच्या कर्मचाऱ्यांबरोबर फोटो काढले. त्या सगळ्यांना टीप्स दिल्या. सगळे कर्मचारी आम्हाला निरोप द्यायला हॉटेल बाहेर आले होते. गेल्या काही दिवसात प्रियाने सर्व कर्मचाऱ्यांची मने जिंकली होती. भारतात जो हळवेपणा जाणवतो तोच आम्हाला इथेही जाणवत होता. आम्हा सगळ्यांचे डोळे पाणावले.

आमची टॅक्सी विमानतळाकडे निघाली आणि आमचे मन भूतकाळात मागे पळू लागले. गेल्या पाच दिवसात पाहिलेल्या गोष्टी आठविल्या. निवेदिताची कोणत्यातरी नवीन ठिकाणी जाऊन माझा वाढदिवस साजरा करण्याची इच्छा पूर्ण झाली होती. ३ जुलैला रात्री आमचे विमान निघाले आणि ४ जुलैला अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनी आम्ही अमेरिकेत सुखरूप पोहचलो आणि आमच्या रिओ-ब्राझिल ट्रीपची सांगता झाली.

****

तर का ?

-विक्रांत फडके

येणे नाही तर का येऊ ?
देणे नाही तर का देऊ?
वागणे नाही तर का वागू?
पाहणेच नाही तर का पाहू?
बोलणे नाही तर का बोलू?
झोपणे नाही तर का जागू?
जेवणे नाही तर का खाऊ?
बघणे नाही तर का बघू?
लिहिणे नाही तरी का लिहू?
विचारच नाही तर अविचार का करू?
रामायण जमणारच नाही तर महाभारत का घडउ ?
अहो विचारांचेच जिथे राज्य आहे तिथे अविचार का करू?
तिथे अविचार का करू? तिथे अविचार का करू?.....

शुभेच्छा

सुहास जोशी

सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा! ही दिवाळी अत्यंत आनंदात जावो, मनःशांती आणि आरोग्यपूर्णता असो. आज माझ्या मनात एक विचार आला कि आपण आवर्जून शुभेच्छा देतो तो प्रघातच पडलेला आहे पण एक सांगू? ह्या सदिच्छा कधी वाया जात नाहीत बरं का. त्या योग्य ठिकाणी पोचतातच आणि सुपरिणामही घडवतातच. दोन छोट्या गोष्टींचा आवर्जून उल्लेख करतो.

मी पूर्वी पुणे जिल्ह्यातील शिरूर- घोडनदी येथे नोकरी करीत होतो. तेथेच एक श्रीमान बापूसाहेब म्हस्कीकर नामक वृद्ध पण अत्यंत उत्साही जणू युवकच असे ते होते. त्यांना संगीताची अतिशय आवड, जणू ते श्री बालगंधर्वांचे शिष्यच शोभून दिसत..त्यां तशा रुक्ष गावांत त्यांनी संगीत आणि नाट्य ह्यांचे मोठे सुरेख वातावरण निर्माण केले होते. सदैव तुरू तुरू चालणारे मोठे गतिमान व्यक्तिमत्व होते ते. मी एकदा सुट्टीत पुण्याला आलो होतो कोणीतरी मला म्हणाले अहो सुहासराव, बापूसाहेब आजारी आहेत.मला काही ते खरे वाटले नाही. वा, काही तरी थापा मारताय; अहो खरंच तर मग मी त्यांना पत्र लिहितो असं म्हणून मी त्यांना खरेच पत्र लिहिले श्री कृसान वि वि ती प्रिय बापूसाहेब, आपण आजारी आहात असं कुणी तरी म्हणालं, पण माझा काही विश्वास बसत नाही. तुम्ही आणि आजारी? शक्यच नाही पण ठीक आहे, आपण जर खरंच आजारी असाल तर लवकरात लवकर खडखडित बरे व्हा माझ्या पूर्ण शुभेच्छा आपला नम्र सु ह जोशी आणि मग पुढे मी शिरूरला आलो आणि रस्त्यातच तुरु तुरु चालणारे बापूसाहेब भेटले नि एकदम हाक मारून म्हणाले, अहो सुहासराव , तुमचं पत्र मिळालं आणि खरोखरच मी आजारी नाही असं मला वाटू लागलं आणि मी खडखडीत बरा झालो की हा शुभेच्छांचा परिणाम हे ऐकून मी थक्कच झालो दुसरी गोष्ट चि. सुनील पोळ नामक एक विद्यार्थी होता त्याला बी. ए. परीक्षेत अतिशय उत्तम गुण मिळाले ; पण अरेरे तो इंग्रजीत अनुतीर्ण झाला होता नि त्यामुळे त्याच्यावर अनुतीर्ण म्हणजे नापास असा शिक्का पडला होता अपयश अधिक वर्ष वाया गेलं म्हणून तो अतीव नाराज झाला. पुढचे चार महिने पूर्ण निराशेत गेले. घोर निराशा! ऑक्टोबर महिन्यात परीक्षा होती. मी आठवणीने त्याला प्रचंड सुयशाच्या विजयाच्या प्रश्नपत्रिका उत्कृष्ट जावो अशा शुभेच्छा पोस्टाने पाठविल्या आता त्याच्या भाषेत पुढचं ऐकूया तो म्हणाला, सर, मी अगदी निराश अवस्थेत परीक्षेला निघालो बाहेर पडलो तेवढ्यात समोर पोस्टमन आणि नेमकं तुमचंच यशाच्या शुभेच्छा देणारं पत्र त्यानं माझ्या हातात ठेवलं आणि सर , काय चमत्कार सांगू? चार महिन्यांची निराशा पार निघून गेली, मन टवटवीत झालं आत्मविश्वास प्राप्त झाला नि काय गंमत सांगू चमत्कार सांगू? अहो मी प्रथम वर्गात उत्तीर्ण झालो हे ऐकून मीही थक्कच झालो. कोणतीच चांगली गोष्ट कधी वाया जात नाही तर , छान!

तर मग सर्वांनाच दिवाळीच्या पूर्ण आनंदाच्या उत्साहाच्या मनःशांतीच्या वैभवाच्या नि आरोग्याच्या समाजसेवेच्या शुभेच्छा !

हमारे गाँधी

-सतिश मोरे

हमारे गाँधी हमारे
गाँधी,राष्ट्रपिता महात्मा गाँधी,

उन्होंने मिटा दी देश की आँधी ,

बापू सबसे न्यारे है,

हम बच्चो को प्यारे है,

अहिंसा उनका शस्त्र था,

अंग्रेजोपर भारी था,

गुलामी को तोड़ दिया,

देश को आज़ाद किया,

फिर एक बार है आई आँधी ,

लौट आ जावो हमारे गाँधी.

हमारे गाँधी, हमारे गाँधी.

****

मागील अंकात मी "मैत्री" ही कविता लिहिली होती ,
पण माझ्या जिवलग मैत्रिणीला मराठी समजत
नसल्याने ह्या कवितेचा हिन्दी अनुवाद.

-लीना मोरे

दोस्त

कहते है दोस्त ऐसे होते है, दोस्त वैसे होते है,

जरा हमसे पुछो दोस्त कैसे होते है.

अँधेरेमें ज्योति होते है ,

सिप के अनमोल मोती होते है

तपती रेत मे नेहर होते है,

दोपहरमें हवा की लेहेर होते है

धूपमें पेड़ की छाव होते है,

लम्बी डगर पे आपके पाँव होते है

दुःख मे माँ का आँचल होते है,

सुख में खूशी का बादल होते है

ऐसे दोस्तों का जिसे साथ होता है,

सिर पे उसके खुदा का हाथ होता है

क्या कहु कैसे कहू ,

अल्फाज़ पड़ते है कम,

किसी मोड़ पर वो बिछड़ न जाये,

यही सदा रहता ही गम

****

होममेड व्हेकेशन

-निषाद कान्हेरे

२८ एप्रिल २०१२, शनिवार.

जणु काही दिवाळी किंवा मोठ्ठा सण असवा तशी आम्ही दोघांनी घराची साफ़सफ़ाई केली होती. नुसती त्या दिवशीच नव्हे तर दिप्ती त्या मागचा अख्खा आठवडाच कामाला लागली होती. तिची तय्यारी नेहमीच अगदी जय्यत असते. पण हे सगळं कशासाठी सुरु होतं. सुयोगची "वा गुरु" ह्या नाटकाची टीम ह्युस्टन मध्ये येणार होती त्या शनिवारच्या रात्री. ते सगळे डॅलसवरुन शनिवारचा प्रयोग आटपुन ह्युस्टनमध्ये दाखल होणार होते. आम्हाला दोघांनाही खुपच उत्सुकता होती त्यांचं स्वागत करायची. आम्ही दोघेही त्या रात्री मुलं झोपल्यावर बाहेरच्या हॉलमध्ये बसुन गप्पा मारत होतो. दिप्ती त्यांच्याशी कायम फ़ोनवरुन अपडेटेड होती. आता अर्ध्या तासाच्या अंतरावर आले, वगैरे वगैरे. आणि अखेर मध्यरात्रीच्या १२:१० वाजता त्यांची व्हॅन आमच्या अपार्टमेंटमध्ये पोहोचली. आम्ही दोघेही बाहेर गेलो. व्हॅनमध्ये लेडी ड्रायव्हर धरुन एकुण ९ जण होते. डॅलस-ह्युस्टन हा साधारणत: ४ ते ५ तासाचा ड्राइव्ह आहे. आणि आधी १ प्रयोग करुन लगेच एव्हढा प्रवास त्यामुळे सगळेजण जणु फ़ुलं जशी दर रात्री कोमेजावीत तसे कोमेजलेले दिसत होते. फ़ुलं ह्यासाठी म्हटलं कारण हे कलाकार नेहमीच आपल्या समोर टवटवीत होवून येत असतात.

कलाकारांमध्ये दिलीप प्रभावळकर, गिरिजा काटदरे, पूर्णिमा तळवळकर, अद्वैत दादरकर होते. नाटकाचे दिग्दर्शक विजय केंकरे आणि बॅकस्टेजचे प्रकाश खोत, किशोर इंगळे आणि जितेंद्र पाटील असे होते. आधी ठरल्याप्रमाणे अद्वैत आणि ३ जण बॅकस्टेजचे आमच्या घरी उतरणार होते. दिलीप प्रभावळकर आणि विजय केंकरे राम वाटवे च्या घरी आणि गिरिजा काटदरे, पूर्णिमा तळवळकर अनिल गोखल्यांच्या घरी उतरणार होते. पहिला हॉल्ट आमच्याकडे होता, अद्वैत आणि बाकीजणांनी त्यांचं सामान आमच्या घरी ठेवले. पण एक अडचण अशी होती की हे सगळे इकडे उतरल्यावर राम कडे अख्खा सेट उतरवताना मनुष्यबळ तितकसं नव्हतं, मग मी आमच्या गाडीतुन ह्या ४ जणांना राम च्या घरी घेवून गेलो. सगळ्यांच्या मदतीने सेट सेफ़ली उतरवला. आणि मग सगळ्यांचा निरोप घेवून आम्ही आमच्या घरी आलो मध्यरात्री च्या साधारणपणे १ वाजता. दिप्तीने अति उत्साहाच्या भरात ह्या सगळ्यांसाठी त्यांना न विचारताच प्रवासाचा क्षीण निघुन जावा म्हणुन पिठलं भात केला होता. पण एव्हढ्या रात्री सगळ्यांनी लवकरात लवकर झोपणं पसंत केलं. म्हणजे उपाशी नव्हते ते, मस्तपैकी कुठेतरी मध्ये प्रवासात थांबुन हवं ते नॉन-व्हेज खायला मिळालं होतं त्यांना, मग त्यावर पिठलं भात कसं काय? त्यांना मग त्यांच्या गाद्या, पांघरुणं, चादरी देवून, लाईट्स, बाथरुम च्या सुचना करुन आम्हीही झोपायला गेलो.

२९ एप्रिल २०१२, रविवार.

सकाळी मी पावणे सातच्या सुमारास उठलो. सगळेजण गाढ झोपलेले होते. दिप्तीही मग ७ वाजेपर्यंत उठली आणि आवरुन कामाला लागली. तिने आठवड्या अगोदर नाश्ता, दुपारचं जेवण, रात्रीचं जेवण असं प्रत्येक दिवसाचं श्येड्युल लिहुन किचनच्या भिंतीवर पिन-अप केलं होतं. ही सगळी टीम नाटकांतरचे पुढचे २ १/२ दिवस पाहुणचार घेणार होती, त्यासाठी हे दिप्तीचं किचनमधलं श्येड्युल होतं. त्या दिवशी नाश्त्याला इडली-चटणी होती. ८:३० पर्यंत एक एक करुन सगळे जण उठले. उठले म्हणजे काय स्वत:हुन नाहीच, आमच्याकडे त्यांना उठवायला २ जोकर्स होते ना. आयुष आमचा मोठ्ठा मुलगा आणि आदिश छोटा. त्या चंगु-मंगुनी सगळ्यांना उठवलं आणि ५ मि.त त्यांची गट्टीही जमली सगळ्यांशी. अद्वैत आणि जितेंद्र पाटील (जितु) आम्हाला आधीपासुन चांगलेच परिचयाचे होते. अद्वैतला मी आमच्या लहानपणापासुन ओळखत होतो, त्याचा भाऊ ओंकार दादरकर आणि मी, आमची सांगीतिक मैत्री होती, त्याचे आई वडील आणि माझे आई वडील चांगले सांगीतिक मित्र. त्यामुळे आम्ही तसे एकमेकांना चांगलेच परिचयाचे होतो. दिप्ती आणि

अद्वैतने पूर्वी एकत्र अनेक संगीत नाटकांत कामं केलेली होती. त्यामुळे ते दोघेही उत्तम मित्र होते. शिवाय तिने सुयोगच्या २-३ नाटकांत कामं केल्यामुळे जितुशी चांगली ओळख होती. किशोर आणि प्रकाश आम्हाला आणि त्यांना आम्ही नवीन होतो. त्यामुळे १ स्वाभाविक जो संकोच असतो सुरुवातीचे १-२ तास तसा तो होता. आमची मुलं निरागसपणे तो संकोच कमी करण्यात हातभार लावत होती. आम्हाला कुठल्या ना कुठल्या कारणांनी भारतात जाता येत नसल्याने, आपल्या घरी एव्हढे पाहुणे अचानक बघुन मुलंही खुपच खुश होती. त्या दोघांनाही त्यांचे भाव मांडता येत नसले तरी ते किती खुश होते ते आम्हाला जाणवत होतो. लगेच मग सगळ्यांची मुलांशी गट्टी जमली. नाश्ता-पाणी झाल्यावर अंघोळीच्या आधी तर अद्वैत चक्क दोन्ही मुलांशी घरातच त्यांच्या वयाचा असल्यासारखा खेळायला लागला. आम्हाला दोघांना मात्र त्या दिवशी वेळेचं भान ठेवणं आवश्यक असल्याने आम्ही त्या सगळ्यांना पटापट आवरायला सांगितलं. दिप्तीने अगदी साग्रसंगीत जेवणाचा प्लॅन आखला होता. म्हणजे अगदी श्रीखंड होतं गोड्धोड म्हणुन. तसं श्रीखंड मीच केलं होतं, अहो काय विशेष नाही त्यात. घरात एग-बीटर असला ना की सगळं सोप्पं आहे चक्का फ़ेटणं. पाहुण्यांसाठी दिप्तीच्या मैत्रिणीकडुन स्पेशल चिकन-मसाला येणार होतं. आम्ही घास-फ़ुस वाले (व्हेजीटेरियन) असल्यामुळे आम्हाला भेंडी मसाल्याची भाजी आणि सोल-कढी होती. नाटक दुपारचं असल्याने सगळे जरा बेतानेच जेवले. मला त्या सगळ्यांना बरोबर दुपारी १२:३० पर्यंत राम च्या घरी नेणं भाग होतं. ह्युस्टनमधला त्यांचा शो ३:३० चा होता. १ वाजेपर्यंत आम्ही सगळे राम च्या घरुन बेरी सेंटरला पोहोचलो. राम च्या घराहुन बेरी सेंटर अगदीच जवळ होतं. स्टेजचा ताबा मिळाल्या मिळाल्या किशोर, जितु आणि प्रकाश कामाला लागले सेट उभारायच्या. मराठी मंडळाचे कमिटीतले आणि बरेच उत्साही लोक तिकडे मदतीला आले होते. आश्चर्य म्हणजे तो सेट उभारायला नाटकातले कलाकार सुद्धा मदत करत होते. १ ते १ १/२ तासात अख्खा सेट उभा राहिला. बेरी सेंटरचं स्टेज आणि ऑडिटोरियम खुपच अप्रतिम होते. मुंबईतल्या चांगल्या थियेटरची आठवण होत होती. तिकडे घरी दिप्तीने मुलांची आवरण्याची जबाबदारी घेतली होती. ह्या वेळेस पहिल्यांदाच आम्ही आदिशला बेबी सिटींगला सलग ५-६ तास ठेवणार होतो, जेणेकरुन आम्हाला दोघांना नाटक बघता आलं असतं. बेबी सिटींग पण कोण हो तर आमची चांगलीच ओळखीची सई बापट, अचला आणि चंद्रहास बापट ह्यांची मोठी मुलगी. ते आमचे चांगलेच फ़ॅमिली फ्रेंड आहेत. सईने हे बेबी सिटींग नुकतंच प्रोफ़ेशनली सुरु केल्याने आम्ही निर्धास्त झालो होतो. तरीही आदिश आणि सई एकमेकांना तसे ५-६ तासांसाठी नवीनच. ह्या आधी नेहमीच आम्ही आलटुन पालटुन कार्यक्रम बघत आलो होतो. जास्त वेळेस मीच शास्त्रीय संगीताच्या मैफ़लींना जात असतो. केवळ दिप्ती मुळे मला हे इकडे शक्य होतं. नाहीतर खुपच कठीण आहे मुलांची सोय करुन असं काही एन्जॉय करणं. पण ह्या वेळेला दिप्तीने ठरवलंच होतं की नाटक दोघांनी दुसरया रांगेत बसुन बघायचं. कित्ती वर्षांनी हा योग जुळुन आला होता. मनात थोडीशी धास्ती होती की जर आयत्या वेळेस सई चा फ़ोन आलाच तर मी जाणार होतो नाटक सोडुन. बरयाच वर्षांनी दिप्तीला नाटक ह्या विषयात राहायला मिळणार होतं, त्यामुळे तिची उत्सुकता स्वाभाविकपणे माझ्याहुन कईक पटीने जास्त होती, आणि म्हणुनच आम्ही हा निर्णय घेतला होता. दुसरया रांगेत अगदी स्टेजच्या सेंटरला मी २ सीट्स अडवून ठेवल्या होत्या. नाटक सुरु होईपर्यंत आम्ही दोघेही मागेच ग्रीन रुम मध्ये कलाकारांना काय हवं नको ते बघत होतो. मंडळाची माणसं होतीच हे सगळं व्यवस्थित करायला, पण दिप्तीला सगळे चांगलं ओळखत असल्याने ती हक्काची मदतनीस वाटत होती सगळ्यांना. त्यात मग आम्ही दोघांनी दिलीप काकांबरोबर २-३ फ़ोटोज काढुन घेतले. दिलीप काका एव्हढे चांगले आहेत मनाने की ते स्वत: म्हणाले की १ अजुन जरा क्लोज-अप मध्ये काढ. त्यांच्या त्या दिवसातला तो पहिला फ़ोटो असावा, त्यांना काय माहीत होतं की नाटकानंतर लोक त्यांचे

एव्हढे फ़ोटो काढुन त्यांना बेजार करणार होते ते. तिसरी घंटा झाली आणि आम्ही दोघांनी आमची सीट पकडली. प्रेक्षकवर्ग येवून बसुन तोपर्यंत सेटल झाला होता. अनाउंसमेंट झाली, ऑडिटोरियममधले लाइट्स बंद झाले आणि अनाहुतपणे आम्ही दोघांनी हात हातात धरला. मला अचानक मी मुंबईतल्या पार्ल्याच्या दीनानाथ हॉल किंवा बोरिवलीच्या ठाकरे मध्ये नाटक बघतोय की काय असंच वाटलं. मी आणि दिप्तीने पूर्वी खुप नाटकं बघितली होती मुंबईत. त्यावेळेच्या सगळ्या आठवणी सरकन त्या अंधारतही मनातुन धावत गेल्या आणि सुपर योगायोगाने आम्ही दोघांनी त्या अंधारात एकमेकांकडे बघितलं. तेव्हा त्या अंधारात आमच्या लुकलुकत्या डोळ्यांनी एकमेकांना ती आठवण सांगितल्याचे भाव आमच्या चेहरयावर होते. आम्ही दोघे खुपच खुश होतो.

नाटक खुपच अप्रतिम होतं. मी वास्तविक अद्वैतचं काम अगदी पहिल्यांदाच बघत होतो आणि तेही एव्हढ्या जवळुन. "जावई माझा भला" मधला त्याचा अभिनय मी बघितला होता पण ते टी. व्ही. वर, प्रत्यक्षात नाही. सगळ्यांनी उत्तम कामं केली नाटकात. मध्यंतरात पुन्हा आम्ही दोघेही मागेच ग्रीन रुममध्ये. तिथल्या गमतीदार गप्पा ऐकत होतो. मी नेहमीच बघितलंय की कलाकारांना कुठल्याही प्रयोगाच्या मध्यंतराच्या वेळेस कुठले तरी विनोदी प्रसंग, अनुभव आठवतात आणि मग ते तिकडे सांगत असतात. ते ऐकायला खुपच मज्जा येत होती. दिलीप काकांनी सुद्धा १-२ किस्से सांगितले. मध्यंतर संपला, मी जास्त टेंशन मध्ये होतो कारण समजा आदिशसाठी फ़ोन आलाच तर मला एव्हढं चांगलं नाटक सोडुन जावं लागणार होतं. नाटक संपलं, मंडळाने सर्वांचे आभार मानले. विजय काकांनी सर्व कलाकारांची ओळख करुन दिली. आश्चर्य म्हणजे अद्वैतचं नांव घेतलं तेव्हा प्रेक्षकांमधुन शिट्ट्या आल्या, सगळ्यात मोठी पावती होती ती अद्वैतच्या कामासाठी ह्युस्टन च्या प्रेक्षकांकडुन. अपेक्षेप्रमाणे सगळे सोपस्कार झाल्यावर सर्वांनी कलाकारांभोवती गराडा घातला होता. दिलीप काका तर अगदी त्या सगळ्यांत हरवुन गेले होते. नशीब की ते चांगलेच उंच असल्याने त्या गर्दीतुनही ते कुठुनही दिसत होते. नाटकानंतरचा हा कार्यक्रम तब्बल १ तास तरी चालला. मी मंगळवार आणि बुधवार ऑफ़िसला जाणार नव्हतो. पण नाटक झालं, नाटकानंतरचा तो सगळा माहोल बघितला आणि तेव्हाच सोमवारी सुद्धा सुट्टी घ्यायची हे मनाने अगदी पक्क केलं. दिप्तीला ते मी रात्री नेहमीप्रमाणे उशीरा संगितलं. ती खुपच खुश झाली.

नाटकानंतर सगळ्यांनी राम कडे डिनरला भेटायचं ठरलं होतं. मुलांना सई कडुन राम कडे आणण्याची जबाबदारी माझ्यावर होती प्लॅन प्रमाणे. मी तडक बापटांच्या घरी निघालो. दोन्ही मुलांनी खुप को-ऑपरेट केलं होतं. मी पोहोचेस्तोवर आदिश झोपून उठला होता आणि आमच्या दोघांची वाट बघत सई च्या पोटावर झोपला होता. त्याचे डोळे आम्हा दोघांपैकी एकाचा तरी चेहरा कधीही बघायला मिळेल या आतुरतेने दरवाज्याकडे लागले होते. मी पोहोचेपर्यंत तो शांत होता, मी तिकडे पोहोचताच तो अगदी हापसा-हापशी रडायला लागला. मी त्याला जवळ घेतलं आणि पाठीवरुन हात फ़िरवला. माझी ती शाबासकीच होती त्याला, कारण त्या दिवशी त्याने खुपच मोठ्ठं काम केलं होतं आमच्या दोघांच्या दृष्टीने. आयुष चांगलाच स्वतंत्र झाल्याने त्याचा काहीच त्रास नव्हता. दोघांचे कपडे बदलुन, सईचे मनापासुन आभार मानुन मी दोघांना घेवून राम कडे आलो.

राम च्या घरी नुसती झुंबड होती तेव्हा. आदिश आणि दिप्ती, माय लेक भेटले ५-६ तासांनी. दोघेही रडले भरपुर. आदिश मोकळा झाला, स्वतःचं कौतुक करायला लोकांमध्ये मिसळला. पूर्णिमाने दोघांना बघितल्यावर बरेच फ़ोटो काढले. आदिश, रुही (रामची धाकटी मुलगी) हे मग कलाकारांसाठी सेलिब्रिटी ठरले होते. त्यांना कडेवर घेतलं जात होतं, फ़ोटो काढले जात होते, शुटींग होत होतं. आयुष मात्र त्याच्या वयाचं तिकडे कोणी नसल्याने अगदी एकटा पडला होता. रामचा मोठा मुलगा रोहिल घरी आला नव्हता, म्हणुन आयुषचा अपेक्षाभंग झाला होता. मी ते जाणलं होतं पण एव्हढी गडबड होती की मी "रोहिल लवकरच येईल" हे आश्वासन देण्यापलीकडे काही करु शकत

नव्हतो. त्यात अद्वैत नाटकानंतर त्याच्या ओळखीच्यांबरोबर थोडा बाहेर गेल्यामुळे आयुषला तोही दिसत नव्हता. इकडे डिनर, गप्पा, धम्माल, फ़ोटो सेशन, शुटींग चालुच होतं. मागे रामने हळु आवाजात शास्त्रीय संगीत लावलं होतं. मधुनच कधी गोंगाट कमी झाला की ते ऐकु येत होतं. थोड्यावेळाने अद्वैतची एंट्री झाली. एव्हढ्या गडबडीत कोणला कळालंच नाही तो आल्याचं. आयुषने मात्र अचानक त्याला जाऊन मिठीच मारली. त्या गडबडीत, गोंधळात सुद्धा माझ्या नजरेने ते दृश्य अचुक हेरलं होतं. आम्ही भावंडं लहानपणी आमचा मामा आल्यावर ज्या प्रकारे धावत जात असु तसा तो धावत जाऊन बिलगला होता. आयुषला त्या वेळेला त्याच्या वयाचं कोणीतरी आल्यासारखं वाटलं होतं. तो सहसा इतका फ्रेंडली होत नाही पटकन कोणाशी, पण सकाळी अद्वैत घरात मुलांबरोबर खुप फ़ुटबॉल खेळला होता, त्यामुळे अद्वैतला बघुन आयुषला तो आपल्या जवळचा असल्यासारखा वाटला असावा. त्यावेळेस माझ्या मनात विचार आला की मी अमेरिकेत राहायचा निर्णय घेतलाय तो बरोबर तर आहे ना? आयुष आणि आदिश अनवधानाने त्यांच्या एकुलत्या एक सख्ख्या मामापासुन दुर तर जात नाही आहेत ना? त्यांना मामाचं प्रेम भरपुर मिळायलाच हवं. त्यांचा मामा सुद्धा खुपच प्रेमळ आहे.

एकीकडे फ़ोटोसेशन, शुटींग चालुच होतं. सगळेजण अगदी हावरटासारखे, कधीच मिळणार नाहीत म्हणुन ओरबाडुन घ्यावेत असे फ़ोटो काढुन घेत होते, त्यात आम्हीही आलोच. दिलीप काका तर अगदी केविलवाणे दिसत होते पण एकदाही कोणाला फ़ोटोवरुन हिरमुसलं केलं नाही. खरंच खुपच साधे आणि मनाने चांगले आहेत ते.

मध्येच विजय काकांना मी वॉल-मार्टला घेवून गेलो. त्यांना पुढच्या प्रयोगाआधी नवीन खुर्ची हवी होती नाटकातली. तिकडे एक अर्धा तास गेला असेल आमचा. त्या छोट्याशा प्रवासात विजय काकांशी नाटकाविषयी खुप गप्पा मारता आल्या. मग आम्ही परतलो.

११ वाजले होते तोपर्यंत. मुलं खेळुन एव्हढी दमली होती की वॉकमन मधली बॅटरी डाउन होताना कसा आवाज येतो तसं काहीसं बोलत होती. बाकी बरेचजण आपापले आवडीचे फ़ोटो काढुन घरी परतत होते. फ़ेसबुक ह्या ताज्या फ़ोटोंच्या प्रतीक्षेत होतं, कारण हे ताजे फ़ोटो दुसरया दिवशीपर्यंत फ़ेसबुकवर पडणार होते. आम्ही ही निघायची तयारी केली. तिथुन येताना आमच्या बरोबर अद्वैत, किशोर आणि प्रकाश होते. जितु त्याच्या भावाबरोबर नाटक संपल्या संपल्याच अदृश्य झाला होता. तो एकदम बुधवारी एअरपोर्ट ला उगवणार होता.

रात्री ११:३० पर्यंत आम्ही घरी आलो. मुलांनी सुद्धा त्या दिवशी पुढे अर्धा तास घेतला झोपायला. मुलांचं सुद्धा आपल्यासारखंच असतं, कोणी घरी पाहुणे आले की त्यांना खेळायचं असतं, झोपायचं नसतं लवकर. किशोर आणि प्रकाश नी मग निवांत सकाळच्या उरलेल्या चिकन मसाल्यावर ताव मारला. राम कडे सगळं व्हेजीटेरियन मेनु होता त्यामुळे त्या दोघांनी तेव्हढी भुक शिल्लक ठेवली होती असं त्यांनी आम्हाला सांगितलं, त्यात मागे चालु असलेल्या शास्त्रीय संगीतामुळे देखील थोडं कमीच गेलं जेवण त्यांना. मी पुढे अर्धा तास ह्या तिघांबरोबर जरा टाइमपास गप्पा मारुन, दुसरया दिवशीचा प्लॅन सांगुन झोपायला गेलो.

३० एप्रिल २०१२, सोमवार.

सकाळी मी ७ वाजता उठलो. आदल्या रात्री मला अद्वैतने बजावल्याप्रमणे त्याला मी लगेच उठवलं. त्याला जिम मध्ये जायचं होतं एक्सरसाइज करायला. त्याचा हा पहिला अमेरिका दौरा असल्यामुळे तो खुपच एक्साइटेड होता. त्याला सगळ्या गोष्टींची मज्जा घ्यायची होती. जिम ला जाण्यापूर्वी आम्ही बाहेर पॅटिओ (बाल्कनी) मध्ये गप्पा मारायला आलो. गप्पा मारायचं कारण म्हणजे त्याला सिगारेट ओढायची होती. मग त्या संधीचा फ़ायदा घेवून मी जे काही नवीन विनोदी लिहायला सुरुवात केली आहे त्याबद्दल मार्गदर्शन करायला त्याला विचारलं. अद्वैत नाट्यशास्त्राचा रितसर पदवीधर आहे, उत्तम दिग्दर्शक, उत्तम आभिनेता असल्यामुळे मला त्याच्या

टीप्स चा नक्कीच फ़ायदा होणार होता. आम्ही बराच वेळ गप्पा मारल्या. मध्येच चहाचे २ कप आतुन बाहेर सरकले. तेव्हा दिप्ती उठल्याचं कळालं. ती नेहमी प्रमाणे तिचं किचन शेड्युल पाळायला लागली. मी आणि अद्वैत जिममध्ये गेलो. १ तास चांगला एक्सरसाइज झाला. मग त्याला अपार्टमेंट कॉम्प्लेक्स दाखवलं. त्याला स्विमींग पुल दाखवल्यावर लगेच उतरायचीच इच्छा झाली पण मी त्याला कंट्रोल करायला भाग पाडलं आणि घरी आणलं. नाश्त्याला साबुदाण्याची खिचडी होती, जेवायला तिच्या मैत्रीणीकडुन पाहुण्यांसाठी फ़िश-करी येणार होती. पाहुणे दुसरया दिवशीही खुश होते. सकाळचा बाहेर पडायचा काही विशेष प्लॅन नव्हता. अद्वैत त्याच्या एका ओळखीच्या मावशीकडे जेवायला आणि मग कुठे तरी फ़ार्महाउसला जाणार होता. तो संध्याकाळी परत आल्यावर सगळे फ़ॅक्टरी आउटलेटला जाणार होतो. संध्याकाळी ५ ला निघुया असं मी अद्वैतला जाताना सांगितलं, म्हणजे त्याप्रमाणे मावशीला प्लॅन करता येणार होता.

अद्वैत गेल्यावर बाहेरची १-२ कामं संपवून मी घरी आलो. हातात २ तास होते आउटलेटला निघण्यापूर्वी. किशोर आणि प्रकाश खुपच छान आमच्यात मिसळुन गेले होते. एकमेकांमधला परकेपणा साफ़ विरला होता. मग एकदम विचार आला आमच्या दोघांच्या मनात आणि लगेच राम कडे फ़ोन लावला. विजय काकांना फ़ॅक्टरी आउटलेटला येणायाबद्दल विचारलं, त्यांना कल्पना आवडली. मग मी त्यांना लगेच रामकडे घ्यायला गेलो. आम्हाला त्यांना आमच्या घरी घेवून यायचं होतं. विजय काका घरी आले, आल्या आल्या दिप्तीला हक्काने "माझ्यासाठी चहा कर" असं म्हणाले, आम्हा दोघांनाही खुप बरं वाटलं. आम्ही १ १/२ तास खुप गप्पा मारल्या. खुप मोकळे आहेत ते बोलायला. खरंतर त्यांना बोलायला खुपच आवडतं. मग ते अगदी कुठल्याही विषयावर सुरु होतात. निघताना दिप्तीने सगळ्यांसाठी स्ट्रॉबेरी डेझर्ट केलं होतं. सगळ्यांना खुपच आवडलं. विजय काका हाफ़ पँटमध्ये आले होते आणि तेही खाकी रंगाच्या. किशोर आणि प्रकाश नी त्यांना ती बदलायची सुचवलं. मग त्यांनी १ आयडिया केली. आत गेले आणि उलटी घालुन आले. आतल्या बाजुला वेगळा रंग होता. वेगळा म्हणजे एकदम कॉमिक रंग होता, पण ते बिनधास्त असल्यामुळे त्यांना काही त्याचं विशेष वाटत नव्हतं.

आम्ही मग फ़ॅक्टरी आउटलेटला जायला निघालो. अद्वैत काही तोपर्यंत पोहोचला नव्हता. त्याला फ़ोन करुन मध्ये कुठेतरी भेटायचं ठरलं. त्याचे मावशी आणि काका त्याला सोडायला आले होते. आमच्या गाडीत मग आम्ही सगळे जमलो एकदाचे तिकडे जायला. आयुष सुद्धा आमच्याबरोबर आला. विजय काकांना श्लॉटझकी फ़ुड आउटलेट खुप आवडतं. मग काय गाडी शिरली श्लॉटझकी मध्ये. आयुषसाठी १ पिझ्झा आणि काकांनी त्यांचं फ़ेवरेट बर्गर घेतलं. तिथुन फ़ॅक्टरी आउटलेटचा ड्राइव्ह २० मि. चा होता. सगळ्यांना आवडलं ते, खुपच मोठ्ठं होतं ते. १-२ तास तिकडे नक्कीच कमी पडणार होते. अद्वैतने तिकडे बरयापैकी शॉपींग केलं. काकांनी १ टोपी घेतली प्युमा कंपनी ची. २ तास तरी गेलेच ह्या सगळ्यात. विजय काकांना मला रात्री राम कडे सोडणं भाग होतं. त्यांना कोणाकडे तरी डिनरला जायचं होतं. त्यांना सोडल्यावर आम्ही उरलेलो घरी आलो. येताना डॉमिनोज चा पिझ्झा घेवून आलो. रात्री मी आणि अद्वैत चा स्पोर्टस बार मध्ये जायचा प्लॅन होता. त्यामुळे तो अजुनच एक्साइटेड होता. मी बियर किंवा हार्ड ड्रिंक्स घेणार नाही हे सांगितल्यावर तो वैतागला. मी त्याला मी ह्या वर्षी तरी पाळणार आहे असं म्हटलं. तो म्हणाला मे महिन्यात नवीन वर्ष उजाडणार आहे ह्या वर्षी. मला खुप हसु आलं त्याचं. मग आम्ही जवळच टी.जी.आय.एफ़. ला गेलो. त्याने २ बियर घेतल्या. मी १ स्ट्रॉबेरी-लेमनेड घेतलं. आम्ही खुप गप्पा मारल्या. मी नुकतंच थोडंफ़ार लिहायला लागल्याने ह्या फ़िल्डबद्दल मला खुप काही जाणुन घ्यायचं होतं. मी माझ्या बरयाच प्रश्नांचं त्याच्याकडुन शंकानिरसन करुन घेतलं. तो सुद्धा मस्त आहे बोलयला. मोकळा आहे खुप मनाने, राखुन काही बोलत नव्हता. साधारणत: १२ वाजता रात्री आम्ही घरी परतलो. किशोर आणि प्रकाश हिंदी पिक्चर बघत होते. त्या

सगळ्यांना दुसरया दिवशीचा प्लॅन सांगुन मी झोपायला गेलो.

१ मे २०१२, मंगळवार.

सकाळी लवकर उठुन, आवरुन आम्हाला सगळ्यांना नासा ला निघायचं होतं. नासा म्हणजे ह्युस्टनचं स्पेस सेंटर. आमच्या घरुन १ तासाच्या ड्राइव्ह वर आहे ते सेंटर. सकाळी बरोबर १० वाजेपर्यंत निघुन ११ पर्यंत पोहोचायचा प्लॅन होता. आमच्या गाडीत आमच्याकडचे पाहुणे तर छाया फ़ातर्पेकर हिच्या गाडीत विजय काका, गिरिजा ताई आणि पूर्णिमा येणार होते. दिलीप काका अनेक वेळा अमेरिकेत येत असतात, तेव्हा असंच केव्हातरी मागच्या दौरयावर असताना त्यांनी नासा बघितलं होतं. ते आदल्या दिवशी त्यांच्या मित्राकडे क्लिअरलेकला गेले होते. क्लिअरलेक हे नासा च्या जवळ असल्याने येताना छाया त्यांना घेवून येणार होती. असा सगळा दिवसभराचा प्लॅन होता.

दिप्तीच्या किचन श्येड्युल प्रमाणे दमदार थालीपीठं खाऊन आम्ही निघालो. आयुष ला उशीरा शाळेत सोडुन आम्ही नासा च्या वाटेवर लागलो. वीकडे असल्याने आम्हाला एच.ओ.व्ही. स्पेशल फ़ास्ट लेन चा वापर करता येणार होता. एच.ओ.व्ही. म्हणजे हाय ऑक्युपन्सी व्हेइकल, म्हणजेच २ किंवा २ पेक्षा जास्त लोक गाडीत असतील तर ती लेन वापरता येते. त्या लेनमध्ये शिरल्यावर आजुबाजुचं तुंबलेलं ट्राफ़िक बघायला मज्जा येत होती सगळ्यांना. ११:१५ च्या सुमारास आम्ही नासा च्या प्रवेशद्वारापाशी आलो. नासा चा प्रचंड मोठ्ठा पार्कींग लॉट बघुन सगळ्यांना तो दादरच्या शिवाजी पार्काएव्हढा वाटला होता. आम्ही गेटवर फ़ोटो काढतच होतो तेव्हढ्यात छायाची गाडी आली. सगळ्यांची जमवाजमव झाल्यावर आम्ही तिकीटं काढुन आत शिरलो. मी ह्या अगोदर २ वेळा नासा बघितल्याने मी त्यांचा गाइड होतो.

सुरुवातीलाच ट्राम-टुर पूर्ण करायचं आम्ही ठरवलं. त्याआधी तिकडे १ ग्रुप फ़ोटो काढुन घेतला. ट्राम आल्यावर पहिल्यांदा आम्ही ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफ़िसला गेलो. तिकडे अर्ध्या तासाची माहिती होती. बिच्चारया पाहुण्यांना त्यातलं एक तरी अक्षर कळालं असेल की नाही कुणास ठाउक. त्यांना इंग्लीश येत नव्हतं हा भाग नव्हता तर इथले ॲक्सेंट्स आणि इथला बोलायचा स्पीड, त्यामुळे त्यांना वाक्य पटापट पकडणं अवघड जात होतं. तिथुन आम्ही पुन्हा ट्राम मध्ये आलो. ट्राममध्ये बसल्यावर ह्या सगळ्यांच्या चेहरयावरचे भाव एव्हढे केविलवाणे होते. त्यांना तो पर्यंत अंदाज आला होता की आज आपला अण्णा होणार आहे दिवसभर. हे दिप्तीने त्यांच्या चेहरयावर वाचलं होतं आणि मग तीही टेंशन मध्ये आली. ह्या पाहुण्यांना दिवसभर एंटरटेन करणं ही आमची जबाबदारी असल्याने तिला टेंशन आलं होतं. ती लगेच दुसरे नासा व्यतीरिक्त ऑप्शन्स विचार करायला लागली. अचानक दुसरा प्लॅन करणं प्रॅक्टीकल नसल्याने सगळ्यांनी तिला असं भासवलं की खरंच छान आहे सगळं. तिथुन आम्ही एका डमी ठेवलेलं स्पेस शटल बघायला गेलो. ते अतिभव्य शटल बघुन जरा पाहुणे खुश झाले. अनेक प्रकारचे फ़ोटोज निघाले तिकडे. तिथुन मग आम्ही टर्मिनलला आलो. ह्या सगळ्यात विजय काका मात्र सतत आपलं ज्ञान दानाचं पवित्र काम करतच होते. अखंड वेळ त्यांना जी काही वेगवेगळी माहिती होती ती ते आम्हा सगळ्यांना पुरवत होते. सकाळपासुन अद्वैतला सिगारेट प्यायची संधी न मिळाल्यामुळे तो वैतागला होता. टर्मिनलला येताना स्मोकींग झोन चा बोर्ड त्याच्या नजरेने वेधला आणि त्याने गाडीतुन उडी मारुन आधी झुरके मारत तृप्त झाला. चेहरा त्याचा हळु हळु खुलायला लागला.

१ वाजला होता. आम्ही सगळे कँटीनकडे वळलो. मनसोक्त जेवलो आणि पुढच्या शो साठी निघालो. शो ची सुरुवात छान झाली पण मग मोठ्ठ्या ऑडिटोरियम मध्ये दुपारच्या जेवणानंतर अर्धा तास थियरी लेक्चर पचवणं महाकाय गोष्ट होती पाहुण्यांसाठी. मी एक एक करुन सगळ्यांकडे नजर फ़िरवत होतो. सगळे वेगवेगळ्या रांगेत बसले होते. किशोर आणि प्रकाश माझ्याकडे सॉलिड रागाने बघत होते. गिरिजा ताई त्या एअर-कंडीशन मध्ये डुलकी काढत होत्या. विजय काका, पूर्णिमा जांभई देत होते. अद्वैत जेवण अंगावर

आल्यावर कसे बधीर होतात तसा दिसत होता. एखाद्या नव्या खेळाडुला शोएब अख्तर चे बाउंसर्स फ़ेस करायला लागले तर कसं वाटेल अशी बिच्चारी पाहुण्यांची अवस्था झाली होती. अखेरीस २-३ तासासारखा वाटणारा तो अर्धा तास संपला आणि सगळे आम्ही बाहेर पडलो. बाहेर पडल्या पडल्या किशोर आणि प्रकाशनी मला पकडलं आणि म्हणाले "असेच जर इकडे अजुन काही शोज असतील तर आज रात्री घरी गेल्यावर तुला चादरीत घालुन भरपुर चोपुन काढु." ते ऐकून मला एव्हढं हसु आलं होतं आणि मी आश्वासन दिलं की ह्या पुढे चांगले शोज आहेत. मला तेव्हा माझ्या कॉलेजच्या मित्रांची आठवण झाली.

दिप्ती बाहेर आदिशला प्ले एरियामध्ये खेळवत होती. वास्तविकत: मागील दोन्ही वेळेस आम्ही वीकेंडला गेलो असल्याने खुप मज्जा आली होती, पण हा वीकडे असल्याने तेव्हढी मज्जा करता नाही आली. त्यानंतर मी आदिशकडे वळलो आणि दिप्तीला पुढचा शो त्यांच्याबरोबर बघायला पाठवलं. नेमका आमच्या दुर्दैवाने तोही शो बोअरच होता. पाहुण्यांचा आमच्यावरचा पूर्ण विश्वास उडाला होता असं सारखं आम्हाला वाटत होतं. मध्ये मध्ये आम्ही कसं वाटतंय वगैरे विचारत होतो आणि ते देखील चांगलं आहे असं देखल्या देवा सांगत होते. सगळेच नाटक फ़िल्ड मधले असल्यामुळे शाब्दिक कोटया करत होते. म्हणत होते की हे नासा नाही नासाडी आहे. ४ वाजायाला आले होते. पाहुणे अगदीच निराश झाले होते. आता आम्ही तरी काय करणार? तेव्हा आम्हाला असं वाटलं की खरंच ह्युस्टन किती रुक्ष आहे. काही असं विशेष नाही फ़िरायला. झु, ॲक्वेरियम, पार्क्स या गोष्टी सगळीकडे कॉमनच असतात. खरंतर त्यांना सॅन-अँटोनिओला जायचं होतं, पण वीकडे असल्याने ते प्रॅक्टीकल नव्हतं. ४-४:३० पर्यंत छायाला दिलीप काकांना घ्यायला जायचं होतं. दिप्तीला तेव्हढ्यात आयडिया सुचली आणि ती म्हणाली की ती, आदिश आणि छाया दिलीप काकांना घेवून राम कडे जातील आणि मी सगळ्यांना वॉटर-वॉल दाखवायला घेवून जावं. पाहुण्यांना काहीतरी विशेष, म्हणजे आता त्यातल्या त्यात, बघायचं होतं. आम्ही लगेच निर्णय घेतला, कारण कोणाला माहीत जर ह्यांना वॉटर-वॉल आवडलं तर उरलेला दिवस चांगला जाणार होता. लगेच गाडी फ़िरवली वॉटर-वॉलच्या दिशेने. १ तासात आम्ही तिकडे पोहोचलो. मी सगळ्यांना त्या तिथे उतरवून शिस्तीत गॅलरीया मॉलच्या पार्कींग लॉटमध्ये गाडी पार्क करुन आलो. कारण तिथुन नंतर मॉल करणं होतंच. ते १ पॅकेजच आहे असंच समजा हवं तर. सगळ्यांना वॉटर-वॉल आवडलं होतं. मला एकदम नासा चं पाप त्या वॉटर-वॉल च्या पाण्यात धुवुन निघाल्याचा आनंद झाला होता. मग अपेक्षेप्रमाणे फ़ेसबुक प्रोफ़ाइल फ़ोटोज तिकडे काढले गेले. विजय काका मग मुद्दामहुन बाकीच्यांना चिडवायला माझ्या जवळ येवून विचारु लागले, "काय रे, नायगारा फ़ॉल्स आणि ह्यात जास्त काही फ़रक नाही ना रे?, नाही म्हणजे आता नायगारा ट्रीप रद्द केली तरी काही हरकत नाही. काय?" मला लगेच त्यांचा खेचण्याचा वास आला मग मी पण त्यांना सामील होत म्हणालो की, "नायगारापेक्षा हे सुंदर आहे." ते हसायला लागले. तिथुन मग आम्ही सगळे चालत चालत गॅलरीया मॉल मध्ये घुसलो. दोन बायकांना आत शिरल्या शिरल्या शॉपींगचा वास आल्याने त्या अति खुश झाल्या. मग पुन्हा सगळे परतायची जागा आणि वेळ ठरवून वेगवेगळ्या दिशांना विखुरले. कोणी सोनी मध्ये, कोणी बेड-बाथ-बियॉड तर कोणी लेदरच्या ब्रँडेड दुकानात होते.

१ तासाने सगळे एकत्र भेटलो आणि राम कडे यायला निघालो. सगळे खुपच दमले होतो. माझ्या मनाला थोडंसं समाधान मिळालं होतं त्यांना वॉल आणि मॉल दाखवून. पण नासाडी काही ते आयुष्यात विसरणार नव्हते.

तिकडे योगायोगाने दिप्तीला गाडीत दिलीप काकांशी मनसोक्त भरपूर गप्पा मारायला मिळाल्या, त्यामुळे तीही खुपच खुश होती. त्यांच्या घशावर खुप ताण पडला आहे असंही ते म्हणाले. दिप्तीने त्यांना जेष्टीमध आणि मधाचं चाटण करुन देते असं सांगितलं.

अखेर आमच्या दोघांच्याही गाड्या अगदी थोड्या

वेळेच्या फ़रकाने राम कडे पोहोचल्या तेव्हा ७ वाजले होते. आम्ही लगेच आमच्या घरचे पाहुणे गाडीत भरुन घरी यायला निघालो. २-३ दिवसांत बरयाच गोष्टी पार पाडल्या होत्या, १ गोष्ट राहिली ती म्हणजे स्विमींग. मग काय घरी ७:३० पर्यंत पोहोचलो आणि पाहुणे सगळे कपडे घेवून स्विमींग पुलवर पळाले, आयुषही होताच त्यांच्याबरोबर. मी थोड्या वेळाने आदिशला घेवून गेलो. पाहुण्यांनी डुंबण्याची खुप मज्जा घेतली. अपार्टमेंटमधलं स्विमींग पुल सुद्धा त्यांना मुंबईतल्या एखाद्या तारांकित हॉटेल सारखं वाटत होतं. स्वच्छ पाणी, आर्टिफ़िशल धबधबा अजुन काय पाहिजे? अर्ध्या पाउण तासाने आम्ही जेवायला घरी परतलो. त्या रात्री सगळं जेवण आमच्याच बिल्डींगमध्ये राहणारया सुहास देशपांडेच्या घरुन येणार होतं. काळी दाल, टोमॅटो-कांदा-बटाट्याचा रस्सा असा बेत होता. सोबत तिखट चटणी होती. मग काय़ पाहुण्यांची पुन्हा मज्जाच होती खाण्याची.

जेवण झाल्यावर दिप्तीने सगळ्यांना ताकीद दिली होती की आज रात्री उशीरापर्यंत तिला गप्पा मारायच्या आहेत तेव्हा कोणी सबबी सांगायच्या नाहीत. मुलांना झोपवून दिप्ती आमच्याबरोबर गप्पा मारायला आली. त्यांना आमच्याकडुन काहीतरी भेटवस्तु म्हणुन मी लपुन छपुन मॉलमधुन काही एअर-फ़्रेशनर्स आणले होते ते दिले. सगळे एकदम सेंटी झाले २ मि. करता. किशोर आणि प्रकाश त्या आधीच आमच्यासाठी किशा आणि पका भाऊ झाले होते. त्यानंतर आम्ही तब्बल २ २ १/२ तास गप्पा मारल्या. गप्पांमध्ये साहजिकच नाटक, सिरियल्स हा विषय होता. त्या तिघांनी मुंबईत नाटक फ़िल्डमधले अपडेट्स दिले. धम्माल किस्से सांगितले, सुयोग च्या सुधीर भटांचे, संजय मोने, कुशल बद्रीके, प्रशांत दामले, मंगेश कदम, अमिता खोपकर असे अनेक जणांचे किस्से सांगितले.

शेवटी अगदी हसुन हसुन दमलो आणि दुसरया दिवशीच्या त्यांच्या प्रवासाचा विचार करुन आम्ही झोपायला गेलो.

२ मे २०१२, बुधवार.

सकाळी आम्ही जरा लवकरच उठलो. सगळ्यांना उठवलं. श्येड्युलमध्ये उपमा होता नाश्त्याला. १०:३० ला एअरपोर्टला पोहोचणं भाग होतं. सगळ्यांचा निरोप घेताना खुप जड जात होतं. आत्तापर्यंत ते आमचे नातेवाईक होवून गेले होते, कारण नातेवाईक बरयाच दिवसांनी परतताना जसा त्रास होतो तसाच त्रास होत होता. एकमेकांना घट्ट मिठ्या मारल्या, फ़ोन नंबर्स एक्स्चेंज झाले, फ़ोनवरुन टच मध्ये राहायचंय अशी आश्वासनं झाली. किशा भाऊ तर आपणहुन सकाळी उठुन आदिशच्या बेडजवळ गेला होता. ते सगळे आदिशला खुप मिस करणार होते. आदिश खुपच लाघवी आहे. त्या सगळ्यांची एव्हढी गट्टी जमली होती आदिशबरोबर की गेल्या ३-४ दिवसांत ते आदिशचे काही कॉपीराइट्स असलेले शब्द म्हणायला लागले होते. उदाहरणार्थ वाया (वारा), आईट (लाईट), चब्बा (संपलं) वगैरे वगैरे. आयुषला शाळेत सोडलं. त्यालाही खुप जड जात होतं, पण तो जास्त एक्सप्रेस करत नाही. तो सकाळपासुन विचारत होता की तो संध्याकाळी घरी येईल तेव्हा हे कोणी नसतील का? सगळ्यांनाच जड होत होतं.

एअरपोर्टला जायला निघालो आणि अगदी वेळेतच आम्ही पोहोचलो. थोड्यावेळाने सगळे आपापल्या होस्ट च्या गाड्यांमधुन पोहोचले. मग पुन्हा तिकडे एकदा रडारडीचा एक अगदी छोटासा कार्यक्रम पार पडला. दिप्तीला खुपच जड गेलं, ती खुपच हळवी आहे मनाने. ह्या सगळ्यांशी आम्ही एक अतुट नातं बांधलं होतं त्या ५ दिवसांत. दिलीप काकांनी तर दिप्तीला शब्द ही दिला की पुढच्या वेळेला मी तुझ्याकडे राहीन म्हणुन. खुप भरुन पावल्यासारखं वाटलं तेव्हा. त्यांनी आपलं सहज विचारलं दिप्तीला त्या चाटणाबद्दल, त्यांना वाटलं विसरली असेल ह्या गडबडीत, पण दिप्तीने ते बॅगेतुन काढुन दिल्यावर ते थक्कच झाले. थोड्यावेळाने जितु देखील त्याच्या भावाबरोबर पोहोचला, मग त्याची सगळे खेचायला लागले. आणि अचानक एकमेकांना अनेक बाय बाय करत सुयोग ची "वा गुरु" ची टीम अदृश्य झाली.

Laughter

Meena Vad

Laughter is part of universal human vocabulary. There are thousands of languages, hundreds of thousands of dialects, but everyone speaks laughter in pretty much the same way. Every person agrees to the fact that laughter makes you feel good.

Hasya-yoga or laughter yoga is a form of exercise based on self-triggered laughter which becomes genuine after a few seconds. The laughter yoga was developed by an Indian physician, Madan Kataria in Mumbai in the mid-1990s. It started with just five people in a park. This concept became popular, grew rapidly and spread worldwide and now there are 8000 laughter-yoga clubs in 66 countries. "It helps if you're able to laugh", Dr. Kataria claims, “the benefits are positively life-enhancing”. Not only does laughter help you to lose your inhibitions and gain self-confidence, Kataria explains that by embracing the spirit of laughter, it's possible to achieve a more positive outlook on life, relaxation as well as improved lung capacity and abdominal tone.

A study done on a group of volunteers at Loma Linda University showed that a good laugh increased their beta-endorphins which are natural stress-relievers and pain-reducers. Also, laughter is good for your heart. It improves your heart rate, lung function, and blood oxygen level. It can lower your blood pressure and reduce the risk of cardiovascular disease. Laughter eases muscle tension and strengthens the immune system by increasing the production of infection-fighting antibodies.

Do you know the study of laughter and its psychological and physiological effects on human body is called “Gelotology”? A good laughter burns calories too. Texas A & M University scientists found that laughter fosters optimism and hope. Laughter stimulates both sides of the brain to enhance learning. It eases muscle tension and psychological stress, which keeps the brain alert and allows people to retain more information. It enables you to live in the moment. Children have the ability to laugh easily, they laugh 100 times per day. Adults can develop the ability to laugh more using laughter yoga exercises. You know, life offers a great variety of events and circumstances we can laugh about. Laughter enhances our breathing and as we know, Prana—or life force gains entry to our bodies through breathing. It clears our respiratory passages and makes our lungs strong which enhances the well-being of both body and mind.

Laughter is easily stimulated in a group, as you see others doing “ho-ho-ho, ha-ha-ha”, you automatically do it yourself. In fact, laughter-yoga has proven to be very therapeutic in nature. A little laughter can do amazing things for you.

It can instantly lift your mood and you’ll feel refreshed. Laughter helps in your relationships because it generates playfulness with others. When you laugh with someone, you create a bond and become more open to interactions with that person. Laughter is very contagious and it strengthens human connections. Here’s an exercise in laughing. You just start laughing aloud for 20 seconds and after you do it, you’ll start laughing at your own laughter, so keep at it for a few minutes. It will relax you and you’ll feel exhilarated for the rest of the day. So, go ahead and try it – laugh long, loud and clear! If you have other people with you to laugh, it will be much easier. If you note down how you feel after doing this exercise, you’ll be surprised to see the difference it makes! Unconditional laughter is truly for everyone!

It’s a Bug's Life

-Paresh Kelvekar

Not a kiss of the morning glory

hiding behind the curtains quiet

I am not your eternal sunshine

not your daylight delight

I am the flying dot backdoors

an ever elusive gleaming spot

slipping away from your fingers

never the one to get caught

always up to a mischief

playing with your heart and mind

to rock an affair so clandestine

a moment sublime, you wait to unwind

melting in to the tender darkness

nibbling a few stars from the sky

I carry myself with a glowing charm

whooshing around like a firefly

"Real Friend"

by Chinmay Pingale

Once up on a time, there were two boys that were best friends. Their names were Zack and Jack. They always used to play together, they used to love doing everything together.

One day, they were walking by, and never knew, when they entered the nearby woods. Suddenly, Jack saw a bear approaching them. He quickly climbed a tree without warning Zack what is happening. Zack did not know how to climb a tree. So, he thought for a moment and quickly laid down on the ground and held his breath, pretending, he was dead.

The bear came close and sniffed Zack, but it went away thinking Zack was dead because he did not move at all. Then, Zack got up and started running in another direction. After watching the bear go way, Jack also climbed down the tree and followed Zack.

Jack soon caught up with Zack, but Zack would not talk to him. When Jack asked him again and again, Zack finally said, "A true friend is the one who helps his friends in danger and in needs. I thought you were my true friend, but I was wrong. You never told me about the bear. I am very sad."

So, the lesson I learn from this story is:

"A Friend in Need is a Friend Indeed!"

"Exercise"

by Chinmay Pingale

Once up on a time, there was a person who had a handicapped son. The man tried a lot to cure his son's handicap. They saw a lot of doctors, but none of the doctors could help the son.

The dad once read a book that said, the boy's handicap might improve by exercising and walking. So, the dad went to a marathon and took his son with him in a wheelchair. The run did not help the son that day, but he felt good and smiled a lot. The dad was happy.

So, he started running everyday with his son in the wheelchair and also started to participate in marathons. Slowly, the son actually started to feel better. His legs became stronger. The dad became very happy and proud. He then ran harder and harder, hoping to cure son's handicap.

Unfortunately, the dad was getting older. And, one day, he got a heart-attack while running. The son felt very bad that his dad suffered while running for him. Luckily, the dad's doctor said, he would be fine again because he exercised so much!

The dad got well after a few days. The dad and son were happy, and started to go running again every day. Now, the exercise helped them both and both became happier and stronger, and never had a problem again!

This story makes me wonder, "Wow! The power of the fatherly love, dedication and exercise!!"

Sri-Krishna

Mahendra K Pingale

I do not intend to get into the argument of whether Shri Krishna was a historical figure or just a fictional creation of an entire lineage of sages, saints and poets. To me, that argument is irrelevant. What are important, on the other hand, are the roles this character has played, and the impacts He has had on, the Indian society over the millennia. Towards that, this is a monologue over the image of this character.

Background

